साप्ताहिक
# माणूस

शनिवार । ३१ जुलै १९७६ । साठ पैसे

## सप्रेम नमस्कार....

# एक बहुमोल कहाणी

◻ 'माणूस' मधून आपण श्री. पु. ल. इनामदारांची कहाणी ह्या दिवसांत दर आठवड्याला प्रसिद्ध करीत आहात ह्याबद्दल आपले हार्दिक अभिनंदन. ही कहाणी लौकरच संपणार म्हणून वाईटही वाटते. असे वाटते की, सारखे असे दर आठवड्याला काही वाचीतच जावे पण प्रत्येक गोष्टीला अंत असतोच. ह्यावरच समाधान मानावे झाले!

पु. ल. इनामदारांची कहाणी दर आठवड्याला मी अतिशय उत्कंठेने वाचीत असतो. त्यातील बऱ्याचशा व्यक्ती परिचयाच्या असल्याने कहाणी वाचत असता मन साहाजिकच २८ वर्षांपूर्वीच्या ग्वाल्हेरात जाते व पुन: प्रत्ययाचा आनंद होतो. ग्वाल्हेरच्या अधिकांश व्यक्तींना ह्या कहाणीत कमीत कमी ह्यामुळे तरी, रस वाटायला पाहिजे.

इनामदारांची कहाणी नवीन फौजदारी वकिलाला मार्गदर्शक तर आहेच, परंतु अलिकडील वकिलांत अभावाने तळपणारे गुण वकिली धंद्यात किती आवश्यक आहेत ह्याची कहाणी वाचून पुन्हा तीव्रतेने जाणीव होते. ध्येय, त्याग, तळमळ व सर्वस्वी वाहून घेतलेल्या कार्याने व प्रयत्नाने कशी यशसिद्धी प्राप्त होते ह्याचे कहाणी हे प्रत्यक्ष उदाहरण आहे.

महात्मा गांधी खून-खटल्यानंतर आजतागायत पुष्कळ साहित्य प्रसिद्ध झाले आहे. त्यात न्यायालयीन निर्णय, सरकारद्वारा नियुक्त निरनिराळी कमिशन्स, त्यांचे रिपोर्टस, अनेक पुस्तके छापली गेली आहेत. परंतु इनामदारांची कहाणी वाचून सामान्य लोकांपुढे आजही अनुत्तरित प्रश्न पुन्हा उभे राहतात. महात्मा गांधींचा खून हा एका माथेफिरूचे व्यक्तिगत जघन्य कृत्य होते अथवा तो एक सुनियोजित कट होता हा पहिला प्रश्न व दुसरा म्हणजे ह्या गुन्ह्याची पूर्वकल्पना असतानाही कोणी व कसे काहीच प्रतिबंधात्मक पाऊल उचलले नाही व त्याबद्दल दोष कोणाकोणास द्यावयाचा? कदाचित भविष्यातील एखादा संशोधक विद्यार्थी अथवा शोधसमिती हे सर्व प्रसिद्ध झालेले साहित्य पुन्हा नवीन रीतीने तपासून एखाद्या निर्णयाप्रत येऊ शकेल. ह्या दृष्टीनेही इनामदारांची कहाणी अत्यंत बहुमोल आहे.

आतापर्यंत मी १६ 'प्रकरणे वाचली. ती वाचता वाचता साहजिकच मला मी रोज लिहीत असलेली रोजनिशी पाहण्याचा मोह आवरता आला नाही. मी १९४८ च्या रोजनिशीतील काही पाने चाळली. त्यात मला आढळून आले की, मी श्री. इनामदारांच्या प्रेमळ आग्रहाने जुलैतील २१, २२, २३रोजी महात्मा गांधींचा लाल किल्ल्यातील खून-खटला प्रत्यक्ष पाहण्यास गेलो होतो. त्यावेळचे तेथील मिलिट्री कँपसारखे वातावरण इनामदारांनी आपल्या कहाणीत लिहिलेच आहे. त्याचा पुनरुच्चार करण्याची आवश्यकता नाही.

मी आणि माझी पत्नी यांनी तीन दिवस हा खटला पाहिला व ऐकला. त्यावेळी माफीचा साक्षीदार बडगे याची पूर्व साक्ष चालू असून संपली होती व श्री. भोपटकरांचे कूटपरीक्षण चालू होते. ते पाहण्यास व ऐकण्यासाठी श्रीमती भोपटकरही आमच्याबरोबर होत्या.

पृष्ठ २ वर

# साप्ताहिक माणूस

वर्ष सोळावे – अंक आठवा

३१ जुलै १९७६

मूल्य : साठ पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

¤

वार्षिक वर्गणी : छत्तीस रुपये
सहामाही वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : पंचावन्न रुपये

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०

¤

दूरध्वनी : ४३४५९

¤


**पृष्ठ १ वरून....**

डॉ. परचुरे यांच्या आईदेखील मला वाटते, आमच्याबरोबर ग्वाल्हेरहून आल्या होत्या. श्री. भोपटकर माझे, मी पुणे येथे लॉ कॉलेजचा विद्यार्थी असताना प्रोफेसर होते व त्या दृष्टीने मला त्यांचे न्यायालयीन काम पाहायला मिळाले.

आम्ही ज्यावेळी लालकिल्ल्यात गेलो त्यावेळी एक लहानसे चहाच्या कपातील वादळच झाले म्हणा ! आज ते आठवून हसू येते. त्यावेळी ग्वाल्हेरहून येणाऱ्या-जाणाऱ्या कोणाही व्यक्तीवर पोलिसांची अत्यंत करडी नजर होती. म्हणूनच कदाचित असेल, इनामदारांना पासपोर्ट साईजचे फोटो देऊनसुद्धा आमचे पासेस काढायला विलंब लागला असेल अथवा त्रासही झाला असेल. पास मिळवून आम्ही कोर्टात गेलो, तर डॉ. परचुरे अभियुक्तांच्या पिंजऱ्यात होते. त्यांची आमची पूर्वीची ओळख होतीच. दृष्टादृष्ट झाल्यावर त्यांच्या व आमच्या चेहऱ्यावर किंचित हास्य निर्माण झाले. कोर्टाच्या मधल्या सुट्टीत डॉ. परचुऱ्यांनी माझ्या पत्नीला विचारले, कसे काय ? ठीकठाक म्हटल्यावर कदाचित आपटे व गोडसे यांनी त्यांना आमच्याबद्दल विचारले असेल व त्यांनी काही सांगितले असेल, तर तेही थोडेसे हसले व आम्हाला हसूनच–हाताने नव्हे–नमस्कार केला. ही गोष्ट तेथील जमलेल्या अनेक लोकांच्या, पोलिसांच्या, सी. आय. डी. च्या लोकांच्या लक्षात आली व एकच कुजबुज सुरू झाली. कुजबुज अशी की, आपटे ह्यांची पत्नी गुपचूपपणे नाव बदलून खटला पाहायला आली आहे. पाहता पाहता एकच हळू आवाजात गोंगाट सुरू झाला. मला वाटते, इनामदारांच्या कानांवर ही गोष्ट गेली. त्यांनी आमचे पासेस काढले होते. जज्जमहोदयांच्या कानांवर ही गुणगुण जाण्यापूर्वीच व काहीतरी त्यांचे मन कलुषित होण्यापूर्वीच इनामदार आम्हाला जज्ज श्री. आत्मचरण ह्यांच्या खोलीत घेऊन गेले व आमची त्यांनी त्यांच्याशी ओळख करून दिली व त्यानंतर सर्वांच्या लक्षात सत्य परिस्थिती आली. अशा रीतीने हे पेल्यातील वादळ शांत झाले. आम्ही तीन दिवस खटला पाहून परत आलो.

ह्या सर्व गोष्टींचे पुनश्च स्मरण करून देण्याला श्री. इनामदारांची कहाणी कारणीभूत झाली व तिला आपण प्रसिद्धी दिली ह्याबद्दल इनामदार ह्यांचे व आपले हार्दिक अभिनंदन व आभार ! !

१६ जुलै, ७६ **रमेश खांडेकर**
ग्वाल्हेर

¤ लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी हे प्रकरण आतापर्यंत वाचले. ही संधी प्राप्त करून दिल्याबद्दल आभारी आहे व सध्याच्या परिस्थितीमध्ये ही वस्तुस्थितीची कहाणी प्रकाशित केल्याबद्दल अभिनंदन.

अलीकडे आपण प्रकाशित करत असलेले लेख पुढचा अंक हातात पडेपर्यंत झोप न येण्यासारखेच आहेत.

माझा अल्प परिचय. मी लामतुरे अण्णाराव भगवानराव. बौद्ध नगर, लातूर. दलित चळवळीमध्ये प्रामुख्याने भाग घेतो व सध्या माझ्या विभागात छोटेसे वाचनालय चालवतो. माणूस हे साप्ताहिक माझ्याकडे प्रत्येक सप्ताहात येते. वाचताना मुलांत अक्षरशः भांडण होते. म्हणून अभिनंदन करावं अशी इच्छा झाली.

'थँक्यू मिस्टर गॉल्ड' या वेळेसच पत्र पाठवणार पण अभिनंदनाचा वर्षाव झाला होता. म्हणून उशीर झाला. बरे आभारी आहे.

आपला वाचक बंधू
२१ जुलै, ७६ **लामतूरे ए. बी, लातूर**

¤ सध्या 'अभियोगाची कहाणी' वाचते आहे. विलक्षण वेधक आणि प्रेरक ! आपले आणि श्री. इनामदारांचे हार्दिक अभिनंदन !

'माणूस' घरातला अत्यावश्यक घटक बनतो याचे श्रेय आपल्याला !

**सौ. सुशीला पगारिया**
१६ जुलै, ७६ जळगाव

¤ माझ्या 'सोंगाड्या इतुके झाले' यावरील श्री. वसंत सबनीसांचे लेख मी लक्षपूर्वक वाचले. एक बारीकसा खुलासा. ही लेखमाला तमाशांतून पडद्यावर येणाऱ्या तीन सोंगाड्यांविषयी होती. म्हणून बस्टर किटन, म्हणून चॅपलीन तरी...परंतु दादा कोंडके.

२२ जुलै, ७६ **नंदू राजे**

रविवार दिनांक १८ जुलैला लोणावळा येथे अर्थविज्ञानवर्धिनी व ग्रामायन या संस्थांच्या वतीने सुप्रसिद्ध निर्माण कार्यकर्ते आबा करमरकर यांचा, त्यांच्या वयाला साठ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने एक छोटासा सत्कार करण्यात आला. संस्थेच्या कार्यकर्त्यांव्यतिरिक्त शिक्षण व निर्माणकार्य क्षेत्रांतील अनेक नामवंत व्यक्ती या कार्यक्रमाला उपस्थित होत्या. वसंत पळशीकर, एकनाथ साळवे व व. द. देशपांडे यांनी आपले विचार लेखरूपाने उपस्थितांसमोर ठेवले व इतरांनी चर्चेत भाग घेतला. आबा करमरकरांबरोबर दामखिंड-कोंढाण या आदिवासी भागात गेली दोन वर्षे कार्य करणाऱ्या नयना कुलकर्णी यांनीही यानिमित्ताने आबांबद्दलचा आपला अनुभव शब्दांकित केला. देशपांडे आणि कुलकर्णी यांचे लेख येथे उद्धृत केले आहेत.

# ग्रामीण भागातील परिवर्तनाचे कार्य : काही समस्या

व. द. देशपांडे, अध्यक्ष ग्रामायन

ग्रामीण भागात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचे ढोबळमानाने दोन प्रकार करता येतील. आर्थिक-सामाजिकदृष्ट्या नाडलेल्या लोकांविषयी आस्था, अन्यायाची चीड, सेवाभाव इत्यादी प्रेरणांमुळे कार्य करणारे लोक पहिल्या प्रकारात येतील. आपला वेळ, साधने, ज्ञान व कौशल्य यथाशक्ती लोकांच्या भल्यासाठी वापरणे हीच एक यांची भावना असते. अन्याय, विषमता, दुःख का निर्माण झाले, त्याचा प्रस्थापित व्यवस्थेशी संबंध काय व त्यासाठी पर्यायी व्यवस्था कशी निर्माण करावयाची, यासंबंधीचा विचार या कार्यामध्ये नसतो. दुसऱ्या प्रकारात प्रस्थापित व्यवस्था मोडून अगर बदलून त्याजागी आदर्श व्यवस्था निर्माण करण्यासाठी जे कार्य करतात, त्यांचा समावेश करता येईल. केवळ आहे त्या परिस्थितीत उपेक्षित लोकांची स्थिती सुधारण्यास हातभार लावणे एवढाच दृष्टिकोन या कार्यकर्त्यांचा नसतो. उदाहरणार्थ, आदिवासी क्षेत्रात त्यांना केवळ नव्या शेती पद्धतीने ज्ञान देणे किंवा जमिनीची बांधबंदिस्ती करणे, विहिरी खणणे एवढाच दृष्टिकोन न ठेवता, ज्या व्यवस्थेमुळे त्यांचे शोषण होते; त्या व्यवस्थेविरुद्ध उभे राहण्यासाठी त्यांच्यात अवसान निर्माण करणे हे दुसऱ्या प्रकारच्या कार्यकर्त्यांना अभिप्रेत असते. दलित जातीच्या उद्धारासाठी काम करताना, जातपात केवळ सुसह्य करणे एवढाच दृष्टिकोन न ठेवता, जातीव्यवस्था नष्ट करणे हा असतो.

अशा सर्वांगीण परिवर्तनाचे उद्दिष्ट डोळ्यांपुढे ठेवून काम करणाऱ्या कार्यकर्त्यांपुढे अनेक समस्या उभ्या राहतात. त्यांचे दोन प्रकार करता येतील. परिवर्तनाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी भिन्न भिन्न उपक्रमांचा विचार करून, स्थानिक परिस्थितीनुसार त्यांचा क्रमवार लावणे, त्यांचा संपूर्ण तपशील ठरवणे, यासंबंधीचे प्रश्न पहिल्या प्रकारात येतील. परिवर्तनाचे उद्दिष्ट जरी स्पष्ट असले, तरी ते साध्य करण्यासाठी अनेक बाबींचा विचार करावा लागतो. कोणत्या उपक्रमाच्या माध्यमातून आपणास जनमानसात स्थान मिळेल, हे उपक्रम पार पाडण्यासाठी लागणारे ज्ञान, कौशल्य, चिकाटी, साधने व मनुष्यबळ मिळविणे, अशा एक ना एक बाबींचा विचार केल्याखेरीज कार्याचा आरंभही यशस्वी होत नाही. उदाहरणार्थ काही विशिष्ट वर्गांची किमान आर्थिक उन्नती व संघटन, हा जर प्रारंभीचा उपक्रम ठरवला, तर शेतीसारख्या व्यवसायाचे किमान ज्ञान असणे, आवश्यक तेवढा वेळ देण्याची तयारी असणे, तज्ज्ञांचा सल्ला व इतर सुविधा उपलब्ध करून देणे इत्यादी गोष्टींचा विचार करावा लागतो. असे उपक्रम ठरवून पार पाडत असताना प्रस्थापित व्यवस्थेशी लहानमोठे संघर्ष उत्पन्न होतात. या संघर्षांना यशस्वीरीत्या तोंड देणे आवश्यक आहे. त्यासंबंधीच्या समस्या दुसऱ्या प्रकारात येतील. उदाहरणार्थ, आर्थिक उन्नती साधण्यात थोडेफार यश मिळाले, तर व्यापारी-सावकार वर्ग, नोकरशाही, कोर्टकचेऱ्या यांच्याशी झगडा करावा लागतो. यासाठी काही प्रमाणात कायदेकानूंचे ज्ञान, विविध खात्यांच्या कामकाजाची व योजनांची माहिती इत्यादी गोष्टी आवश्यक असतात. त्याचप्रमाणे संघर्षात यशस्वी होण्यासाठी जनमत जागृत करून, लोकांचे पाठबळही मिळवावे लागते.

या सर्व प्रकारच्या समस्या कामाच्या आरंभापासून पूर्णपणे समजावून घेणे जरी अशक्य असले, तरी तसा प्रयत्न करणे, काम यशस्वी होण्याच्या दृष्टीने आवश्यक आहे. हे काम सुकर व्हावे यासाठी आपल्या कार्यामागे हितचिंतक, क्रियाशील विचारवंत व मार्गदर्शक यांचे पाठबळ उभे करणेही आवश्यक आहे.

कामाच्या आरंभापासून अडचणींना सुरुवात होते. कोणत्या उपक्रमापासून प्रारंभ करावा हा पहिला प्रश्न. सर्वसाधारणपणे असे मानले जाते की, तातडीने आर्थिक फायदे सामान्य गावकऱ्यास मिळतील असे उपक्रम प्रथम हाती घ्यावेत. विशेषतः दुर्बल घटकांच्या उन्नतीसाठी कार्य करावयाचे असेल तर, त्यांच्या शेतीं अगर तत्सम धंद्यात सुधारणा होईल अशा तऱ्हेने कार्य हाती घ्यावे. थोड्या

कालावधीत जर काही आर्थिक फायदे या लोकांच्या पदरात पडले. तर ते संघटितरीत्या आपल्या पाठीमागे उभे राहतील असा विश्वास या विचारापाठीमागे दिसतो. यास तात्त्विक विरोध करण्यास फारसा वाव नसला तरी, प्रत्यक्ष व्यवहारात मोठ्या अडचणी आहेत, त्या विसरून चालणार नाहीत. उदाहरणार्थ शेती व्यवसायापासून सुरुवात करावयाची ठरविल्यास, सध्याची शेती व्यवसायाची अवस्था, त्यात सुधारणा करण्यास वाव व सुचविलेल्या सुधारणा अंमलात आणण्याची शेतकऱ्याची सर्व प्रकारची कुवत यांचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो. शेती सुधारून शेतकऱ्याची आर्थिक परिस्थिती जलद गतीने सुधारावी अशी आपली इच्छा असली तरी, त्याच्या आवाक्यात नसणारे उत्पादनतंत्र जर आपण त्याच्या माथी मारण्याचा प्रयत्न केला, तर प्रयोग फसतो व मोठी हानी होऊ शकते. विशेषतः जेव्हा अल्पभूधारक व मागास शेतकऱ्यासाठी काम हाती घेतले जाते, तेव्हा फार सावधगिरीने व हुशारीने पावले टाकावी लागतात. संकरित बियाणे, रासायनिक खते इत्यादींचा वापर आजही फार मोठ्या प्रमाणावर सामान्य शेतकरी करण्यास धजत नाहीत हा सर्वांस अनुभव आहे. काही काळ नवीन पद्धतीचा वापर केला तरी पुन्हा जुन्या पद्धतीकडे वळण्याचा त्याचा कल असतो. याची अनेक कारणे आहेत. त्याचा तपशील येथे देणे अप्रस्तुत होईल. मुद्दा हा की, कारणे समजावून घेण्यात आजही आपण अपुरे पडत आहोत. ही परिस्थिती समजावून न घेता आजही अद्ययावत उत्पादनतंत्राचा प्रसार करणे हेच एक महत्त्वाचे कार्य मानले जाते. शेतीसुधारणा म्हणजे अद्ययावत उत्पादन–तंत्राचा वापर असे समीकरण रुजलेले दिसते. सरकारी प्रयत्नात प्रामुख्याने संकरित बी–बियाणे इत्यादींच्या वापरावरच भर असल्याने हे समीकरण प्रस्थापित झालेले असावे. बिनसरकारी प्रयोगात हे समीकरण बाजूस सारून इतर मार्गांचा विचार व्हावयास हरकत नाही. किंबहुना बिनसरकारी प्रयत्नांचे हे वैशिष्ट्यच असते किंवा असावे. सामान्य शेतकऱ्यास सहजपणे स्वीकारता येतील अशा सुधारणांचा विचार करीत, टप्प्याटप्प्याने आधुनिक उत्पादनतंत्र शेतकरी स्वीकारील अशा तऱ्हेने कामाची आखणी करावयास हवी. सामान्य शेतकरी मोठ्या संख्येने आकर्षित करावयाचे असतील तर, कार्यक्रमाचे स्वरूप असेच असावयास हवे. अद्ययावत उत्पादनतंत्रावरच सारी भिस्त ठेवली तर, काही निवडक ठिकाणी प्रतिसाद मिळेल. परंतु सर्वजण त्यात सामील होऊ शकणार नाहीत. जेथे यश मिळेल, तेथेही ते फार काळ टिकेल असे नाही.

वरील पद्धतीने काम करावयाचे झाल्यास, पूर्ण वेळ दीर्घकाळ काम करणारे कार्यकर्ते लागतात. शेतीविषयीचे किमान ज्ञान आवश्यक ठरते. प्रयोगशीलताही हवी. अधूनमधून खेड्यात जाऊन काम करू इच्छिणाऱ्यांनी या कामात पडणे फारसे योग्य ठरणार नाही. ज्यांना या पद्धतीने काम करणे शक्य नसेल त्यांनी इतर कार्यक्रमाचा विचार करावयास हवा.

असाही एक समज दिसतो की, ग्रामीण भागात काम करावयाचे म्हणजे शेतीसंबंधातच काम करावयास हवे. तसे जमत नसेल, तर ग्रामीण भागात कामास वाव नाही. हा समज चुकीचा वाटतो. अधूनमधून ग्रामीण भागात काम करण्याची इच्छा असणाऱ्यांनाही महत्त्वाचे काम पार पाडता येईल. महाविद्यालयातील विद्यार्थिवर्गास शिक्षणक्षेत्रात काम करण्यास वाव आहे व हे काम परिवर्तनाचे उद्दिष्ट गाठण्याच्या दृष्टीने तितकेच महत्त्वाचे आहे. उदाहरणार्थ अनेक लहान खेड्यांत प्राथमिक शाळेतील शिक्षकांवर एकाच वेळेस चारही वर्गांना शिकविण्याची जबाबदारी असते. ही जबाबदारी ते चांगल्या प्रकारे पार पाडू शकत नाहीत. विशेषतः चौथ्या वर्गातील मुलांची तयारी करून घेणे महत्त्वाचे असते. या शिक्षणातील काही भार शहरातील तरुण लोक उचलू शकतात. आठवड्यातून एक दिवस यावयाचे म्हटले तरी, हे काम होऊ शकते. त्याचे अनेक फायदे आहेत. शिक्षक, गावकरी व विद्यार्थी या सर्वांचा या कामास पाठिंबा मिळू शकतो व त्यामुळे तरुण कार्यकर्त्यांच्या गटास गावात पाठिंबा मिळू शकतो. अशी प्रतिष्ठा प्राप्त झाल्यानंतर परिवर्तनास आवश्यक अशी अनेक लहानमोठी कामे रेटणे शक्य होते. नित्याच्या शिकवण्याबरोबरच कथाकथन, गाणी व इतर सांस्कृतिक कार्यक्रम हाती घेता आले तर, त्यांमार्फत परिवर्तनास योग्य अशी पार्श्वभूमी तयार करणे शक्य आहे. अर्थात प्रत्येक कार्यक्रमाचा तपशीलवार विचार करावयास हवा. आपले अंतिम उद्दिष्ट व हाती घेतलेला उपक्रम यांचे नाते सतत तपासून पाहावयास हवे.

तरुण गावकऱ्यांची मंडळे कार्यप्रवण करणे हे असेच एक महत्त्वाचे काम आहे. मागास भागात ठिकठिकाणी तरुण मंडळे स्थापन झालेली दिसतात. पण त्यांच्यापुढे कामाची स्पष्ट कल्पना नसते. न्यूनगंडही असतो. अशा मंडळींशी संपर्क साधून त्यांना सर्व प्रकारचे साहाय्य देणे शक्य आहे. परिस्थितीस अनुरूप असा कार्यक्रम आखून त्यांच्याकरवी तो पार पाडण्याचे काम आपणास करता येईल. काही गावात कमाल मर्यादेमुळे उपलब्ध झालेल्या जमिनीचे वाटप हे महत्त्वाचे असेल तर, काही लग्नसमारंभात होणारी उधळपट्टी थांबविणे हे काम तेथील तरुणांना महत्त्वाचे वाटेल. तेथील तरुणांना महत्त्वाच्या वाटणाऱ्या कामापासूनच सुरुवात करणे इष्ट आहे.

शेतीव्यतिरिक्त धंद्यापासून कामास प्रारंभ केल्यास निराळ्या प्रकारच्या प्रश्नांना तोंड द्यावे लागते. दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, मेंढपाळ यांसारखे शेतीस पूरक असे उद्योग किंवा चामडी वस्तू तयार करणे, तेल गाळणे इत्यादी उद्योग यांसारख्या उद्योगांच्या विकासासाठी कार्य करणारे कार्यकर्ते आहेत. त्यांच्यापुढे सर्वांत महत्त्वाची समस्या विक्रीव्यवस्थेसंबंधीची. या उद्योगात तयार होणारा माल किफायतशीररीत्या विकला जाईल अशी व्यवस्था निर्माण करण्याकडे आवश्यक तेवढे लक्ष दिले गेले नाही, तर यश येत नाही. नेमके याकडेच दुर्लक्ष होते किंवा प्रयत्न यशस्वी होत नाहीत, असा अनुभव आहे. त्यासाठी लागणारी वैचारिक स्पष्टता व आवश्यक संघटन अपुरे पडते. त्यामुळे उत्पादनवाढीसाठी केलेल्या प्रयत्नांवर पाणी पडते. उत्पादन घटकांच्या सहकारी तत्त्वावर संघटन बांधणे व अशा संघटनांचा ग्राहकांशी संपर्क साधून देणे हे याबाबतचे कार्य आहे. नागरी विभागातील ग्राहक संघटितरीत्या अशा उत्पादक संघटनांना साहाय्य करू शकला तर, हे काम सोपे होईल. नागरी विभागातील लहानमोठ्या, सरकारी-बिनसरकारी संस्थांदेखील या कामी उपयोगी पडू शकतील. अशा प्रकारचे नागरी ग्राहक व ग्रामीण उत्पादक यांचे संबंध प्रस्थापित करण्याचे काम फारसे झालेले दिसत नाही. त्यामुळे अनेक विकासकार्यांत यावे तितके यश प्राप्त झाले नाही.

देवाची उरुळी या गावी एक अभिनव प्रयोग उभा राहत आहे. सुमारे शंभर मजूर कुटुंबांचे एका नव्या धर्तीवर गाव वसविले जात आहे. त्यात सामाजिक-आर्थिक परिवर्तनाचे उद्दिष्ट आहे. सर्व मजूर कुटुंबांना शेतीधंद्याव्यतिरिक्त धंद्याचे शिक्षण व साहाय्य देऊन, त्यांना स्वतःच्या पायावर उभे करणे व त्याचबरोबर जातपात मोडणे, सामूहिक जीवनाचे धडे देणे इत्यादी उद्दिष्टे कार्यकर्त्यांपुढे आहेत. हा प्रयोग यशस्वी होणे न होणे तेथील उद्योग आर्थिकदृष्ट्या भक्कम पायांवर उभे राहण्यावर अवलंबून राहील असे दिसते. शिक्षण, उत्पादनतंत्र इत्यादी दृष्टीने जरी योग्य काम झाले तरीदेखील, विक्रीव्यवस्थेत उणीव राहिल्यास हा प्रयोग फसू शकेल. नागरी भागातील ग्राहक संघटना व इतर संस्था यांच्या साहाय्याने अशी विक्रीव्यवस्था निर्माण होऊ शकेल. म्हणून या प्रयोगाचे कार्य गावापुरतेच मर्यादित नाही.

गावातील वादग्रस्त प्रश्नांना हात घालून कार्यास प्रारंभ करणे हा आणखी एक प्रकार मानता येईल. 'एक गाव, एक पाणवठा' ही चळवळ उदाहरणादाखल घेता येईल. या मोहिमेबाबत सर्वांचे एकमत असले (गावकऱ्यांचेदेखील) तरी, प्रत्यक्षात 'एक पाणवठा' असलेली खेडी दुर्मिळच. इंद्रायणी महाविद्यालयाच्या परिसरातील खेड्यांची पाहणी करताना सर्व विद्यार्थ्यांच्या नजरेस ही गोष्ट खटकली; पाण्याची टंचाई असताना व हरिजनांसाठी इतर काहीही सोय नसतानादेखील गावकरी हरिजनांना गावच्या विहिरीत पाणी भरू देत नाहीत. प्रथमतः हेच काम हाती घ्यावे असे अनेक विद्यार्थ्यांना वाटले. परंतु ही मोहीम यशस्वी व्हावयाची असेल, तर गावाशी सतत संपर्क हवा; गावातील तरुणांची मने तयार करावयास हवीत. या सर्व कामात महाविद्यालय, विद्यापीठ यांसारख्या संस्था विद्यार्थी-कार्यकर्त्यांच्या पाठीशी उभ्या राहू शकल्या तर, हे कार्य वाढू शकेल. त्या तशा आहेत हे स्पष्टपणे गावकऱ्यांना दिसले पाहिजे. तरच विद्यार्थी कार्यकर्त्यांच्या प्रयत्नांना यश येऊ शकेल. आज तरी महाविद्यालयांनी या प्रश्नांची उपेक्षाच केलेली दिसते.

दलित जातींवर एवढाच अन्याय नाही. ग्रामीण भागात फेरफटका मारताना हरिजनांच्या जमिनी बळकावलेल्या अनेक तक्रारी कानांवर येतात. त्यासंबंधातही काहीतरी करावे असे तरुण कार्यकर्त्यांना वाटत असते. प्रथमतः या तक्रारीतील सत्यांश तपासून पाहावा लागेल. नंतर काही निवडक प्रकरणात लक्ष घालून शासनामार्फत प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करावा लागेल. गावकऱ्यांनाही या प्रश्नाची जाण निर्माण करण्याचे प्रयत्न करावे लागतील. काही किमान तयारीखेरीज हा प्रश्न हाती घेता येणार नाही. या कामातही ग्रामीण भागातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना सामावून घेता येईल.त्यांच्यामार्फत विश्वसनीय माहिती गोळा करून, स्थानिक विद्यार्थ्यांना यासाठी प्रोत्साहन व साहाय्य देणे शक्य आहे. शैक्षणिक संस्थांनी याचा कधी विचार केलेला दिसत नाही. परंतु ग्रामीण भागात विद्यार्थ्यांनी काम करण्यासंबंधी योजना आहेत. त्या कर्मकांड म्हणून पार पाडल्या जातात. त्यापेक्षा परिवर्तनाचे उद्दिष्ट निश्चित करून, काही कार्यक्रम हाती घेतले, तर अधिक योग्य होईल. त्यातूनच कार्यकर्ते निर्माण होऊ शकतील. □

---

# आबा

नयना कुलकर्णी

आबांचे व्यक्तिमत्त्व मी अतिशय जवळून पाहिले आहे आणि ते अतिशय स्वच्छ-मोकळं असल्यामुळे अगदी खोलवर डोकावून पाहिलंय. ती खोली इतकी प्रचंड आहे आणि म्हणून मला भीती आहे की, माझे शब्द वाचकांना तो तळ दाखवू शकण्यास समर्थ होतील की नाही? प्रयत्न करून पाहणार आहे.

माझी आणि आबांची प्रथम भेट तशी नाट्यपूर्णच झाली. माझे काही प्राध्यापक, पत्रकार मित्रमंडळी व मी सहजच दामखिंडच्या अलीकडील खेड्यात गेलो होतो. आबा करमरकर हे नाव त्या वेळी ऐकून माहिती होते. ह्याच विभागात कुठे तरी N. S. S. च्या मुलांनी येऊन आबांच्या मार्गदर्शनाखाली विहिरी खणल्या आहेत, वगैरे माहिती होते. परत येताना अचानक रस्त्यात एक पांढरी गाडी आमच्या परतीच्याच वाटेने जाणारी दिसली म्हणून लिफ्ट घेण्यासाठी हात केला. गाडी चालवणारे स्वतः आबा करमरकरच आहेत, हे समजल्यावर आम्ही उडालोच. आबांबरोबरच पुन्हा माघारी दामखिंडला आलो. प्रथमच आबांशी परिचय होत होता.

आबा त्या वेळी एका झोपडीत राहत होते. कॉलेजमधील मुले इथे येऊन शेतात कामे करतात, काहीजण वर्ष-दोन वर्ष इथे येऊन राहतात. इथल्या दारिद्र्याविरुद्ध आम्ही लढाई चालवली आहे, त्यात भाग घेतात, वगैरे ऐकून मी प्रभावित झाले होते. 'दारिद्र्याविरुद्ध लढाई', 'शिक्षण व श्रमांची सांगड', 'आर्थिक-सामाजिक-राजकीय परिवर्तनाला चालना', 'स्वातंत्र्य-समता मूल्यांची जपणूक' हे सर्व मी प्रथमच ऐकत होते. ते शब्द उच्चारणारा माणूस आणि त्याच्या शब्दाशब्दातील सत्यतेची साक्ष देणारी हिरवीगार शेते व ऐन ग्रीष्मातदेखील विहिरींना संथ निळेशार पाणी मला आत कुठे तरी गदगदा हलवून गेले. घरी गेल्यावर स्वस्थ बसवेना. घर पालघरला आणि पालघरपासून दामखिंड अवघ्या पंधरा मैलांवर. मग पुनःपुन्हा दामखिंडला जात राहिले. आबांची व दामखिंडच्या कामाची ओळख वाढत गेली. 'मला कॉलेजमध्ये शिकायचे नाही,' म्हटल्यावर, 'नको शिकू' म्हणणारा माणूस प्रथमच भेटत होता. मला दामखिंडला काम करायला यायचे आहे म्हटल्यावर आबांनी मला वर्षभर थोपवून धरले. 'कामाची ओळख करून घे. तुला इथे का यावेसे वाटते त्याचा विचार कर. हे परिवर्तनाचे काम अनेक वर्षं चालायचे आहे. आपल्याला घाई मुळीच नाही.' मी वर्षभर थांबले. आबांनी न विसरता कामाची माहिती देणारा पत्रव्यवहार वर्षभर केला. या सगळ्या पत्रांमध्ये कामाची माहिती असे. नवनवीन प्रश्न उपस्थित केलेले असत. विचारांना जोरदार चालना देण्याची ताकद त्यात असे. कुठेही प्रचाराचा किंवा ठसे उमटवण्याचा

भाग नसे. कामाचे भलेबुरे सर्व पापुद्रे माझ्यासमोर उलगडून ठेवलेले असत. त्यातून कामाची व्यापकता जाणवत गेली. माझा निर्णय मीच घ्यायचा होता. मी दार्मखिडच्या कामाला दोन वर्षे द्यायचे ठरवले.

हाच अनुभव मला अगदी आत्ता दार्मखिड सोडेपर्यंत आला. कधीही आबांनी आपले विचार माझ्यावर लादले नाहीत. विचाराचे-उच्चाराचे-कृतीचे इथे स्वातंत्र्य आहे, असे आबा नेहमी म्हणत आणि अत्यंत काटेकोरपणाने ते पाळत असत.

आपल्या अनुभवातून व गरजेतून अशी आबांनी काही सूत्रे बनवली आहेत. ते त्यांच्या आयुष्याचे लगाम आहेत. या लगामावर पक्की पकड आणि इतकी उमदी मांड ठोकून सुसाट दौड करणारे घोडेस्वार मी फार थोडे पाहिले आहेत.

पण अनेकांना हा स्वार उग्र, कठोर व भीतिदायक वाटत आला आहे. अहंमन्यतेची धूळ उधळीत, शिस्तीचा चाबूक हातात घेऊन, वाटेत येणाऱ्याला झोडपीत निघालेला अतिरेकी माणूस अशीही अनेकांनी गणना केली आहे. पण मला दिसले ते रूप वेगळे आहे. हातात चाबूक आहे पण तो समाजातील ढोंग आणि विसंगती यांना झोडपून काढणारा आहे. तुमच्या बोलण्यात आणि वागण्यात तफावत असेल तर, त्या चाबकाचे फटकारे तुम्हाला बसणारच. तुम्हालाच काय, ह्या चाबकाचे सर्वांत प्रथम फटके त्यांनी स्वतःवरच ओढले आहेत. या चाबकाची भीती मला तरी कधीच वाटली नाही. म्हणजे मी कधीच फटके खाल्ले नाहीत असे नव्हे. खूप खाल्ले. पण हे फटके तुम्हाला मारणारे नाहीत, जगवणारे आहेत, हे त्या त्या वेळी जाणवत होते. तुम्ही सत्याला सामोरे जावे, तुमच्या विचाराची प्रक्रिया तर्कवादावर आधारित आणि शास्त्रीय दृष्टिकोन ठेवणारी असावी, तुम्ही तुमच्या जाणीवा अधिकाधिक वाढवत जाऊन जगावे, तुमचे व्यक्तिमत्त्व समाजाच्या हिताशी जास्तीत जास्त सुसंगत असावे, यासाठी हे फटके असत. मग ज्यांना खऱ्या अर्थाने जीवन जगायचे आहे त्यांना ह्या फटक्यांची भीती वाटण्याचे कारण काय ?

आबांची शिस्तीसाठी शिस्त कधीच नव्हती. आपल्या उच्चारात आणि आचारात तफावत राहू नये म्हणून शिस्त असे. आबांची शिस्तीची अशी एक व्याख्या आहे. तुम्ही जे काही किमान ठरविलेले असते त्याची अंमलबजावणी करीत राहणे म्हणजे स्वतःला शिस्त लावणे. आपल्या वृत्तीमध्ये, आपल्या स्वतःमध्ये गुणवाचक बदलाची ही सुरुवात आहे असे ते म्हणतात. या गोष्टींना स्वाभाविकच, न समजताच फार बेमालूमपणे आमणच विरोध करीत असतो. हा आपल्या स्वतःमधील प्रच्छन्नपणे चाललेला संघर्ष असतो. त्याची दखल घेऊन त्यावर मात करणे म्हणजे स्वतःमधील परिवर्तन ही प्रक्रिया आपल्यात स्वाभाविकपणे सुरू व्हायला हवी असे त्यांचे म्हणणे. समूळ परिवर्तनाची सुरुवात स्वतःपासून करायची आहे, हा त्यांचा आग्रह आहे. आणि हा आग्रह ते स्वतःच्या बाबतीत सर्वांत अधिक कठोरपणे धरतात, असा माझा अनुभव आहे.

आबांची काम करण्याची ताकद प्रचंड आहे. दार्मखिडपासून नानिवली हे ८–१० मैलांचे अंतर आबांनी उन्हातान्हात, पावसात, वाट्टेल त्या वेळी कापले आहे. त्यांचा उदंड उत्साह आणि कामाचा उरक आम्हा तरुण लोकांना लाजवणारा आहे, यात शंका नाही. ऑईल इंजिन बिघडलेले असो, प्रेसचे चाक बसवायचे असो, नाही तर आणखी काही कामे असोत, माणूस नाही म्हणून कामे अडली आहेत, असे त्यांचे फारच क्वचित होते. हातात पाना घेऊन आबा स्वतः कामाला लागतात. काम करताना हात आणि डोकं दोन्ही 'एकाच वेळी वापरायला आम्ही शिकावे म्हणून त्यांचा आटापिटा असतो.

दार्मखिडला कॉफीच्या टेबलावरील चर्चा हा एक फारच महत्त्वाचा भाग होता. आबा नेमाने पहाटे ४॥ वाजता उठतात. आम्ही कार्यकर्ते मंडळी जास्तीत जास्त नेमाने उठायचा प्रयत्न करून टेबलावर एकत्र जमत असू. पहाटेची कॉफी पिता पिता आमच्या चर्चा चालत. रोजच्या कामातील अगदी साध्या साध्या वाटणाऱ्या अडचणी किंवा प्रश्न आबा व्यापक स्वरूपाच्या प्रश्नांशी नेऊन जोडत. रोज नवे प्रश्न आणि रोज वेगवेगळ्या विषयांवर चर्चा घडून येत असे. याचा काम करताना खूप फायदा होई. कधी कधी तेच ते एकसुरी कामही करावे लागे. परंतु त्याचा या चर्चांमुळे व त्यातून आलेल्या व्यापक दृष्टिकोनामुळे कंटाळा येत नसे. जमाखर्च व्यवस्थित ठेवले पाहिजेत आणि कार्यकर्त्याला जमाखर्चाची दृष्टी असायलाच पाहिजे हा आबांचा असाच एक आग्रह. हा बऱ्याचदा तापदायक वाटण्याचा संभव असतो. पण आपल्या देशाला दारिद्र्याविरुद्ध लढायचे असले तर, कार्यकर्त्याला ही दृष्टी आवश्यकच, आहे हे आबांचे म्हणणे नाकारता येत नाही. जमाखर्चाच्या वह्यांत आबा चक्क रमलेले असतात. आकडे माझ्याशी बोलतात म्हणून म्हणतात. आबांची आनंदस्थाने अशी जगावेगळी आहेत. करमणुकीसाठी–सुखासाठी बाह्य साधनांची त्यांना गरज भासत नाही. त्यांच्या कामातच ती अंतर्भूत असतात. बाहेरच्या माणसाला त्यामुळे हा माणूस रूक्ष वाटण्याचा संभव असतो. शास्त्रीय संगीताची मात्र आबांना अतिशय आवड आहे. कामातून वेळ काढून रेडिओवर ते शास्त्रीय संगीत ऐकतील.

पण आबांच्या स्वभावातील ठिकठिकाणी असलेल्या हिरवळीच्या जागा फारच थोड्यांना जाणवतात. आबांची आग्रही वृत्ती आणि स्पष्टवक्तेपणा याची झळ अनेकांना लागते. माणसे दूर पळतात. आबा याने कधी कधी अस्वस्थ होतात. पण लगेच स्वतःला भानावरही आणतात. 'लोकांना अप्रिय असणाऱ्या गोष्टी बोलायचीच जबाबदारी तुझ्याकडे आहे,' असे स्वतःला बजावतात.

१२ जूनला आबांना ६० वर्षे पूर्ण झाली. पण मनाची उभारी कुठे कमी झाली आहे, असे वाटत नाही. अनेक कठीण प्रसंगांतून मनाचा तोल ढळू न देता, न खचता आबांनी आपले जहाज सहीसलामत बाहेर काढल्याचे मी पाहिले आहे. त्यामुळे या षष्ट्यब्दीनिमित्त आबांना अधिकाधिक शक्ती मिळो असे म्हणण्याची आवश्यकताच वाटत नाही. परंतु लोकांना अप्रिय वाटणाऱ्या गोष्टी सांगत राहण्याची आबांची जबाबदारी अजून संपलेली नाही असे वाटते आणि त्यासाठी त्यांना दीर्घायुष्य लाभो, असे मात्र मनोमन वाटते. □

---


# माणूस

## १५ ऑगस्ट विशेषांक : एम्. एन्. रॉय विशेषांक

## तपशील पुढील अंकी

# सोलकढी

## □ मनातल्या मनात पोकळ मिटक्या

सकस आणि प्रथितयश साहित्य वाचणारे रावचावक नाटकाचित्रपटांना वाहिलेली अरबटचरबट नियतकालिके वाचत नाहीत. मला मात्र असली चावट नियतकालिके वाचायला मनापासून आवडते. हे गोंडस गुबगुबीत नट आणि या नरम नानकटाई नटचा आपसांत जी मेवामिठाई लुटत असतात ते वाचून मी आपले तोंड (आंबट) गोड करून घेतो. ती मेवामिठाई नासलेल्या दुधाची आहे असेच मीही जाहीरपणे म्हणत असलो तरी, मनातल्या मनात पोकळ मिटक्या मारणे चालू असते. आपल्या अब्रूचे बुडकुले नीट झाकून ठेवल्यावर या सार्वजनिक व्यवसायाच्या सामुदायिक अब्रूचा दहीकाला पाहायला मोठी मजा येते.

पण त्या व्यवसायातसुद्धा कधी कधी अब्रूचे बुडकुले झाकून घ्यायचे प्रयत्न होतात. काही जाणकार मंडळींच्या मते हे प्रयत्न प्रामाणिक असतात; दुसऱ्या काही तितक्याच जाणकारी मंडळींच्या मते हे प्रयत्न निखळ निव्वळ जाहिरातिक असतात. मीसुद्धा जाणकारच हो. पण मत देणारा नव्हे; स्वतःशीच फुरसतीने हसणारा. असो. काही महिन्यांमागे सीमी गरेवाल या नटीने असा प्रयत्न केला होता: 'फिल्म वर्ल्ड' नावाच्या मासिकाने 'सिद्धार्थ' या चित्रपटातले सीमीचे एक नागडे (यालाच बोली भाषेत 'अनावृत्त' असे म्हणतात बरे.) छायाचित्र मुखपृष्ठावर छापले. तेव्हा आपल्या झाकीव अब्रूचे केवढेतरी नुकसान झाले असे म्हणून ते नुकसान भरून द्यावे म्हणून तिने 'फिल्म वर्ल्ड'वर फिर्याद लावली. फिर्यादीचा निकाल सीमीच्या विरुद्ध लागला.

ब्रिटनमध्ये एका नटाच्या अब्रूच्या नुकसानीचे आणि तिच्या भरपाईचे प्रकरण नुकतेच घडले. टेली सॅवालास हे त्या नटाचे नाव. दोन-चार चित्रपटांतल्या त्याच्या भूमिका मी पाहिल्या आहेत. त्यातली 'नो जेस्ट' या चित्रपटातील त्याची भूमिका खास होती. पण प्रामुख्याने तो दूरचित्रवाणीवरचा नट आहे: उंचापुरा; धिप्पाड; कुटील डोळे; मुख्य म्हणजे तुळतुळीत केसविरहित भलेमोठे डोके : यूल ब्रायनरची हटकून आठवण येईल असे. टेली सॅवालासचे हे टक्कल म्हणे स्त्रियांना फार भुरळ घालते. (आणि इकडे आम्ही सगळी तैलबुद्धी पणाला लावून, तुरळक पडणारे टक्कल जारीने थोपवण्याच्या प्रयत्नात. शिवाय स्त्रियांना भुरळ : या विषयात आम्हाला एटीकेटीसुद्धा कधी मिळाली नाही.) त्यामुळे त्याचा खटला उभा राहिला तेव्हा सर्व वयाच्या (हेसुद्धा आहेच) अपौरुषेय चाहत्यांनी न्यायालयात धमाल गर्दी करून सोडली. ती आवरायला जादा पोलीस आणावे लागले. या धांदलीत इतर टक्कलवाल्यांचीदेखील नाही म्हटले तरी चुळकाभर चंगळ झालीच.

अरे हो, पण आमच्या स्फुटाचा नायक न्यायालयात कशाला गेला ते प्रिय वाचकांना सांगायचे राहूनच गेले की. स्त्रियांच्या भुरळीचा निसरडा विषय निघाला की, असेच होते. वाचकांनी उदार मनाने आम्हाला क्षमा करावी. झाले असे की, लंडनच्या 'डेली मेल' या वर्तमानपत्रात टेली सॅवालासवर एक लेख आला होता. त्या लेखात सॅवालासबद्दल एक गमाडीगुपित सांगितले होते. सॅवालासचे निशाजीवन इतके बेहिशोबी रंगबाज असते की, दुसऱ्या दिवशी आपले (दिवसाचे) काम करणे त्याला अशक्य होऊन बसते ! याच्यात काही आपली बदनामी झाली, तळहातीच्या फोडासारख्या जपलेल्या अब्रूचे फार फार नुकसान झाले, असे एखाद्याला मुळीच वाटले नसते. उलट कौतुक वाटले असते, कोणी सांगावे. पण या बायकांना भुरळ घालणाऱ्या टक्कलवाल्या नटाचे सारे काही वेगळेच. त्यामुळे टेली सॅवालासला, त्या लेखाने आपले चारित्र्यहनन केले आहे असे वाटून त्याने 'डेली मेल' वर फिर्याद ठोकली. टेली सॅवालासची कडक अब्रू आपण चुरगाळली असे 'डेली मेल'ला खरोखरच वाटत नसल्यामुळे, समझोत्याचा एक प्रयत्न झुगारून देऊन, त्याने खटला लढवला. 'डेली मेल'ला जे निरुपद्रवी वाटत होते, ते न्यायमूर्तींना अत्यंत असभ्य आणि आक्षेपार्ह वाटले. टेली सॅवालासला त्यांची संपूर्ण साहानुभूती मिळाली. या निमित्ताने 'डेली मेल'सकट सगळ्या रंगल्याभिंगल्या वर्तमानपत्रांना धडा शिकवावा म्हणून न्यायमूर्तींना टेली सॅवालासच्या अब्रू नुकसानीच्या भरपाईदाखल 'डेली मेल'ला चौतीस हजार पौंड भरायला लावले. शिवाय खटल्याचा दहा हजार पौंडाचा खर्च 'डेली मेल'नेच द्यायचा आहे.

अनंतरावांनी आणि त्यांच्या समस्त वाचकांनी या प्रकरणी लक्षात ठेवायचे ते हे की, समझोत्याचा प्रयत्न झाला तेव्हा, जाहीर दिलगिरी आणि नुकसान भरपाईदाखल निमित्तमात्र अडीच हजार पौंड, एवढ्यावरच मांडोळी करायला टेली सॅवालासची तयारी होती.

आणखी एक लक्षात ठेवायचे ते हे की, न्यायमूर्तींनी शिकविलेल्या धड्याप्रमाणे नियतकालिकांनी चावटपणा सोडला तरी, त्यामुळे मनातल्या मनात पोकळ मिटक्या मारायच्या आपल्या कार्यक्रमात खंड पडायचे मुळीच कारण नाही.

—अनंतराव



# परिपूर्ण लोकशाही

वा. दा. रानडे

लोकसभेमध्ये किंवा राज्य विधानसभांत सरकारविरुद्ध अविश्वासाचा ठराव पास होण्यासाठी, केवळ उपस्थित सभासदांचे साधे बहुमत पुरेसे नसून, एकूण सभासदांपैकी निम्म्यापेक्षा अधिक सभासदांची मते ठरावाच्या बाजूने मिळाली पाहिजेत अशी दुरुस्ती काँग्रेसच्या स्वर्णसिंग समितीने घटनेत सुचविली आहे. सत्तारूढ पक्षास अल्प बहुमत असेल आणि फाटाफूट होऊन हे अल्प बहुमतही त्याने गमावले असेल, तर अविश्वासाचा ठराव पास होऊन सरकार गडगडेल आणि अस्थैर्य निर्माण होईल. अविश्वासाचा ठराव पास होणे अवघड करून ही अस्थिरता टाळावी या उद्देशानेच मुख्यत: ही दुरुस्ती सुचविण्यात आलेली आहे. उद्देश चांगला आहे पण मग हे तत्त्व सर्वच बाबतीत का लागू करण्यात येऊ नये ?

बहुमताची लोकशाही खऱ्या अर्थाने प्रस्थापित व्हावयाची असेल, तर सारे निर्णय केवळ उपस्थित सभासदांच्या बहुमताने नव्हे, तर एकूण सभासदांच्या बहुमताने पास झाले पाहिजेत. लोकसभेत आणि राज्य विधानसभांत, काही वेळा जेमतेम गणसंख्येला आवश्यक तेवढेच सभासद उपस्थित असतात आणि अशा अल्प सभासदांच्या बहुमताने महत्त्वाची बिले पास होतात व अंमलात येतात. तेव्हा कोणतेही बिल केवळ उपस्थित सभासदांच्या बहुमताने नव्हे, तर एकूण सभासदांच्या बहुमताने पास होणे आवश्यक आहे अशी अट ठेवली, तर लोकसभा आणि विधानसभांच्या कामकाजात आमदार अधिक जागरुकतेने भाग घेऊ लागतील. सत्तारूढ काँग्रेस पक्षालाही ही सूचना मान्य करण्यात काही अडचण वाटण्याचे कारण नाही. लोकसभेत तर त्यांचे दोन तृतीयांश सभासद आहेतच पण बहुतेक राज्य विधानसभांतही त्यांना मोठे बहुमत आहे. तेव्हा एकूण सभासदांच्या निम्मे सभासद नेहमी उपस्थित ठेवणे त्यांना अवघड जाऊ नये. काँग्रेस पक्षापुढे सध्या अडचण नाही हे खरे, पण त्या पक्षाच्या नेत्यांपुढे केवळ सध्यापुरता विचार नाही. भावी निवडणुकांत समजा सध्याएवढे बहुमत मिळाले नाही, तर एकूण सभासदांच्या निम्मे सभासद नेहमी उपस्थित ठेवणे त्यांना जड जाईल व बिले भराभर पास करून घेण्याच्या दृष्टीने ही अट आपल्यालाच जाचक ठरण्याचा संभव आहे, असे सत्तारूढ पक्षाला वाटत असावे म्हणून अविश्वास ठरावाच्या बाबतीत जी बहुमताची अट ते लावू इच्छितात ती अट सर्वच कामकाजाच्या बाबतीत लावण्याची त्यांची तयारी नाही. पण हे बरोबर नाही. चांगले तत्त्व सर्वत्रच लागू करायला हवे. आपल्याला सोयीचे वाटेल तेवढ्यापुरतेच ते लावायचे, गैरसोयीचे असेल तेथे लागू करायचे नाही, हा दृष्टिकोन योग्य नाही. निर्णय एकूण सभासदांच्या बहुमताने घेतले जावेत हे तत्त्व लोकशाहीला बळकटी आणणारे असून ते नगरपालिकेपासून लोकसभेपर्यंत सर्वच पातळीवर लागू केले जाण्याची खरोखर आवश्यकता आहे.

हे तत्त्व सर्वत्र लावण्यात काही अडचणी आहेत, धोके आहेत असे सांगण्यात येते. त्यांचाही विचार करायला हवा. आपल्याला नको असलेल्या विषयावरचा ठराव आज सभेपुढे येणार आहे व तो पास होण्याचा संभव आहे असे दिसले तर, सभेला कोरमपुरतेसुद्धा सभासद हजर ठेवायचे नाहीत अशा कारवाया, डावपेच नगरपालिका सभांच्या वेळी अनेकदा लढविले जातात. तेव्हा आपणास नको असलेली बिले, ठराव पास होऊ नयेत यासाठी आवश्यक बहुमताला लागतात तेवढे सभासद उपस्थित ठेवायचे नाहीत हे तंत्र लोकसभा आणि विधानसभांच्या पातळीवरही अवलंबिले जाण्याची शक्यता नाकारता येणार नाही. पण हा धोका आहे म्हणून चांगले तत्त्व बाजूला न सारता धोक्याचे आव्हान स्वीकारून आपण पुढे गेले पाहिजे. गृहात बहुसंख्य सभासद नेहमीच उपस्थित राहतील अशी दक्षता सत्तारूढ पक्षाप्रमाणेच विरोधी पक्षांच्या नेत्यांनीही घेतली पाहिजे. लोकप्रतिनिधीत जबाबदारीची जाणीव त्यातून वाढेल.

अविश्वासाचा ठराव पास होण्यासाठी एकूण सभासदांचे बहुमत मिळायला हवे, हे तत्त्व स्वीकारताना परिपूर्ण लोकशाहीच्या दृष्टीने आणखी खोलवर विचार व्हावयास हवा. ज्या सभासदांच्या बहुमताने हा निर्णय घेतला जाणार त्या सभासदांपैकी कितीजण आपल्या मतदार संघातील बहुसंख्य मतदारांच्या मतदानाने निवडून आलेले असतात ? दोष त्यांचा नसून आपल्या सदोष निवडणूक पद्धतीचा आहे. सध्याच्या निवडणूकपद्धतीप्रमाणे सर्वांत जास्त मते पडलेला उमेदवार निवडून आल्याचे जाहीर होते. एकूण मतदानापैकी त्याला निम्म्यापेक्षा अधिक मते पडलेली असतातच असे नाही. अनेक उमेदवार उभे असतील तर, विजयी उमेदवारास पन्नास टक्क्यापेक्षा कमी मते पडलेली असण्याचाच अधिक संभव असतो. पन्नास टक्क्यापेक्षा अधिक मतदारांचा ज्याला पाठिंबा नाही त्याला खऱ्या अर्थाने लोकप्रतिनिधीच म्हणता येणार नाही. आणखी खोलात जाऊन विचार करायचा तर, ही टक्केवारी पडलेल्या मतांची असते. आपल्या घटनेने एकवीस वर्षांवरील सर्व प्रौढांना मतदानाचा हक्क दिलेला आहे, पण हा हक्क आपोआप प्राप्त होत नाही. त्यासाठी नियोजित मुदतीत मतदारयादीत नाव नोंदवावे लागते. बहुसंख्य मतदार अशिक्षित असतात. त्यांना याची माहिती नसते. राजकीय कार्यकर्त्यांच्या प्रचार मोहिमेमुळे काही मतदार नाव नोंदवितात. पण ही मोहीमही सर्व मतदारांपर्यंत पोचत नाही. मतदार याद्या यामुळे सदोष राहतात. अनेकांना मतदानाचा हक्क असूनही यादीत नाव नोंदले न गेल्याने ते या हक्कास मुकतात. सर्वच राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांनी याबाबतीत अधिक लक्ष घातले पाहिजे.

मताचा हक्क मिळविणे हा पहिला टप्पा. त्यानंतर मत नोंदविणे हा दुसरा टप्पा. जास्तीत जास्त मतदान कायद्याने सक्ती करावी न लागता होणे हे जागरूक नोकरशाहीचे लक्षण आहे. काँग्रेस पक्षाने १९७१ च्या लोकसभा निवडणुकीत मोठा विजय मिळविला, पण त्यावेळी एकूण मतदान ५४·८१ टक्के झालेले असून १९७६ पेक्षा ते ६·५१ टक्क्यांनी कमी होते. आपल्याकडे अधिक परिपूर्ण लोकशाही आणायची असेल, तर विजयी उमेदवारास केवळ सर्वांत जास्त मते पडणे पुरेसे नाही. एकूण मतदानापैकी ५० टक्क्यांपेक्षा अधिक मते पडणेही पुरेसे नाही, तर मतदारसंघातील एकूण मतदारांपैकी ५० टक्क्यांपेक्षा अधिक मतदारांची मते मिळायला हवी. अशा बहुमताने निवडून आलेला उमेदवार हाच खऱ्या अर्थाने लोकप्रतिनिधी मानायला हवा. हे तत्त्व काटेकोर लावल्यास सध्याच्या लोकप्रतिनिधींपैकी खरोखर किती विजयी ठरतील हा राज्यशास्त्राच्या अभ्यासकांनी संशोधन करण्यासारखा विषय आहे. घटनेत आणि निवडणूक कायद्यात हे तत्त्व समाविष्ट होईल तेव्हा होवो, या तत्त्वाच्या कसोटीला आपण उतरू एवढे मोठे यश निवडणुकीत मिळविण्याची आकांक्षा उमेदवारांनी धरायला हवी. असे यश मिळविणाऱ्या उमेदवारांची संख्या वाढेल त्या प्रमाणात आपल्या लोकशाहीस अधिक बळकटी येईल यात शंका नाही. □

तिसऱ्या शतकात होऊन गेलेल्या एका जगन्मान्य भारतीय कामसूत्रकाराच्या जीवनावर आधारलेली एक ललितरम्य कादंबरी ( भाग ५ )

# वा त्स्या य न

दि. वा. मोकाशी

## । सेनापती बाहुबलीचा बाण ।

वात्स्यायन आणि महेश्वरदत्त दोघांनी अंगरिक्ष आणि वासंतिका यांचा उद्यानात शोध घेतला. अनेकदा त्यांना त्या दोघांपैकी एकाला किंवा दोघांना पाहिल्याचा भास झाला. लताकुंज, आमराई, तलाव, पाहता पाहता दिवस उतारास लागला. नागरिक उद्यान सोडून उज्जयनीकडे परतू लागले. मद्याने शुद्ध गेलेले किंवा पणात द्रव्य हरलेले दुःखी जीव सोडले तर उद्यानात कुणी राहिले नाही. जागोजागी खेळताना केसातून गळून पायाखाली कुस्करलेली फुले किंवा कोवळी निष्प्रभ पडलेली पाने, केळचांच्या साली किंवा फळांची टरफले, अर्धवट खाऊन फेकलेले मुळे यांमुळे उद्यान उदास वाटू लागले होते. वात्स्यायनाने वासंतिकेच्या मैत्रिणींना गाडीत बसवून परत धाडले. महेश्वरदत्ताची म्हातारी सखी अतिमद्यपानाने शुद्ध हरपून पडली होती. महेश्वरदत्ताने तिचा घोडा तिच्या जवळ आणून उभा केला. 'सुखाने नीज' तो तिला म्हणाला. मग महेश्वरदत्ताला म्हणाला–' मद्यानंतरची गुंगी आणि सुरत क्रीडेनंतरची निद्रा यातून कुणाला उठवण्याचे पाप माझ्या हातून होत नाही.'

मग उज्जयनीकडे चालत येत असता वात्स्यायनाने अंगरिक्षाची सगळी कथा महेश्वरदत्ताला सांगितली. महेश्वरदत्त प्रथम हसला. मग गंभीर होऊन म्हणाला,

'मल्लनाग ! तू या प्रकरणात पडायला नको होतेस.'

वात्स्यायन काही बोलला नाही. ज्या भावनेने आपण यात पडलो ती महेश्वरदत्ताला सांगता यायची नाही, त्याच्या मनात आले. ज्या तऱ्हेचे प्रेम आपल्याला मिळाले नाही ते दुसऱ्यांना मिळाल्यावर आपण उल्हसित कसे झालो हे त्याला पटवून देता येणार नाही. आपल्या दृष्टीने आपण बरोबर केले. त्यामुळे जे काही होईल त्याची जबाबदारीही आपल्यावर आहे. ती आपण घेतली की झाले. ती घेऊच.

महेश्वरदत्त पुढे म्हणत होता,

'बाबा ! दोन्ही पक्ष नीट ठाऊक असल्याशिवाय कुणाला सल्ला देऊ नये. गांधर्व विवाह लावावा पण त्यानंतर सर्वांची संमती मिळवावी. पळून जाण्याचा सल्ला तर कधी देऊ नये.'

वात्स्यायन म्हणाला,

'मी केव्हा दिला सल्ला ?'

'प्रत्यक्ष दिला नसशील. पण दोघांना शिडीला लावून दिल्यावर परिणाम तोच. तुझ्या हे ध्यानात आले नाही. एकमेकांत प्राण गुंतलेले जीव पाहिले की राहवत नाही हे खरेच ! कारण मल्लनाग ! स्त्री–पुरुषात प्रेम नसले तर शेवटी काय आहे ? पण अशा प्रकरणांतून मागचा पुढचा विचार नीट करावा लागतो.

वात्स्यायन म्हणाला,

'सगळ्याला मी तोंड देईन.'

महेश्वरदत्त म्हणाला,

'वासंतिकेचा वृद्धपिता सेनापती बाहुबली तुला ठाऊक नाही; मला चांगला ठाऊक आहे. त्याने एकदा रणांगणे गाजवली आहेत.'

वात्स्यायन म्हणाला,

'असतील.'

'वेडा आहेस.' महेश्वरदत्त म्हणाला, 'राजे आणि सामंत–सेनापती यांचे तुला काय कळणार ? काही वर्षांपूर्वी अंगरिक्षाने वासंतिकेला पळवले असते तर त्याचा वाडा बाहुबलीने धुळीस मिळवला असता. पण आता युद्धे संपली आहेत. सेनापती आणि प्रधान मागे पडून व्यापारी आणि कलावंत दरबारात मिरवीत आहेत. तरीही संतप्त बाहुबली वाटेल तो ताप देईल, निदान तुझ्यावर संकटे आणील.'

वात्स्यायन म्हणाला,

'माझ्यावर ?'

'होय ! तूच दोघांना उद्यानयात्रेला नेलेस. त्यांनी पळून जाण्याचीही योजना तुझीच असे तात्पर्य कुणीही काढील.'

'माझे काय करील तो ?'

'हवे ते ! त्याच्या हाती सापडलास तर तुला तो जन्मभर तळघरात डांबील. तू अवंती सोडणे उत्तम. आणि तुझ्याइतकीच त्या दोघा पोरांची चिंता कर. यावेळेपर्यंत दोघांनी अवंती सोडली आहे, हे सत्य समज. वासंतिकेला आपला पिता ठाऊक आहे. उगीच ती पळून गेली नाही. आपल्या प्रियकराला सुळावर जाऊ देणे तिला पाहवेल का ? त्या दोघांनी बरोबर द्रव्य नेलंय का ते पाहा. बाहुबलीने त्यांच्यामागे सैनिक धाडले तर संपलेच. पण प्रेमात असलेली धूर्तांहूनही धूर्त बनतात.'

वात्स्यायन म्हणाला,

'मित्रा ! मला दोघांचीच चिंता वाटते. माझी नाही. त्यांचे काही झाले तर मला ते जन्मभर खात राहील. मीच अंगरिक्षाला उद्युक्त

केले. अरे, मीच त्याला मूढावस्थेतून उठून वासंतिकेचा पाठपुरावा करण्यास सांगितले. मी त्याला म्हटले, 'कुठलीही कुमारिका योग्य प्रयत्न केल्यास साध्य असते.' ती दोघे जिथे गेली असतील तिकडे मी जाईन. त्यांना शोधून काढून परत आणीपर्यंत माझे चित्त स्वस्थ होणार नाही. अंगरिक्ष पोर आहे, अजून.'

'पोर!' महेश्वरदत्त हसत म्हणाला, 'एका मुलीला पळवून नेतो तो पोर! त्याचे पोरपण गेले आता. परदेशात तो आता आणखी शहाणा होईल. वासंतिकेचे काय होईल त्याची चिंता कर हवी तर.'

वात्स्यायन म्हणाला,

'मी दोघांची चिंता करीन.'

यावेळेपर्यंत ते अंगरिक्षाच्या वाड्याशी येऊन पोहोचले होते. वाड्याकडे पाहत महेश्वरदत्त श्वास सोडून म्हणाला,

'अजून तरी गडबड दिसत नाही.'

अंधार पडू लागला होता. सगळीकडे शांत होते. पण शांतता विचित्र वाटत होती. आणि दोघांनाही तो मनातून जाणवली. दिंडी-वरचा दिवा मंद तेवत होता. दोघांची पावले नकळत सावध पडू लागली. वात्स्यायनाने दिंडीदरवाजाच्या लहान दारास हात घातला. अवचित एक बाण सणसणत दोघांच्या डोक्याजवळून गेला आणि दाराच्या लाकडात शिरून थरथरत राहिला.

दोघे चटकन खाली बसले. थरथरत्या बाणाकडे तोंड वर करून पाहत महेश्वरदत्त म्हणाला,

'साला थेरडा!'

मग वात्स्यायनाजवळ तोंड नेऊन त्याने हळूच म्हटले,

'वाड्यात शिरेपर्यंत, थेरड्या बाहुबळीच्या बाहूत परमेश्वर कंप आणो.'

वात्स्यायनाने विचारले,

'काय वय असेल त्याचे!'

'नव्वद'

बाण किती डोक्याजवळून गेला हे आठवून वात्स्यायनाचे अंग शहारले.

वाड्यात शिरल्यावर तर तेथील स्तब्धता दोघांना अधिकच बोचली. एक-दोन खोल्यांत काय ते दिवे होते. जिन्यात अंधार होता. जिना चढून दोघे वर आले. एक दासी हातात मोठे पात्र घेऊन आली आणि त्यांना अर्धवट अंधारात पाहून भीतीने हातातले भांडे टाकून पळून गेली. वात्स्यायन दासीला हाक मारून धीर देत पत्नीच्या खोलीकडे गेला. तेथील मंद प्रकाशात, अंगरिक्षाची आई आणि आपली पत्नी, दोघीस एकमेकांस मिठी मारून रडत बसलेल्या त्याने पाहिल्या.

आपल्या आईची मिठी सोडवून वात्स्यायनाची पत्नी उठून दाराकडे आली. तिचे तोंड रडून सुजले होते. तिने विचारले,

'सापडली का?'

वात्स्यायनाने नाही म्हणून मान हलवली. महेश्वरदत्त म्हणाला,

'वहिनी, भिऊ नका.'

त्याचे शब्द अर्धेच राहिले. एक दासी ऊर बडवीत, ओरडत आत येऊन बाहेर बोट दाखवीत म्हणाली, 'सैनिक'

दोघे गच्चीकडे धावले. वाड्याला सैनिकांनी वेढा घातला होता. त्यांचे भाले– धनुष्यबाण दिव्याखालून जाताना चकाकत होते. एक घोडेस्वार बाणाच्या टोकाने आज्ञा सोडीत होता. गच्चीत हालचाल झाल्याचे त्याच्या ध्यानात आले असावे. खांद्यावरचे धनुष्य काढून हातातला बाण त्याने प्रत्यंचावर चढविला. तो दोरी ओढीत असताच दोघे झटकन भिंतीआड झाले. बाणाची सणसण त्यांच्या डोक्यावरून जाऊन वरच्या महालात घुसली. महेश्वरदत्त हळूच म्हणाला,

'मल्लनाग! इथून प्रयाणाची सिद्धता कर. लक्षणे वाईट आहेत. वेळ थोडा आहे. सेनापती बाहुबलीचा बाण तुला शोधतो आहे.' ◻

## शोधासाठी पलायन

त्यानंतर पाव घटकेत वात्स्यायन वाड्याच्या भुयारातून अवंती सोडीत होता. काही अंतरावर पुढे, हातात पेटती मशाल घेऊन एक दास मार्ग दाखवीत होता. दासाच्या मागे महेश्वरदत्त, महेश्वरदत्ताच्या मागे वात्स्यायन अशा ओळीत ते चालले होते. गाठोडे खांद्याला अडकवून अडखळत जात असता घडलेले आणि घडत असलेले वात्स्यायनाला खरेच वाटत नव्हते. पलित्याचा हलता उजेड भुयारांतील अंधाराशी झगडत पुढे जात होता. हवा कोंडल्यासारखी वाटत होती. मधूनच पायाने उडालेला दगड मोठ्याने घुमत होता. प्रसंग इतके भराभर घडले होते की, त्यांचा एकच एक गोंधळ डोक्यात होता. निघताना पत्नीने मारलेली मिठी इतक्या झटकन सोडवावी लागली होती की, तिच्या अश्रूंना खांद्यावर ओघळायलाही समय मिळाला नव्हता. घाईघाईने हाताशी आलेल्या वस्त्रांचे गाठोडे करीत असता, दासीने आणलेले खाद्यपदार्थ त्यात कोंबीत असता आणि अगदी शेवटी गाठ मारण्याच्या वेळी, झटकन उठून फळीवरची बाभ्रव्याची पोथी काढून गाठोड्यात घुसडीत असता आपण काय बोलत होतो, याचे वात्स्यायनाला भान नव्हते. वाड्याभोवतालचा सैनिकांचा ओरडा वाढत होता. बाहुबलीच्या गर्जना ऐकू येत होत्या. त्यात वात्स्यासनाला आव्हाने होती. 'तू गेलास की सगळे शांत होईल.' महेश्वरदत्त म्हणाला होता. आणि झालेल्या प्रकाराचा दोष वारंवार स्वतःवर घेत आपण दोघांना परत आणू, असे वात्स्यायन म्हणत होता. आणि मिठी मारायला धावलेल्या पत्नीच्या शरीराला त्याच्या खांद्यावरचे गाठोडे अडले होते. आणि ते बाजूला करीत असता विदुषकीपणाने मधेमधे लुडबुडले होते.

भुयारात शिरल्यावर मागून चालत असलेल्या महेश्वरदत्ताने 'त्वरा करा–त्वरा करा' अशी घाई लावली होती. पुढे चालणाऱ्या दासाने वाढवलेली गती त्याच्या हातातील चुडाच्या हलण्याने कळत होती.

भुयारातच, अंगावर कोसळलेल्या प्रसंगाची जाणीव वात्स्यायनाला झाली. नगरातले आपले छोटे घर, भोवतालचा छोटा बाग, शेती, पिंजऱ्यांतले पक्षी आणि मोर, तिथे काढलेले विवाहानंतरचे सुखाचे दिवस–साऱ्या आठवणींचा आवेग येऊन त्याचा गळा दाटून आला. महेश्वरदत्त पुन्हा 'त्वरा त्वरा' ओरडला तेव्हा त्याने गती वाढवली. त्या घाईबरोबर पुन्हा त्याच्या डोळ्यांना भुयारातला अंधेर आणि

पलित्याचा उजेड दिसू लागला. प्रत्येक पावलाला पत्नीपासून आपण दूर जात आहोत, याची जाणीव झाली. नगरहून निघालो तेव्हा काही योजनांचाच विरह होता. आता किती योजनांचा आणि किती कालाचा ठरेल कुणास ठाऊक !

नगरला आलेली यातनांची उबळ पुन्हा येऊ लागली. ओठ घट्ट दाबून डोळे मिटून तो स्वतःला म्हणाला, ' मन आवर ! हा समय निराळा आहे. ' मन आवरलेच पाहिजे, त्यानें स्वतःशी म्हटले. अंगरिक्षाला आपणच पुढे ढकलले आणि त्या दोघांमधला अनुनय पाहतानाही आपण सुखावतो. आणि असा निर्मल अनुनय करूनही जर दोघांना दुःखच होणार असेल तर आपले एकदा जे झाले त्यात नि यात फरक काय ?'

वाऱ्याची मोठी झुळूक आली आणि पलित्याची ज्वाळा कमरेत वाकली. भुयाराचे तोंड आले, वात्स्यायनाच्या ध्यानात आले. महेश्वरदत्त जोराने पावले टाकीत त्याच्यापाशी आला आणि म्हणाला,

' मल्लनाग ! बाहेर पडताच मी नगरीत जाऊन येणाराय. प्रथम तो सैनिकांचा वेढा उठवायला हवा. नाही तर वेडा बाहुबली काहीही करून बसेल. '

' सैन्याला तू काय करणार ?'

' सैन्य कसले !' महेश्वरदत्त म्हणाला, ' त्याचे स्वतःचे शंभर सैनिक. बाबा ! राजाच्या सामर्थ्याखालोखाल गणिकांचे सामर्थ्य असते. लक्षात ठेव. आणखी विचारू नको. '

भुयाराच्या तोंडाशी येताच, तोंडावरची शिळा दासाने दूर केली आणि दोघे बाहेर आले. दास नमस्कार करून परत गेला. शिळा जागेवर बसवीत महेश्वरदत्त बाजूच्या राईकडे बोट करून म्हणाला,

' मल्लनाग ! त्या राईत जरा आत बस. मी येतो आत्ता. '

पाठ वळवून तो झपझप अवंतीकडे निघाला. त्याच्या पाठीकडे पाहत वात्स्यायनही राईकडे चालू लागला.

वात्स्यायन राईत जाऊन एका शिळेवर बसला आणि तो राईत शिरताच रातकिड्यांचा आवाज काही क्षण थांबून पुन्हा सुरू झाला. दुरून दोन कोल्ही ओरडली आणि झाडावरील वटवाघुळाने पंख फडफडवले. या अशा झाडीत अशा रात्री आज आपण बसू, हे काल सांगूनही पटले नसते. ज्योतिषाने सांगूनही पटले नसते, वात्स्यायनाच्या मनात आले. ज्योतिषांनी ग्रंथाबद्दल सांगितले त्यापेक्षा हे सांगायला हवे होते. आणि वेड्यासारखा आपण बाभ्रव्य घेऊन आलो.

आपले मन भरकटत आहे. त्याच्या ध्यानात आले. आता काहीही मनात येईल. हा बाभ्रव्याचा ग्रंथ महेश्वरदत्ताजवळ द्यावा. तो आपल्या पत्नीकडे नेऊन देईल. पण देऊ नये. हा परत येणे तिला अशुभ वाटेल. वधस्तंभाकडे नेलेल्या माणसाचे उत्तरीय परत यावे तसे.

त्याला आठवले, एक गुरुबंधू नक्षत्रांवर शुभ–अशुभ पाहायचा. एक अनुष्टुप तो म्हणायचा आणि बोटे घालायचा. कोणते नक्षत्र असेल आज ? ते अतिशय अशुभ असले पाहिजे. आजची तिथी लक्षात ठेवली पाहिजे. आणि वेळ ? त्याने वर पाहिले. डोक्यावर वृक्षांच्या पालवीने नक्षत्रे झाकली होती. त्याने क्षितिजावर चमचमणाऱ्या नक्षत्रांकडे पाहिले. तो म्हणाला, ' नक्षत्रांनो ! खरेच आज मला तुम्ही अशुभ आहात काय ? आजच की उद्याही की पुढेही अशुभ आहात ? नक्षत्रांनो ! मला तुम्ही अशुभ व्हा. पण वासंतिकेला किंवा अंगरिक्षाला होऊ नका ! आणि माझ्या पत्नीला अशुभ होऊ नका. ' त्याचा गळा दाटून आला. हा परिणाम रात्री इथे एकटे पडण्याचा आहे. हे गदगदणे–डोळे भरून येणे.

घोड्यांच्या टापांच्या आवाजाने भानावर येऊन त्याने डोळे टिपले. झटकन उठून पुढे होत तो एका झाडाआड झाला. राईच्या बाहेरून आवाज आला,

' मल्लनाग !'

वात्स्यायन राईबाहेर आला. घोड्याचे प्रतोद त्याच्या हाती देत महेश्वरदत्त म्हणाला,

' त्या थेरडीचा घोडा ऐनवेळी उपयोगी पडला. बघ ! इकडे खाद्यपदार्थ ठेवले आहेत. आणि घरची चिंता करू नको. सध्या तू नगरला न जावे हे उत्तम. आणि त्या दोघांमागे जाणार ' असशील तर पाटलीपुत्राचा रस्ता धर. पळून जाणारे प्रेमी बहुधा तिकडे जातात आणि तिकडचे इकडे अवंतीला येतात. '

वात्स्यायनाने अश्वावर आरूढ होण्यापूर्वी मित्राचे दोन्ही हात प्रेमाने दाबले. मग न राहवून दोघांनी मिठी मारली. मग वात्स्यायनाचे खांदे एका हाताने दूर लोटीत दुसऱ्या हाताने त्याच्या हातांत थैली खुपशीत महेश्वरदत्त म्हणाला,

' अरे, त्या म्हातारीजवळ सापडली. खूप आहे त्यात. प्रवासात खर्चाला लागतील. वेड्यासारखा पाहू नको. अश्वावर हो. '

अश्वावर आरूढ होता होता, वात्स्यायनाचे डोळे अधिकच भरून आले. महेश्वरदत्त म्हणाला,

' तुला काही काळ दूर देशात काढावा लागेल. हवे तर तो काळ दोघांचा शोध घेत राहा. तोपर्यंत थेरडा बाहुबली शांत होईल किंवा मरेल. ती दोघे तुला सापडणार नाहीतच. प्रेमी धूर्त होतात. पण प्रयत्न करून पाहायला हरकत नाही. ' ¤

## स्त्रीचे सीत्कार

पाटलीपुत्राकडे वेगाने घोडा सोडून निघालेल्या वात्स्यायनाच्या मनात पाटलीपुत्राचे अंतर नव्हते किंवा रात्रभर प्रवास करावयाचा किंवा रात्री कुठे थांबायचे हेही नव्हते. आपण वेगाने गेलो तर अंगरिक्ष-वासंतिका मार्गातच भेटतील एवढेच त्याला वाटत होते.

उज्जयनीबाहेरचा नित्य वर्दळीने, धुळीने भरलेला रस्ता संपायला वात्स्यायनाला दोन घटिका लागल्या. घोड्याच्या खुरांनी उडालेल्या धुळीची जाणीव तोपर्यंत सतत पाठीशी होती. रस्त्याच्या दुतर्फा असलेली झाडी दाट होताच घोडा तर बुडत होताच, पण दाट पानांतून चोरून पडलेला रस्त्यावरचा चांदण्याचा ठिपका त्याच्या डोळ्यापुढे विचित्र आकार घेत होता. घोड्याचे खुरांचे आवाज प्रथम धुळीत दबलेले आले. मग धुळीचा रस्ता संपून खूर रस्त्यावरच्या दगडांवर आपटू लागताच त्यांच्या आवाजातून दुसरे आवाज शोधायला वात्स्यायनाला त्रास पडू लागला.

मध्यरात्रीच्या सुमारास वस्ती आल्याची खूण भुंकणाऱ्या कुत्र्यांनी

दली. कुत्र्यांचे भुंकणे हळूहळू मोठयाने ऐकू यऊ लागले आणि त्यांच्या भुंकण्याचा सूर बदलताच घोडेस्वाराचा वास त्यांना आल्याचे त्याच्या ध्यानात आले. घोडयाचा वेग त्याने मंद केला. चांदण्यात निरखून पाहत आलेल्या गावाची कल्पना तो घेऊ लागला. ज्यांच्या मागे आपण आहोत ती दोघे इथेच मुक्कामास राहायला हवीत, त्याच्या मनात आले. घोडयाचा वेग आणखी त्याने मंद केला. पण आता निजानीज झाली असेल आणि ज्या घरात त्या दोघांनी आश्रय घेतला ते सापडणे कठीणच. आपणही एखादे दार ठोठावू आणि त्याच घरात तीही उतरली असली तर ती योगायोगाची बृहत्कथाच होईल.

त्यापेक्षा गाव टाकून गावाबाहेर कुठेतरी आपण पडून राहू. घोडयाला पाणी मिळेल असे स्थळ शोधू आणि आपणही काही खाऊन घेऊ. सकाळी लवकर जागे होऊ. दोघांनी गाव सोडले की, आपल्या अंगावरूनच त्यांना जावे लागेल.

गावातील झोपलेल्या घरांवरून जाताना, कुत्र्यांच्या वाढत्या भुंकण्यातून तो हेच ठरवीत होता. किती दिवसांत इतकी कुत्री आपल्यावर भुंकलेली माहीत ! आनंदिकेकडून अपरात्री गाणी उरकून घरी येतानाही नाहीत. कुत्र्यांना गावातल्यांचा पायरवा माहीत असतो. घरातलेही जागे असेल तर म्हणत असतील, हा वात्स्यायन चाललाय.

आपण स्वतःशी बोलत आहोत. त्याच्या ध्यानात आले. भुंकणी ऐकून एक–दोन दारे जपून किलकिली झाली आहेत. पण एकाही घराशी दोन घोडी बांधलेली दिसत नाहीत. दोघे घोडयांवरूनच गेली असली पाहिजेत. नाहीतर वाटेत भेटायला हवी होती. काय भुंकताहेत कुत्री !

' भुंकू नकारे !' तो श्वानांना म्हणाला. मी मल्लनाग वात्स्यायन आहे. मी नगरचा एक सुसंस्कृत नागरिक आहे. तुमचे दोन बंधू माझ्याकडे आहेत आणि फार लघळ आहेत. मी दुरून दिसलो तरी उडया घेत येऊन माझ्या अंगावर पुढचे पाय टाकून जिभा काढीत लाडे लाडे करतात. मी माझ्या मेव्हण्याला आणि त्याच्या पत्नीला शोधावयास बाहेर पडलो आहे. आता ती त्याची पत्नीच. गांधर्व विधीने त्यांनी विवाह केलेलाच असेल. एव्हाना. मी त्यांच्या पळून जाण्याला कारण झालो म्हणून तुम्ही माझा धिक्कार करीत आहात काय ? किंवा विवाहाच्या रात्री आप्त स्त्रियांनी गाणी म्हणत, थट्टाविनोद करीत जागवलेली रात्र, पहाटे नवदांपत्याचे स्वगृही जाणे, या गोष्टींचा सुखद अनुभव त्यांना मिळाला नाही किंवा 'तो ध्रुव तारा पाहा' असे तिला त्याला म्हणता आले नाही किंवा पहिल्या दिवशी त्याला जेवताना अग्नीला आहुती देता आली नाही, म्हणून का माझ्यावर भुंकता आहात ?

श्वानांनो ! हे सर्व त्यांना झाले नाही म्हणून तुम्ही मला दोष देत असाल तर हे होऊनही सुख होतेच असे नाही. अग्नीला मी आहुती दिली होती, पण माझ्या पत्नीला हाताने धरून शेजारी भोजनास बसवले नाही. ध्रुव तारा तिला मी दाखविला पण वैवाहिक जीवन ध्रुवासारखे स्थिर ठेवायला करावे लागते ते मी केले नाही. तिला प्रिय काय आणि अप्रिय काय हे मी कधी विचारले नाही. आणि आता तिला दुःखाला सोडून मी निघालो आहे. त्यासाठी भुंकून तुम्ही माझा धिक्कार करीत असाल तर योग्यच आहे.

वात्स्यायनाचे मन व्याकूळ होऊन उठले. जरा वेळाने वारा बदललेला कळून त्याने वर पाहिले. गाव मागे पडले होते. पुढे पसरलेल्या आंबराईत चुली पेटण्याच्या ज्वाला जागजागी दिसत होत्या. त्यांच्यापासून निघालेला धूर सर्वत्र पसरला होता. त्या धुरात, उतारलेल्या बैलगाडया-आणि लांब कासऱ्यांना बांधलेले चरत असलेले बैल दिसत होते.

आपण गावात थांबलो नाही हे बरे झाले, त्याच्या मनात आले. प्रवाशांच्या या उतारस्थानी निःसंकोच झोपता येईल. पहाटे सर्वांचीच निघायची गडबड सुरू झाली की, आपणास आपोआप जाग येईल. तळ असा समोर येताच सवय नसलेल्या मांडयावरचा ताण त्याच्या ध्यानात आला. तोंडाला पडलेली कोरडही कळली. घोडयाचीही तीच अवस्था झाली असेल. घोडयाचे तोंड वळवून तिथला फेस पाहण्याचा त्याने यत्न केला. मग आंबराईशी येताच खाली उतरून पाण्याची खळखळ कुठे येते तो ऐकू लागला.

थोडया वेळाने घोडयाला पाणी पाजून आणि ढील दोर देऊन घोडयाला गवताळ जागेवर चरायला सोडून, घोडयावरून उतरलेली पडशी वात्स्यायनाने आंबराईत घेतली. मग खाणे उरकून, पाणी पिऊन, जमिनीवर घोंगडी टाकून थकलेल्या शरीराने त्याने डोळे मिटले. तो मध्यप्रहरानंतर जागा झाला. अंग अंबले होते. पण तेही सुखाचे वाटत होते. उताणा पडूनच मान वळवीत त्याने भोवताली पाहिले. उतरत्या चंद्राचे क्षीण तिरपे चांदणे, झाडांच्या बुंध्यातून येऊन, अद्‌भुत देखावा निर्माण करीत होते. दिवसा वाटते ती पृथ्वी वाटत नव्हती. चित्रविचित्र देव, गंधर्व कोणत्याही क्षणी इथे अवतरून क्रीडा करताना दिसले असते तरी नवल वाटले नसते.

मग आपण इथे का आलो, कसे आलो याची जाणीव मनात उतरली आणि त्याला एकाकी वाटू लागले. मनातसुद्धा तो स्तब्ध झाला. डोक्याखाली धरलेल्या त्याच्या हाताला मुंग्या आल्या होत्या. पण तोही त्याने डोक्याखालून काढला नाही.

कुणीतरी खोकले आणि शेजारी कुणीतरी प्रवासी आहेत याचे त्याला बरे वाटले. प्रत्येक नवख्या प्रथम प्रवाशाला मध्येच जाग आल्यावर असेच एकाकी वाटले असेल का ? या मल्लनागासारखीच त्याची पत्नी घरी एकटी असेल. अस्वस्थ वाटून तो कुशीवर वळला. आंबराईत ठिकठिकाणी झाडांना बांधलेल्या बैलांच्या गळयातील मणी वाजत होते. एखादा घोडा खिकाळत होता. ठिकठिकाणी झोपलेल्या प्रवाशांच्या जागा त्यांच्या खोकल्यांनी आणि चुळबुळीने कळत होत्या. वासंतिका आणि अंगरिक्ष येथे येऊन पोहोचली असतील तर अशीच आंबराईत झोपलेली असतील.

एकाएकी अगदी निराळा आवाज कानावर आला. वात्स्यायनाचे छातीवर बांधलेले हात घट्ट झाले. एक स्त्री खळखळून हसत होती. हा वासंतिकेचा तर आवाज नाही ? नाही, हा वेगळा आहे. आणि तो पुन्हा ऐकू लागला. पुन्हा ती स्त्री हसली. मणी वाजावे तसे ते हसू होते, किंवा गुदगुल्या कराव्या तसे होते. आपण लक्ष देता कामा नये. हे प्रवासातील स्त्री-पुरुष आहेत.

पण ऐकू येणाऱ्या आवाजांना त्याचे कान बंद झाले नाहीत. तो

अधिकच अस्वस्थ झाला. हसणे बंद होऊन त्या स्त्रीचे सीत्कार ऐकू येऊ लागले. ते ऐकता ऐकता वात्स्यायनाचे सारे अंग गरम होऊ लागले. ते संभोगसमयीचे तिचे सीत्कार आहेत, याबद्दल त्याला संशय उरला नाही. त्याने आपले थरथरते हात कानावर ठेवले. मग झटकन तो उठून बसला आणि उभा राहिला. झरझर पावले टाकीत तो आंबराईबाहेर आला. तेथे शिळेवर बसून उतरत्या चंद्राचे चांदणे पाहत राहिला. दूर आल्यामुळे सीत्कार ऐकू येणे थांबले होते.

मग आपल्या या अवस्थेबद्दल त्याची त्यालाच खंत वाटली. बायकोने पूर्वी म्हटलेले त्याला आठवले, कामसूत्र लिहा, पण एवढ्यात लिहू नका. आपल्या डोळ्यातला कामज्वर पाहून तेव्हा ती म्हणाली. या वेळी आपली अवस्था ती पाहती तर ? ते संभोगकालीन सीत्कार ऐकून आपल्या मनात फक्त त्यांचे सूर यावयास हवे होते की बाभ्रव्याने ग्रंथात दिलेल्या सीत्काराहून काही निराळा सीत्कार तिनं काढला का ? असला तर आपल्या कामसूत्रात तो घालायला होईल, याचा आनंद व्हावयास हवा होता. अंग गरम होऊन आपण तेथून दूर पळालो. असा पळणारा कामसूत्रे लिहीत नाही.

मान हलवून त्या स्त्रीचे डोक्यात बसलेले सीत्कार आणि हसणे डोक्यातून काढीत, मन आवरीत वात्स्यायन उठून परत आपल्या जागेवर जाऊन पडला. तरीही त्याचे कान त्या ध्वनीकडे लागले. एक घोडा कुठे तरी दूर खिंकाळला आणि त्या मागोमाग शेजारच्या झाडाआडून सीत्काराऐवजी विव्हळणे ऐकू आले. ते ऐकू येऊ लागताच वात्स्यायनाचे सगळे विचार थांबले. विव्हळणे वाढले, त्याचे कान तीक्ष्ण झाले. आणि एकदम त्या स्त्रीची आधी एक अस्फुट किंकाळी ऐकू आली. इतकी दाबून की, त्यातील वेदनांची तीव्रता वात्स्यायनाला बाणासारखी टोचली. त्या किंकाळीमागोमाग आणखी दोन किंकाळ्या आल्या. मग जोरजोराने ओठ दाबून दिलेल्या बायकी शिव्या आणि त्यानंतर चापटयांचे आवाज आले. जोराची धडपड होऊन पाचोळा वाजला आणि पाचोळ्यातून कुणीतरी धडपडत उठत पळू लागल्याचे कळले. चांदण्याच्या एका ठिपक्यातून विव्हळत घाईने गेलेली त्या स्त्रीची आकृती वात्स्यायनाला दिसली.

भोवताल एकदम स्तब्ध झाला होता. वात्स्यायनाचा कामज्वर केव्हाच उतरला होता. छातीची धडधड वाढली होती. ती वासंतिका नव्हती हे नक्की. पण तिच्याबाबतीतही हेच होईल, छाती धडधडत असता त्याच्या मनात आले. अंगरिक्षा ! हेच होईल रे तुमच्या विषयात ! तुझ्या हातून होईल. यावेळी कुणीतरी प्रौढ अनुभवी तुमच्याजवळ हवे. वृद्ध दासी, नाहीतर आई. असा अत्याचार केलास तर वासंतिका तुझा कायमचा तिटकारा करील आणि सगळे जीवन दुःखी होईल.

मग अंगरिक्ष जणु समोर आहे असाच तो बोलत राहिला. अंगरिक्षा बाबा ! हे एक शास्त्र आहे. ते ठाऊक हवे. लक्षात ठेव ! वधूचा विश्वास संपादन करावा. काहीही उपाय त्यासाठी योजावे आणि मगच संभोगास प्रवृत्त व्हावे. स्त्री फुलाप्रमाणे कोमल असते. मीही हे जाणले नव्हते, पण तू परदेशात आहेस. पतीविषयी तिटकारा उत्पन्न झालेली स्त्री परदेशात घेऊन हिंडणे सुखाचे होत नाही. बलात्काराने विपरित परिणाम संभवतात. वधूची कामभावना एखादवेळी पूर्ण नष्ट होते.

मग तुझे काय होईल ? आम्ही आमच्या घरी होतो. मला अवधी होता, तरी माझ्या हातून अनुचित प्रकार झालेच, फार घडे घेतले मी. संभोगातला खरा आनंद फार उशीरा लक्षात येतो. तो किती दिवसांनी कळतो हे सांगता येणार नाही. दैव असले तर लवकर कळतो. दर वेळेला आनंद होतोय असे मला वाटले. पण खरा आनंद कोणता हे आता कळतंय. तो ऐकून घे. खरा आनंद संभोगानंतरच असतो. संभोगानंतर बाहेर चांदण्यात, दुसऱ्या स्वच्छ चादर घालून ठेवलेल्या गादीवर, स्नान आटोपून, तांबूल खाऊन, स्वस्थ झालेल्या शरीरांनी, पत्नीला मांडीवर घेऊन, हातात हात अडकवून आणि तिचे डोके आपल्या वक्षस्थळावर घेऊन-अगदी इकडल्या तिकडल्या गोष्टी जेव्हा सुरू होतात, आधीच्या आनंदाचे मनात कुठेतरी रेंगाळत असते आणि आपण काहीतरी विषय निघून बोलतो किंवा काही विचारतो. पत्नी काहीतरी उत्तरे देते किंवा तिला आपण आकाशातले तारे दाखवतो, हे अमके नक्षत्र, ते तमके, डोळ्यांवर नकळत झोप पडदा टाकते आणि एवढेच. अंगरिक्षा ! इथे आनंद खरा पुरा होतो आणि दुसऱ्या दिवशी उशीरा निजून उठलेल्या पत्नीच्या तोंडावर तो रेंगाळत राहतो. तो बघणे किती भाग्याचे असते !

बाबा ! शास्त्रात सांगितलेलेही ऐकून ठेव. विवाहानंतर तीन रात्री वधूवरांनी ब्रह्मचर्य पाळावे. त्या तीन रात्री फलाहार ठेवून जमिनीवर झोपावे. नंतर सात दिवस तरी नाटक, गाणे, नातेवाईक अशा ठिकाणी जावे. त्यामागे वधूला आणि वराला परस्परांची पुष्कळ ओळख होते. मग दहाव्या दिवशी एकांतात असता मृदु भाषणाने वधूचे मन आनंदित करावे. पण तिला कंटाळा येईल एवढी बडबड करू नये.

अवसीचा थंड वारा आंब्यांच्या पानांची लहान सळसळ करीत वाहू लागला. वात्स्यायनाचे डोळे मिटू लागले आणि तो निद्रेच्या आधीन झाला. पहाटे पहाटे त्याला जाग आली, ती डोक्याखाली घेतलेल्या आपल्या हातावर पत्नीचे डोके आहे या भासाने. पहिल्या क्षणाला सुखदभावाने त्याला घेरले. त्याने त्या भावातच बाजूला तोंड वळवले, पण नेहमीचा परिचित स्पर्श गालांना झाला नाही तेव्हा जाग येऊन पत्नीच्या नाना स्मृती आळवीत, इतरांची उठण्याची वाट पाहात तो तळमळत जागा राहिला. □

## नाना देशींचे कामाचार

मनाने व्यग्र असलेल्या माणसाचा प्रवास जसा अधांतरी होतो तसा वात्स्यायनाचा–पाटलिपुत्राचा पुढचा प्रवास अधांतरी झाला. मार्गातील कांतारे, उपवने, डोंगर, नद्या, खळखळणारे ओढे किंवा मरूभूमी यांबद्दल त्याला काही सांगता आले नसते. मरूभूमीवर सतत समोर वाटणाऱ्या पाण्याच्या मायेप्रमाणे, वासंतिका आणि अंगारिक्ष पुढे पुढे आहेतच अशा भावनेत त्याचा प्रवास होत होता. एखाद्या विश्रांतीस्थलात शिरता शिरता ती समोरून येतील आणि कोणत्याही क्षणाला हा प्रवास संपेल.

आपला स्वभाव प्रवासाला पोषक नाही हे त्याला कळत होते. उडालेल्या धुळीच्या पुढे आपल्याला सहन होत नाही आणि वस्त्रां-

वरची धूळ आपण सारखी झटकत असतो. केस कोरडे पडलेले आपल्याला आवडत नाही आणि तोंडावर सारखा घाम येऊन ते आपल्याला दुर्गंधित वाटत असते. आपल्याला सारखी चंदनाच्या लेपांची आणि उटींची आणि सुगंधित द्रव्यांचे स्मरण होते.

आपल्याला आपत्‌धर्माने प्रवास करावा लागला आहे त्याच्या मनात आले होते, पण आपल्याच सारखा इतर पुष्कळांना असा प्रवास घडत असतो हेही त्याला कळले होते. या जथ्यातले व्यापारी नित्यप्रवासी होत. तसेच पत्रवाहक आणि गावोगावी बांगडया आदी लहान वस्तू विकून पोट भरणारे नित्यप्रवासी होत. कधीही एका राजाकडे राहणारे सेवेस न राहणारे सैनिकही नित्यप्रवासी होत. आणि व्यापाऱ्यांच्या संघाबरोबरचा सेवकवर्गही नित्यप्रवासीच.

पण गणिका होण्यासाठी पाटलीपुत्राला निघालेली ती महत्त्वाकांक्षी तरुणी नित्यप्रवासी नव्हे. प्रवासातही ती आपली वस्त्रेभूषणे आकर्षक तऱ्हेने घालीत होती आणि पायांचा थकवा त्याच्या तोंडावर तिने दाखवला नव्हता. तशीच आपल्या पतीला शोधायला निघालेली ती परित्यक्ता, किंवा दारिद्र्य आल्याने आपले गाव सोडून निघालेले दोघे कारागीर किंवा आपल्या पुत्राला गुरुगृही घालण्यास निघालेली ती गतभर्तृका, किंवा राजवाड्यात दासीकाम करायला निघालेल्या चार दासी हे नित्य प्रवासी नव्हेत. त्याच्याप्रमाणेच आपत् धर्माने ते प्रवासात पडले असल्याने त्याला समदुःखी होते. एकूण प्रवासात, व्यापारांचे दोन संघ त्याला भेटले होते, पहिल्या संघाबरोबर त्याने आपला पूर्वप्रवास आणि दुसऱ्या संघाबरोबर उत्तरप्रवास आटोपला होता. एका सायंकाळी त्याची पहिल्या संघाशी गाठ पडली होती. संघातल्या व्यापाऱ्यांनी आपल्या गाड्या वाटोळ्या लावून त्यात आपले विश्रांतिस्थान केले होते. त्यांनी वात्स्यायनाला आपल्यात घेतले. ते आपल्याला राजदूत समजले असावेत, त्याच्या मनात आले होते. ते सारे तरुण होते व त्यांच्यातले पुष्कळजण एक एकदा पूर्व, पश्चिम, दक्षिण दिशेला व्यापार करून आलेले होते. रात्री चांगलाच गारठा पडला होता. मध्यावर मोठा अग्नी पेटवून सगळे झोपले होते. पोटात अग्नी जाऊन, वरून अग्नीची ऊब लागताच एकेक बोलू लागला होता. त्यांना, तरुण वय असल्याने असेल, धन लोभाने घेरले नव्हते. बोलण्यात त्यामुळे इतर विषयही आले होते. त्यांच्या तारुण्यामुळे स्त्रियांच्या विषयात त्यांची मने जास्त विसावत होती. पाटलिपुत्र जरी लांब होते तरी मागील वेळेच्या तेथील स्त्रियांच्या स्मृती काहींच्या अगदी हृदयाशी होत्या. आपल्यातल्या नव्या आलेल्या सवंगड्यांना आपले अनुभव त्यांनी अहंमहिकेने सांगितले होते. आणि ते सवंगडीही उत्सुकतेने ऐकत, मधून शंकाही विचारीत होते. एकाने माहिती सांगितली.

'पाटलिपुत्रातील स्त्रिया चौसष्ट कामकलांनी संतुष्ट होतात. त्या लज्जाशील असल्याने सर्व गोष्टी एकान्तात करतात.'

दुसरा म्हणाला,

'तुमच्या बोलण्यावरून महाराष्ट्रातील स्त्रियांप्रमाणेच मला त्या वाटतात. गेल्या वर्षीच मी महाराष्ट्रात गेलो होतो. तेथील स्त्रियांना अश्लील व कठोर भाषणे आवडतात. त्या इतक्या धीट असतात की, संभोगात त्या प्रामुख्याने भाग घेतात.'

मग बाल्हिक, सिंधुकाठ, मध्यदेश, अपरान्त, कौसल, आंध्र, द्रविड, वनवास इत्यादी देशांतील अशीच माहिती कुणी कुणी सांगितली. बाल्हिक देशातील स्त्रियांना चित्ररतीचे प्रकार कसे प्रिय आहेत, मालव व आभीर देशांतील स्त्रियांना चुंबन, आलिंगन, दंत आणि नखक्षते फार प्रिय असतात. स्तनमर्दन केले असता त्या तात्काळ कशा वश होतात, सिंधू नदीकाठच्या स्त्रियांची कामवासना खरवेगी असते आणि त्यांना औपरिष्टीक आवडते, तर अपरान्त आणि लाट देशांतील स्त्रिया चंडवेगी असतात. कौसल आणि स्त्रीराज्य यांतील स्त्रियांना कृत्रिम उपायांची गरज लागते. आंध्र देशातील स्त्रिया कोमल प्रकृतीच्या आणि विलासप्रिय असतात. पण त्यांची रुची अपवित्र असते व त्या आचारभ्रष्ट असतात.

नाना देशांतील स्त्रियांच्या या तऱ्हा ऐकता ऐकता हसू आले होते. खरोखरीच स्त्रियांचा स्वभाव असा सांगता येईल का ? सर्वसाधारणपणे ते खरेही असेल. उज्जयनीतल्या स्त्रियांना चुंबन आवडत नाही हे खरेच आहे. पण उज्जयनीबद्दल यांतील कुणी काही बोलला नाही. कारण ते उज्जयनीचे आहेत. गुरू म्हणाले तेच इथेही खरे आहे. नेहमी दुसऱ्या देशांतील स्त्रियांबद्दल आपण चिकित्सेने बोलतो.

इतक्या वेळात त्या व्यापारी मंडळीत कडाक्याने वाद सुरू झाला होता. एकजण जोराने म्हणत होता,

'स्त्रीला कामक्रीडेत भाग घेण्यास अनुकूल करावयाचे असेल, तर तिच्या देशाच्या रीतीनुसार वागावे.'

दुसऱ्याला ते पटत नव्हते. दुसरा म्हणाला,

'मग पुरुषांच्या बाबतीत काय ?'

पहिला म्हणाला,

'मग त्यावेळी स्त्रीने पुरुषाच्या देशकालानुसार वागावे.'

तिसरा गंभीरपणे म्हणाला,

'या विषयात देशकालाकडे लक्ष द्यावे हे मला रुचत नाही. उदाहरणार्थ कौसलातल्या सर्व स्त्रिया चंडवेगी असतील असे नाही. यासाठी स्त्रीचे मन संतुष्ट करण्यास तिच्या प्रकृतीप्रमाणे प्रयोग करावेत.'

वात्स्यायनाला त्यांचे बोलणे आवडले होते. देशांचे विभाग मान्य केले म्हणून त्या त्या देशातील स्त्रियांच्या स्वभावातही तसे भाग असतील असे सोयीसाठी म्हणावे हवे तर. त्या वादात आपणही बोलावे असे त्याला वाटले होते. पण तो बोलला नव्हता. त्याच्या मनात आले होते की, या विषयात आपल्या पत्नीचा स्वभाव काय तो आपल्याला माहीत आहे. आणि पत्नीचा तरी तोच असेल कशावरून ? कोणत्या क्रियेने तिला सुख होतेय किंवा ती आनंदित होते हे आपण पूर्वी कधी पाहिलेच नाही. ते पाहायचे असते हेही आपल्याला ठाऊक नव्हते. आपल्याला सुख होते तेव्हा तिलाही सुख होते हे आपण धरून चाललो होतो. स्त्रीचा वेग कसा ओळखायचा ? कदाचित महेश्वरदत्त आपणास सांगेल. उद्यानयात्रेत स्त्रियांतले भेद त्याने सांगितले होते.

प्रवासाच्या उत्तर भागात वात्स्यायनाला भेटलेला दुसरा व्यापारी संघ अगदी निराळा होता. तो विविध स्वरूपाचा होता. त्यातील व्यापारी प्रौढ होते. एकट्या-दुकट्या प्रवाशावर कोसळणाऱ्या संकटांची कल्पना असल्याने ते अशा प्रवाशांना बरोबर घेत होते.

त्यांच्यात स्त्रियाही होत्या. संघाची विसावा घेण्याची स्थळेही त्या कारणाने कमी अंतराने ठेवली होती. त्यांचा प्रवास मंद होता.

वात्स्यायनाला पुढे जाण्याची घाई होती तरी, पुढचा मार्ग नीट ठाऊक नसल्याने तो या संघाबरोबर राहिला होता. इथे मिश्र लोक असल्याने विविध विषयांवर बोलणी चालत. शिवाय पुढे लागणाऱ्या अरण्यांबद्दलच्या कथा या बोलण्यातूनच ऐकू आल्यावर तो एकटा जाण्याबद्दल साशंक झाला होता. पुढे अनेक अरण्ये होती. चोर कांतार, व्यालकांतार, निरूदक कांतार, अमनुष्य कांतार. त्या अरण्यांबद्दल बरोबरीचे कथावेल्हाळ प्रवाशांनी कथा सांगितल्या होत्या. त्यांतल्या सर्वच भयरूप होत्या. काहींना दुसऱ्यांना भीती दाखवायला आवडते. त्या कांतारांत काही भय नसेलही. कारण सांगणारेच अनेकदा त्यांतून गेले–आले होते.

पण त्या कथा विलक्षण होत्या. वृद्ध व्यापारी त्या ऐकताना समजून हसत, हळू माना डोलावीत. त्या असत्य आहेत असे म्हणत नसत. पण त्यांनीही कधी भीतारांच्या भयाने प्रवास सोडला नव्हता. कथा अनेक ऐकल्या. निरुदक कांतारात यक्षांनी फसवून आणल्याने, पाणी न मिळाल्याने नष्ट झालेले व्यापारी तांडे. चोरांनी येऊन, अंगावरची वस्त्रेही हिरावून नेलेली अशी चोरकांतारे, राक्षस येऊन माणसांना उचलून नेत ती अमानुष्य कांतारे.

या अशा कथांचा परिणाम जे प्रवासाला निघाले होते त्यांच्यावर फार होता. या कथा त्यांना ऐकाव्यात असे तर वाटे आणि भीतीही वाटे. रात्री त्याचा परिणाम त्यांच्यावर फार दिसे. काही मद्य घेऊन भीती विसरण्याचा यत्न करीत. काही नाचगाणी करीत अपरात्रीपर्यंत जागरण करीत आणि स्त्रीपुरुष शक्यतो परस्परांची संगत सोडीत नसत.

दासी होण्यास निघालेल्या सहा स्त्रियांनी तर पहिल्या कांतारातून प्रवास झाल्यानंतर एक एक पुरुष निवडला होता. जशी प्रवासांतील भीती वाढत होती तसा कामविकार वाढत होता. एका रात्री मध्यावर जाग आल्यावर वात्स्यायनाला त्याची जाणीव आली होती. बसला होऊन त्यानं निजलेल्या लोकांकडे पाहिले होते. कुठलीही स्त्री एकटी झोपलेली नव्हती. झोपेतले हात पुरुषांच्या अंगावर पडलेले होते. जागा झालेला एखादा स्त्रीला जवळ ओढीत होता. आणि तिला ते नको असल्याचे वाटत नव्हते. सकाळी उठताच ती जरा लज्जीत होऊन झटकन दूर होत होती एवढेच. आणि मग एका रात्री गणिका व्हावयास निघालेली तरुणी वात्स्यायनाच्या शेजारी येऊन झोपताच त्यालाही बरे वाटले होते. जवळ निजल्यावरही बाहेरून काही विक्राळ आवाज येताच ती कुशीत शिरत होती. ती एकसारखी बडबडत होती. आपल्या खेडेगावातील खेडवळ पण मार्मिक अशा अनेक गाथा तिने ऐकवल्या होत्या. दारावरून जाणाऱ्या वाटसरूंना आपण अनुकूल आहोत हे खुबीने सांगणाऱ्या नायिका. आणि अनुकूल स्त्री जवळ आली असूनही मूढपणाने दूर पळालेले अडाणी नायक. सांगता सांगता, हसता हसता बाहेरून भेसूर आवाज येताच ती त्याला बिलगत होती.

त्याच्या मनात अनेक विचार आले होते. ही भीतीने जवळ आलेली स्त्री आहे. भीती दावण्यास तिने स्वतःमध्ये काम उत्पन्न केला आहे. ही गणिका व्हावयाला निघाली आहे. हिच्याशी होणाऱ्या व्यवहारात अयोग्य काही नाही. पण अजून ही गणिका नाही. ती भीतीने विलगताच तिचे स्तन त्याच्या वक्षस्थलांवर दाबले जात होते. पण ते दूर असताना त्यांत आलेली कामेच्छा भीतीने विरलेली कळत होती. आपण कामेच्छेने तिला जवळ घेत असता, ती भीतीने थरथरत आहे आणि तिचा काम विरला असता आपण तिला कामेच्छेने जवळ घेत आहोत हे ध्यानात येऊन त्याचाही काम विरत होता. मग लहानपणी वेशमध्ये पाहिलेल्या गणिका आणि गणिका होण्यासाठी पित्याकडे आलेल्या स्त्रिया डोळ्यापुढे येत होत्या. त्या आठवणींनी त्याचे अंग शहारत असता उरलीसुरली कामेच्छा झटकली जाऊन तिच्या भोवतालचा त्याचा हात सैल पडत होता. असेच एकदा तिच्या अंगावरचा हात काढून घेऊन त्याने तिच्याकडे पाहिले होते. तिला गाढ निद्रा लागली होती. ◻

---

# उष्ण आंबे–थंड आंबे

---

शेवटच्या मुक्कामाहून भल्या रात्री निघून सकाळच्या पहिल्या प्रहराला व्यापारीसंघ पाटलीपुत्राशी आला.

दुरून पाटलीपुत्र नगरीचे लाकडी तट दिसू लागताच, सर्वांच्या मुखांतून निरनिराळे जयजयकार निघाले. उन–पावसाने काळा पडलेला तट उन्हात मनोरम दिसत होता. तट जसजसा जवळ दिसू लागला तसतशी जथ्यातील हालचाल द्रुत झाली. बैलगाड्यांची जनावरेही भरभर चालू लागली. डोक्यावरची आणि पाठीवरची गाठोडी, प्रवासी ठाकठीक बसवू लागले. पोशाख नीट करू लागले. धूळ बसून, वळचा होऊन वेडेवाकडे झालेले केस स्त्रिया मागे सारू लागल्या. पुरुषांनी हाताने केस चापचोपून बसवले. चालता चालता कोणी बुधल्यांतले तेल डोकींना लावत होते. वात्स्यायनाला त्यांचा हेवा वाटला.

तट अगदी जवळ येऊ लागला. आपापसांतील बोलणी वाढू लागली. प्रवासात माया उत्पन्न झाली होती आणि एकमेकांचा निरोप घेण्याची वेळ आल्यावर ती डोळ्यांत आणि शब्दांत मावत नव्हती. काही स्त्रिया डोळे पुसू लागल्या होत्या. एकमेकींना आलिंगन देत होत्या. तटाशी येण्यापूर्वी काही तटाबाहेर उगवलेली सुंदर फुले खुडावयास गेले आणि जरा वेळ थोडी निराळी हालचाल झाली. जरा वेळ तोंडे हसरी झाली.. पण नगरीच्या महाद्वारातून आत जाताच प्रत्येकजण पुन्हा गंभीर झाला. आता आपापल्या वाटेने जावयाचे आणि आपण ज्या कामासाठी आलो ते आता सुरू होईल. ते साध्य होईल– होणारही नाही. या विचारांनी ज्याला त्याला अंतर्मुख केले होते. वात्स्यायनाच्याही मनात अंगरिक्ष आणि वासंतिका यांचा विचार येऊन त्याची पावले मंद झाली. मन उदास झाले.

त्याचे औदासिन्य केवळ तेवढ्यामुळेच नव्हते. प्रवासी परस्परांचा निरोप घेत होते तेव्हा गणिका होण्यास निघालेल्या तरुणीने एका कटाक्षानेही रात्रीच्या प्रसंगाचे दाखविले नव्हते. रात्री ती आपल्यापाशी आली ते येणे केवळ भयापोटी ठरू नये, त्यावेळच्या स्पर्शांत कामस्पर्श होता असे तिने दर्शवावे असे त्याला वाटले होते. तिने तसे काहीच न दर्शवल्याने खेद वाटून, अपमान व्हावा तसा तो काही

काळ दुखावलेला राहिला होता. मग त्याच्या मनात आले होते– आपल्याला तिचे स्पर्श कामस्पर्श वाटले तसे ते नसतीलच. किंवा त्या भयप्रद रात्री, एखाद्या क्षणी मनातले भयनिवारण करायला तिने बुद्धचाच कामेच्छा मनात आणली असेल. कारण एकटी कामेच्छाच भयादि विचारावर मात करते आणि आपल्या कुशीत शिरल्यावर, भयाचे कारण न उरल्याने तिची कामेच्छा विरली असेल. तिच्या कामेच्छेचा तो किंचित क्षण आपण मनात मोठा केला इतकेच. भयापोटी ती आपल्या कुशीत आली हेच खरे.

चालता चालता तो थांबून रस्त्यावरच्या एका पारावर बसला. उत्तरियाने त्याने घाम पुसला. एक रथ धूळ उडवीत अंगावरून गेला. रथ दूर जाऊन, धूळ बसल्यावर तो उठला. मग पाटलीपुत्रातले रस्ते चालता चालता त्याच्या लक्षात आले की, पाटलीपुत्र निराळे आहे. असे म्हणतात पाटलीपुत्रातले नागरिक पाटलीपुत्रावर फार प्रेम करतात. निरनिराळ्या देशातून इथे लोक आलेले आहेत त्यामुळे विविधताही फार दिसते. पण भिक्षू जास्त. इथे स्वच्छताही जास्त वाटते. आता प्रथम आपल्याला प्रवाशांचे निवासस्थान शोधायला हवे. उद्यापासून त्या दोघांचा शोध सुरू करू. इथे एखादा गुरुबंधू असता तर? इथे बाभ्रवीय नक्की असतील. आपल्या पाठीवर त्यांच्याच गुरूचा ग्रंथ आहे हे त्यांना कळले तर ते आपल्याला नक्की घरी घेऊन जातील.

रस्त्याकडेच्या विस्तीर्ण आम्रवृक्षावर काही तरुणी सहकार भांडिका खेळत होत्या. पाडाला आलेले, शेंदरी, लाल आंबे, तरुणींच्या हालचालीने फांद्या लवल्या की हलत होते. वात्स्यायनाचे त्यांच्याकडे लक्ष गेले. वाटसरूंचे निवासस्थान यांनाच विचारू, त्याच्या मनात आले आणि झाडाखाली जाऊन तो उभा राहताच, खेळ थांबवून एका तरुणीने विचारले,

'आर्य! आपण प्रवासी आहात काय?'

वात्स्यायन म्हणाला,

'होय सुंदरीनो!'

त्याने सुंदरीनो म्हणताच साऱ्याजणी हसू लागल्या, एक म्हणाली,

'हा नट असावा'

'दुसरी म्हणाली',

'हा कवी असावा.'

तिसरी झाडावरून म्हणाली,

'तो म्हणतो ते सत्यच आहे. आपण साऱ्या सुंदर आहोत.' पुन्हा साऱ्याजणी हसल्या.

चवथी म्हणाली,

'मग त्याला आपण आपल्या सर्वांशी विवाह करायला सांगू या.'

एकीकडे त्या हसत होत्या. वात्स्यायन गोंधळून गेला. पाटलीपुत्रातील स्त्रिया चौसष्ट कामकलांनी संतुष्ट होतात असे आपण ऐकले ते खरे असेल पण त्या लज्जावंत असतात हे असत्य. त्या थट्टेखोर असतात आणि पांथस्थाची थट्टा करतात. पण हेही खरे नसेल. आपण मूर्ख दिसत असू. लज्जावंत स्त्रियांनाही थट्टेचे विषय आहोत असे वाटावे इतके मूर्ख दिसत असू. त्याने गोंधळलेले तोंड सावरीत झटकन विचारले,

'वाटसरूंचा वास कुठे असतो सांगाल का?'

'मी सांगते–मी सांगते–' असे ओरडत वरच्या फांदीवरची एक मुलगी खालच्या फांदीवर उतरत म्हणाली. मग खालच्या फांदीवर नीट बसत तिने मान पुढे करून विचारले,

'आर्य! काय हवय तुम्हाला?

'वाटसरूंचा वास हवा आहे.'

ती म्हणाली,

'ऐका! येथे सरोवरतीरी चक्रवाकांचा वास आहे. पाण्यात माशांचा वास आहे. कमलांत भ्रमरांचा वास आहे. वाटसरूंचा वास कुठे आहे मला ठाऊक नाही.'

वात्स्यायनाच्या लक्षात आले, ही आपल्या खोड्या काढीत आहे. तो म्हणाला,

'तरुणीनो! मी श्रांत, क्षुधित, तृषित आहे. दोन आंबे तरी खाली टाका.'

फांदीवरच्या तरुणीने विचारले,

'गरम की शीत?'

आपण आधीच इथून चालायला हवे होते. वात्स्यायनाच्या मनांत आले, आता काही तरी बोललेच पाहिजे म्हणून तो म्हणाला,

'आधी गरम मग शीत.'

हसत 'तथास्तु' म्हणून तिने एक आंबा खुडून वात्स्यायनाच्या समोर धुळीत टाकला. वात्स्यायनाने तो उचलला आणि त्याला लागलेली धूळ काढायला त्यावर फुंकारा मारू लागला. तरुणी हसत म्हणाली,

'बघा! होता ना गरम? फुंकार माराव्या लागल्या ना? आता शीत आंबा हवाय ना? तो देते.'

असे म्हणून तिने दुसरा आंबा खुडून वात्स्यायनाकडे फेकला. वात्स्यायनाने तो झेलताच ती म्हणाली,

'आहे ना शांत? यावेळी तुम्हाला फुंकार घालावी लागली नाही.'

सगळ्या हसू लागल्या. इथल्या तरुणी विलक्षण दिसतात. आंबा फेकणारी तरी विलक्षण दिसते. आंबा बोटांनी मऊ करता करता वात्स्यायनाच्या मनांत आले. तरुणी म्हणाली,

'आर्य! एका प्रश्नाचे उत्तर द्या. मग असे दोन पक्क आंबे देईन की तुमची भूक तहान दोहींचं हरण होईल. पहा आर्य! समोरच्या घराच्या उंबऱ्यात एक बालक बसलाय. तो रडता रडता का खातो आहे?'

वात्स्यायन म्हणाला,

'त्याला त्या पदार्थात लवण कमी वाटताय.'

तरुणी म्हणाली,–'आर्य! तुम्ही बुद्धिवान आहात. हे आणखी दोन आंबे घ्या. प्रवासात मलिन झाला असूनही तुमचे रूपही छपत नाही. तुम्ही उच्च कुलांतले दिसता. पण सावध असा! या पाटलिपुत्रांतील तरुणी तुम्हाला पदर पसरायला लावतील पहा.'

असे बोलून तिने झटकन एक आंबा वात्स्यायनाकडे उंच उडवून फेकला. आधीचे दोन्ही हातांत असलेले आंबे सांभाळीत न कळत वात्स्यायनाने फेकलेला आंबा झेलण्यास उत्तरियाचा पदर पुढे केला. व त्यांत तो झेलला. तरुणी म्हणाली,

पहा! पसरलात की नाही पदर!'

मग तिने वात्स्यायनाने पसरलेल्या उत्तरियात दुसरा आंबा

टाकला. सर्व तरुणी हसत होत्या. वात्स्यायन एक आंबा खात तसाच उभा राहिला. आपण असेच पुढे गेलो तर आपली केलेली थट्टा एका दिवसांत पाटलीपुत्रभर होईल.

'आर्य ! मिळाले ना आंबे ? आता का उभे आहात ? की सुंदर तरुणीचा सहवास सोडवत नाही ?'

वात्स्यायन एक हात वर करून म्हणाला,

'तरुणीनो ! तुम्ही आंबे देऊन माझी क्षुधा शांत केलीत. तुमच्यासाठी मला काही करता येताय का पहातोय.'

तरुणी म्हणाली,

'तुम्ही येथून जाण्यात सर्व मिळेल आम्हाला.'

वात्स्यायन म्हणाला,

'नाही नाही असे कधी झालाय ? उज्जयनीचे तरुण इतके कृतघ्न नसतात. खरं सांगायचं म्हणजे तुमच्यावर येणारे संकट तुम्हाल सांगावं की नाही याचा विचार करतोय.'

एक तरुणी म्हणाली,—' अग ! हा बावळट वाटतो पण फार धूर्त दिसतोय. मला वाटतं याला आपण आंब्यांनी मारून, चेचून पळवून लावावे.'

आंबे टाकणाऱ्या तरुणीनं म्हटलं,

'आर्य ! कसलं संकट ?'

तरुणी वेगवेगळ्या फांद्यावर बसल्या होत्या. कुणी डोळ्याआड येणारी फांदी बाजूला करून धरली होती. पालवी दाट होती. त्यातून दाटीवाटीनं लांब देठांवर आंबे लोंबत होते. त्यांच्या कानांजवळ आलेले आंबे कर्णफुलांसारखे वाटत होते. पालवीतून पलीकडे निरखून पहात वात्स्यायन म्हणाला,

महासंकट ! तरुणीनो ! महासंकट ! तो पहा ! तुमच्या पाठीमागे काळा वानर.'

वानर या शब्दाबरोबर मागे वळून न पहाताही मुलींनी भयाच्या किंचाळ्या मारीत भराभर खाली उड्या टाकण्यास सुरुवात केली. कुणी टांगून उड्या टाकल्या कुणी घसरत खाली आल्या. सगळे झाड गदगदा हलत क्षणांत रिकामे झाले. भूमीवर पाय टेकताच दाही दिशेला साऱ्या पळून गेल्या.

आता हसण्याची पाळी वात्स्यायनची होती. हसत तो नगरीकडे निघाला. प्रसंगाचा विचित्रपणा त्याच्या मनाला तो उत्साह देऊन गेला होता. ◻

---

## पक्षीमित्र सोमल

---

निवास शोधायला हिंडताना पाटलिपुत्राची ऐसपैस पसरलेली नगरी पाहून वासंतिका आणि अंगरिक्ष यांना येथे शोधून काढण्याचे काठीण्य वात्स्यायनाच्या ध्यानांत आले. प्रत्येक पुढील मुक्कामाला दोघे भेटतील असे प्रवासांत वाटत होते. पण आता या प्रचंड नगरीत वेशीपासून राजगृहापर्यंत ती कुठेही असतील.

हिंडता हिंडता एका देवालयासमोरच्या तलावाशी तो थांबला. चोहोबाजूंनी पायऱ्यांनी बंदिस्त केलेले तलावाचे पाणी काळेबिले दिसत होते. पाण्याचा सुखकारक थंडपणा लांबूनच अंगाला कळत होता. चहूबाजूला पायऱ्यांवर नागरिक स्नाने करीत होते किंवा वस्त्रे धुवीत होते. तलावाच्या मध्यावर कमलांचे बेट झाले होते. राजहंस आणि बदके त्याच्या आसमंतात तरंगत होती. काठावरच्या झाडावरील पक्षी नाना स्वर काढीत, पाण्यावरून सूर मारीत मासे पकडीत होते. वात्स्यायन पायऱ्या उतरून खाली गेला. हातातील बोचके बोचके शेजारी ठेऊन पायरीवर बसला. भोवताली चारीही बाजूनी असंख्य पायऱ्या वर चढत गेल्या होत्या. तळपायऱ्यांवर बसल्याने डोक्यावरच्या पायऱ्या आणि त्यावरची उंच झाडे आणि त्यामागचे सारे पाटलीपुत्र नगर अंगावर आल्यासारखे वाटत होते. धुणी आपटण्याचे आवाज घुमत होते आणि वरून येणारे अपरिचित आवाज त्यांत मिसळत होते.

थोड्या वेळाने स्नानासाठी वात्स्यायन पाण्यात शिरला. मग निथळत वर येऊन, अंग सुके करून धोतर बदलीत असता, पाठीमागून आवाज आला,—' महाराज ?'

वात्स्यायनाच्या तोंडात वेढून घेतलेल्या धूत वस्त्राचे टोक होते. त्याने मान मागे करून पाहिले. एक वयोवृद्ध पोट सुटलेला धिप्पाड नागरिक उभा होता आणि म्हणत होता,

'महाराज ! आपण आज माझ्याकडे अतिथी यावे अशी इच्छा आहे. माझी भार्या पात्रे वाढून अतिथीची वाट पाहत आहे. आपण इथे परदेशातून आलेले दिसता. माझे आतिथ्य स्वीकारावे.'

वात्स्यायन धोतराच्या निऱ्या करीत म्हणाला,

'महाराज ! आपला तर्क बरोबर आहे. मी उज्जयनीहून आलो आहे. प्रवाशांच्या निवासाचे स्थान शोधीत असता ह्या सुंदर तलाव पाहून शीण हरण करण्यास उतरलो. एवढे वस्त्र पिळून आलोच. आपण थांबावे.'

त्याने वस्त्र पिळून आपले गाठोडे नीट बांधले. तो ते काखेत अडकवू लागताच तो लठ्ठ नागरिक पुढे होत म्हणाला,

'महाराज ! मजजवळ द्या. अतिथीचा भार यजमानाने घ्यावा असे शास्त्र म्हणते.'

वस्त्र पिळीत असता वात्स्यायनाला जो संशय चाटून गेला तो क्षणभर बळावला. वस्त्र धुवीत असता अर्धवट तोंड फिरवून तिरप्या दृष्टीतून आपल्या लठ्ठ यजमानाकडे आणि आपल्या गाठोड्याकडे त्याने नजर ठेवली होती. गाठोड्यात महेश्वरदत्ताने दिलेली पिशवी होती. आणि आता हा आपले गाठोडे वाहायला मागतोय ! न ऐकल्यासारखे करून तो पावले टाकू लागताच त्याचा यजमान म्हणाला,

'महाराज ! आपण भिता हे बरोबर आहे. या नगरीतले धूर्त प्रवाशांना फसवायला टपलेले असतात. पण माझ्याकडे पाहा ! मी इतका लठ्ठ आहे की, मला दोन पावलांत तुम्ही पकडाल. तसेच वयाने मी वृद्ध आहे. आपण निःशंक असा.'

त्याने बळेच वात्स्यायनाच्या खांद्यावरचे गाठोडे घेतले. मग तो म्हणाला,

'महाराज ! आपल्या शंकेबद्दल मी आपणास दोष देत नाही. नदीत मासे तसे नदीच्या काठावर धूर्त अशी म्हण आहे. खरे सांगायचे म्हणजे ती म्हण माझीच आहे. मी दुसऱ्याच्या म्हणून म्हणतो. पण

या म्हणी माझ्याच असतात. मात्र पाटलिपुत्रातले काही आपल्या म्हणून सांगत असतात. आता मी धूर्तांबद्दल तुम्हाला सांगत होतो, त्याबद्दल एक कथा सांगतो, ऐका,

'एकदा वाराणशी नगरीत फार धूर्त झाले. गंगेच्या काठावर त्यांची इतकी गर्दी होऊ लागली की, यात्रेकरूंपेक्षा धूर्त जास्त होऊन, ते आपापसांत परस्परांना लुबाडू लागले. एका शहाण्या धूर्ताच्या ते ध्यानी येऊन त्याने सर्व धूर्तांची सभा घेऊन म्हटले, 'बंधूंनो ! आपली संख्या फार वाढली आहे आणि माशांना माशांनी खावे तसे आपण परस्परांस खात आहोत. परस्परांचे हित जाणून जर आपण गंगेचे वाळवंट वाटून घेतले तर सर्वांचे भले होईल.'

सर्व धूर्तांनी ते मान्य केले आणि त्याप्रमाणे वाळवंटात खुणेचे दगड ठेवून त्यांनी वाळवंटाचे समभाग करून वाटून घेतले. त्याचवेळी उज्जयनीत राहणारा सोमदत्त नावाचा एक ब्राह्मण, एका श्रीमंत शेठजीकडून प्रतिहार मिळवून वाराणशीतून जात होता. गंगेच्या काठी येऊन तो स्नानासाठी घाट शोधू लागला, एका धूर्ताच्या हद्दीतून दुसऱ्या हद्दीत जाताच दुसरा धूर्त त्याची पाठ धरीत होता, सोमदत्ताच्या ते ध्यानात आले नाही.

चवथ्या घाटावर सोमदत्त स्नानासाठी उतरला. एका पायरीवर आपले गाठोडे ठेवून तो पात्राकडे जाऊ लागला. तेथे आपल्या हद्दीत उभा असलेला धूर्त त्याला म्हणाला,

'महाराज ! आपण निःशंक स्नान करावे. मी आपले गाठोडे सांभाळतो.'

'सोमदत्ताने साशंक राहून स्नान केले. तो वर आला तेव्हा धूर्तास उभा पाहून आणि गाठोड्यातील द्रव्यही जागी पाहून त्याचा विश्वास वाढला. आणि जेव्हा धूर्ताने त्याला अतिथी म्हणून घरी बोलावले. तेव्हा तेही मानून तो धूर्ताच्या घरी गेला. भोजनाच्या वेळी धूर्ताची तरुण कन्या सोमदत्ताला वाढत होती. ती वाढीत असताच पहिल्या दृष्टीतच तिचे मन सोमदत्तावर जाऊन ती व्याकूळ झाली. ही गोष्ट सोमदत्ताच्याही ध्यानात आली. त्याचे मन तिच्यावर बसले नव्हते तरी, परक्या घरी आल्यावर वश झालेली कन्या माणसाला आधार होते हे जाणून, मधूनच ओठात हसून, मधूनच चोरटेपणे डोळे वर करून तिच्यावर आपले मन असल्याचे त्याने भासवले.

धूर्ताने भोजनोत्तर वामकुक्षी झाल्यावर अनेक विषय काढून गोष्टींच्या नादात दिवस मावळू दिला. सोमदत्ताला मग रात्री तेथे राहण्याचे ठरवावे लागले. संध्याकाळ होताच सोमदत्त आपल्या खोलीत संध्या करीत बसला असता धूर्त आणि त्याची पत्नी यांच्यातील संवाद त्याला ऐकू आला. धूर्ताने पत्नीला सांगितले की, सोमदत्ताचे गाठोडे तिने रात्री बाहेर आणावे. मग त्यातील द्रव्य काढून तो त्या जागी तेवढ्याच वजनाचे दगड ठेवील आणि मग तिने ते गाठोडे परत जाग्यावर नेऊन ठेवावे. संभाषण करून ते धूर्त जोडपे बाहेर गेले. आई-वडील गेलेले पाहून धूर्त कन्या आपले मनोगत कटाक्षांनी दाखवीत आली. तेव्हा तिच्याशी काही काल प्रेमालाप करून सोमदत्त म्हणाला,

'प्रिये ! मी अतिशय चिंतेत आहे. तू मला साहाय्य देशील तरच माझी सुटका होईल.'

कन्या म्हणाली,

'प्रिया ! तू हवे ते साहाय्य माग. चिंता करू नको.'

सोमदत्ताने तिच्या मातापित्यांतील संवाद सांगून म्हटले,

'प्रिये ! आता मी मजजवळचे द्रव्य तुला देतो. ते तू लपवून ठेव. द्रव्याच्या जागी मी दगड ठेवतो. रात्री तुझ्या मातेने माझे गाठोडे नेले की त्यांत द्रव्य नाही असे पाहून ता ते परत आणून ठेवील. अपरात्री तू माझे द्रव्य परत आणून दे. सकाळी आपण दोघे येथून पळून जाऊ.'

धूर्त कन्येने सोमदत्ताने सांगितल्याप्रमाणे केले, रात्री त्या धूर्त जोडप्याची झालेली निराशा काय सांगावी ! धूर्त कन्येने परत आणून दिलेले द्रव्य घेऊन सोमदत्त हळूच एकटाच अपरात्री घरातून बाहेर पडला' आणि मार्गाला लागला.

'महाराज ! या कथेवरून तुमच्या ध्यानात येईल की, माणूस महाधूर्तांच्या हाती सापडला तरी चाणाक्षपणाने वागल्यास त्यातूनही सुटका करून घेतो.'

ती गोष्ट ऐकल्यावर वात्स्यायनाच्या मनात धूर्त कन्येचाच विचार राहिला. त्याने विचारले,

'त्या धूर्त कन्येचे काय झाले ?'

'काय होणार ? तिने आक्रोश केला ? तिने आक्रोश केला असेल.'

वात्स्यायनाने विचारले,

'पण सोमदत्ताचे हे कर्म गर्ह्य नाही काय ?'

'नाही.' सोमदत्ताने योग्य आणि शास्त्राला धरूनच केले. असे म्हटले आहे की, प्रेमात पडलेली स्त्री आपल्या प्रियकरासाठी हवे ते करते. आपल्या शत्रूचा पराभव करण्यासाठी शत्रूच्या स्त्रीला वश करून घेण्यात दोष नाही.' मध्येच वात्स्यायनाने विचारले,

'आपण बाभ्रव्य वाचला आहे काय ?'

'हा सोमल बाभ्रव्याचा शिष्य आहे. पाटलिपुत्रात त्याचे जे थोडे खरे शिष्य आहेत त्यांत हा सोमल आहे.'

भोजनोत्तर प्रवासाच्या थकव्याने वात्स्यायनाची वामकुक्षी जरा लांबली. संध्याकाळी तलावावर जाऊन संध्या करण्यास दोघे निघाले तेव्हा वात्स्यायनाचे मन व्यग्र होते. संध्याकाळचा प्रकाश पसरू लागताच वासंतिका आणि अंगरिक्ष यांच्या दैवाबद्दल नाना शंका त्याच्या मनात येऊ लागल्या. त्याचे बोलण्यावरचे लक्ष उडाले. ते ध्यानात येऊन सोमलाने म्हटले,

'महाराज ! आपले मन काळजीने व्यग्र दिसते. आपली चिंता सांगाल तर काही उपाय पाहीन. असे म्हटले आहे की, अतिथीची क्षुधा आणि चिंता दोन्हीही यजमानांनी दूर करावी.'

वात्स्यायनाला त्या स्थितीतही हसू आले. हीही बहुधा त्याचीच म्हण असावी. तो बोलला नाही तेव्हा सोमल म्हणाला,

'आपल्या मनात मजविषयी अजून संशय दिसतो. या सोमलाबद्दल पाटलीपुत्रात कुणालाही विचारा. एवढेच कशाला ! माझ्याबद्दल येथील पक्षीही साक्ष देतील.'

सोमलाने हात वर करून काही आवाज काढले. मग कनवटीस हात घालून मूठभर धान्य त्याने काढले आणि मूठ पसरून तो उभा राहिला.

पाहता पाहता चारी दिशांनी झाडांतून लहामोठे विविधरंगी पक्षी येऊ लागले. सोमलाच्या डोक्यावर एक गिरकी घेऊन एकेकजण त्याच्या हातावर, खांद्यावर, डोक्यावर बसला. थोडयाच वेळात सोमल पक्षांनी झाकला गेला. पक्षांशी बोलून, चुचकारून, जरा वेळाने सोमलाने इशारा देताच पक्षी उडूनही गेले.

पायऱ्या उतरत सोमल म्हणाला,

'पाहिलेत? ही विद्या माझ्या तरुणपणी एका युवतीचे मन जिंकण्यासाठी शिकलो. महाराज ! निर्धन तरुणही, सधन तरुणीचे मन, कलेने युक्त झाल्यास जिंकतो. माझ्याहून कितीतरी धनवान अशा त्या युवतीचे मन जिंकण्याच्या मागे मी होतो. महाराज ! तो दिवस मला अजून आठवतो आहे. माझ्या प्रियेच्या घरासमोर ती खिडकीत उभी असता, अनेक वर्षे परिश्रम करून साध्य केलेल्या या पक्षीविद्येचा प्रयोग मी केला. दुसऱ्या दिवशी ती गांधर्वविवाहाला तयार झाली.'

'गांधर्वच का?' वात्स्यायनाने विचारले.

'महाराज!' सोमल म्हणाला, 'स्त्रीचे मन हा गहन शास्त्राचा विषय आहे. माझ्या विद्येचा एक चमत्कार, हा दुसरा. प्रियकराशी गांधर्वविवाह लावण्यांत जी लज्जत आहे ती यज्ञासमोरच्या विवाहात स्त्रीला वाटत नाही.'

वात्स्यायनाच्या मनात आले अंगरिक्ष (वासंतिकेने गांधर्वविवाहच केला असेल. पण दोघे पळून गेली हा मोठा फरक आहे. हा सोमल प्रियेला प्रसन्न करून सुखोपभोग घेत लठ्ठ होत घरी राहिला. त्या दोघांचे काय झालंय कुणास ठाऊक?

उतरून पाण्याशी आल्यावर पाय प्रक्षालीत सोमल म्हणाला,

'आपण संध्या उरकून घेऊ. नंतर तुम्ही आपली चिंता सांगा. परदेशात व्यग्र राहून काम निभावत नाही.'

संध्या आटोपल्यावर सोमलाने पुन्हा एकदा आग्रह केला तेव्हा वात्स्यायन म्हणाला,

'सोमल! आपण एवढ्या आपुलकीने विचारता तेव्हा माझी चिंता सांगतो. मी उज्जयनीहून आलो आहे. उज्जयनीस माझी सासुरवाडी आहे. तेथे माझा मेव्हणा अंगरिक्ष याचे एका कन्येवर मन जाऊन त्याची भूक-तहान हरपली. ही कन्या वासंतिका, एका सेनापतीची कन्या होती. लौकरच अंगरिक्षाने वासंतिकेचे मन हरण केले. पण वासंतिकेच्या मातापित्यांचा या लग्नाला विरोध असल्याने व लग्नात ते विघ्न आणतील या भयाने गांधर्वविवाह लावून दोघे उज्जयनीतून पळून इकडे आली आहेत. महाराज ! वासंतिकेचे मन जिंकण्यास मीच अंगरिक्षास प्रोत्साहन दिले होते. पण पळून जाण्याचा सल्ला मी त्याला दिला नव्हता. तरीही त्यांच्या पलायनाने सर्वांवर जे दुःख कोसळले आहे. त्याला मीच कारणीभूत झालो आहे.'

सोमल म्हणाला,

'दोघांनी तेथून पलायन केले हे अयोग्य केले.'

'महाराज! मी सांगितलेच की दोघे केवळ मुले आहेत. त्यांचे काय झाले असेल असे सारखे मनात येऊन माझी जी तगमग होते त्याचे काय सांगू? वासंतिकेचा पिता अत्यंत क्रोधी आहे. तो एकदा उज्जयनीच्या राजाचा सेनापती होता. त्याच्या क्रोधाला भिऊनच दोघांनी उज्जयनी सोडली.'

सोमल म्हणाला,

'तुम्ही सांगता अशीच एक कथा पाटलिपुत्रात घडली ती ऐका. फार पूर्वी पाटलीपुत्राच्या एका राजाला एक अतिशय सुंदर कन्या होती. तिच्या रूपाला भुंग्याप्रमाणे भुलून अनेक राजपुत्रांनी तिला मागण्या घातल्या. परंतु तिला कुणीही मनास येईना. एकदा आपल्या उद्यानात फिरत असता, पाटलिपुत्रात नशीब काढायला आलेला एक तरुण तेथें आला. दोघांनी परस्परांना पाहताच दोघेही कामविव्हल झाली. मग त्या तरुणाने वसंतोत्सवाचा समय साधून ओंडका नेणाऱ्या मजुरात शिरून राजवाड्यात आणि तेथून अंतःपुरात प्रवेश केला. हे त्याचे धाडस मोठेच होते. म्हटलेच आहे की, राजाच्या अंतःपुरात प्रवेश मिळण्याचे अनेक मार्ग अनेक लोक सांगतात. पण जाणाऱ्याच्या जीवाला असलेले भय सांगत नाहीत. सामान्य नागरिकांनी असले धाडस करू नये. असो.

'तो तरुण अंतःपुरात प्रवेश मिळवून स्त्रीवेषाने राहिला आणि राजकन्येचे मन त्याने पूर्णपणे जिंकले. नंतर राजवाड्यात उत्सव चालू असता आपल्या मित्रांच्या साहाय्याने राजकन्येला घेऊन तो पळून गेला.

'राजकन्येने आपला एक नोकर आणि दोन घोडी बरोबर घेतली होती. पाटलिपुत्र सोडल्यावर काही दिवस त्यांचा प्रवास ठीक झाला. परंतु एके ठिकाणी पाण्याचा अभाव असलेल्या अनीर कांतारातून जाताना पाणी शोधण्यासाठी निघताना त्या तरुणाने राजकन्येला एका झाडावर बसवले व झाडाखाली नोकरास संरक्षक म्हणून ठेवले.

तरुण पाणी शोधण्यास गेला. एकांत अशा अरण्यात सुंदर राजकन्येच्या सान्निध्यात कुणाचे मन चळणार नाही ! नोकराच्या मनात अभिलाषा उत्पन्न होऊन त्याने राजकन्येला बळे खाली उतरवून घोड्यावर घातली आणि निराळ्या मार्गाने तो पळून गेला.

पाणी घेऊन तरुण परत आला आणि राजकन्या, घोडा, किंवा नोकरही नाही असे पाहून, राजकन्येने आपणास फसवून नोकराबरोबर पलायन केले असे वाटून, स्त्रीजातीची निर्भर्त्सना करीत शोक करू लागला. मग काही वेळाने शोक आवरून त्याने मार्गाचे आक्रमणास सुरुवात केली. जर ते कांतार भयाण नसते, तर त्याने कदाचित शोकामुळे जीवच दिला असता, पण मार्गात पदोपदी जीवावर बेतणाऱ्या प्रसंगांमुळेच त्याने जीव दिला नाही. कांताराबाहेर येताच त्याला एक सुंदर राजधानी दिसली. त्या नगरीचा राजा मेल्यामुळे प्रधानादि मंडळी हत्तीच्या सोंडेत माळ देऊन राजाच्या शोधात होती. श्रांत असा हा तरुण वेशीशी जाताच हत्तीणीने त्याच्या गळ्यात माळ घातली. मग अनेक सुखोपभोग घेत तो तरुण राजपद भोगीत राहिला.'

गोष्ट संपताच वात्स्यायनाने विचारले,

'महाराज ! त्या राजकन्येचे काय झाले?'

सोमल म्हणाला,

'ठाऊक नाही. पळून जाणाऱ्या जोडप्यांचा असाही शेवट होतो. आणखीही दुसरे शेवट होतील.'

वात्स्यायनाने विचारले,

'महाराज! त्या तरुणाने राजा झाल्यावरही राजकन्येचा शोध का घेतला नाही?'

सोमल म्हणाला,

'मला विचारू नका. पण असे म्हटले आहे की, जो ग्रह एकदा मनात होतो तो तसाच राहतो. राजकन्या नोकराबरोबर पळून गेली असेच वाटत असल्याने, त्या तरुणावर तिला न शोधण्याचा दोष येत नाही. याबद्दल आणखी एक गोष्ट आहे ती ऐकल्यावर तुम्हाला पटेल.'

'एका गावात दोन नागरिक राहत होते. त्यांच्यात अतिशय वैर होते. एकाला एक कन्या आणि दुसऱ्यास पुत्र होता. वयात आल्यावर त्या मुलांची मने परस्परांवर अनुरक्त झाली. पण वडिलांच्या वैरामुळे विवाह होणे अशक्य असल्याने दोघेही गांधर्वविवाह करून पळून गेली. त्यांच्या गावापासून काही योजनांवर असलेल्या मणीपूर गावी ती आली. जवळ द्रव्य नसल्याने पोटास काय खावे ही चिंता उत्पन्न होऊन त्या तरुणाने गावात कामधाम मिळवण्याचा यत्न केला. पण त्या गावात फक्त कापसाचे कारखाने होते आणि तेथे केवळ स्त्रियांसच काम होते. आपल्याला काम नाही असे पाहून, तरुणाने पत्नीला तेथे कामास लावले.

असे अनेक दिवस गेले आणि तरुणाने स्वतःसाठी काम शोधणे सोडूनच दिले आणि पत्नीने मिळवलेल्या धनावर, प्रथम आळसात नंतर गावकंटकांबरोबर मद्य आणि जुगारात तो वेळ घालवू लागला.

त्याची पत्नी जिथे कामाला होती तेथील कोशाधिकारी फार विषयासक्त होता. कामाला येणाऱ्या स्त्रियांपैकी सुंदर तरुण स्त्रियांना तो पहाटेच्या काळोखात वेतनासाठी बोलावी आणि त्या त्याला अनुकूल झाल्यावरच वेतन देत असे. त्याच्या रीतीप्रमाणे त्याने तरुणाच्या पत्नीस पहिल्या वेतनाचे वेळी पहाटे बोलावले आणि तिच्यापुढे आपला मनोदय त्याने उघड करताच आणि तो आलिंगन देण्यास पुढे येताच त्याला झिडकारून ती धावत घरी आली. घरी येऊन झोपलेल्या नवऱ्यास उठवून तिने हे गाव सोडावे म्हणून हातीपायी पडून विनवले. परंतु पत्नीच्या धनावर विलास करावयाची सवय झालेल्या त्या तरुणाने ते मानले नाही. तेव्हा ती तशीच परत कारखान्यात गेली आणि अधिकाऱ्याचे मनोरथ तिने पूर्ण केले.'

कथा सांगून सोमल म्हणाला,

'महाराज! येथे त्या तरुणीने केले ते योग्यच केले. जर राजकन्येला नोकराशी विवाह करून रहावे लागले असले तर तो तिचाही दोष नाही. ती गणिका झाली असेल तरीही नाही. अनेक कारणांसाठी व अनेक परिस्थितीत स्त्रियांना आणि पुरुषांना व्यभिचारकर्म अगर नीच कर्म करावे लागते. बाभ्रव्याने तर म्हटले आहे की, राजकार्यासाठी, सूडासाठी, पोटासाठी जर व्यभिचारकर्म करावे लागले तर त्यात दोष नाही.'

सोमलाच्या कथा ऐकताना वात्स्यायन अत्यंत कष्टी झाला. तो म्हणाला,

'महाराज! तुम्ही ज्या कथा सांगितल्यात त्यावरून अंगरिक्ष आणि वासंतिका किती घोर प्रसंगात असतील असे माझ्या डोळ्यापुढे येत आहे. दोघांची वये लहान. जगाचे कुटिल डाव त्यांना ठाऊक नाहीत. अंगरिक्ष तर एकुलता एक पुत्र. त्याची आई ऊर बडवून घेत असेल. आणि फुलासारखी वाढवलेली वासंतिका, कातारांतून प्रवास करताना आणि नंतर नगरात राहिल्यावर तेथील कामी दुष्ट लोकांमुळे येणारी संकटे ती कशी निवारण करील हे मला कळत नाही.'

बोलता बोलता वात्स्यायनाने दोन्ही तळहातांत डोके दाबून धरले. तेव्हा सोमल म्हणाला,

'महाराज! माझ्या कथांमुळे आपल्या मनाला वेदना झाल्या त्यासाठी क्षमा करा. मी आपणास वचन देतो की, मी आपणास आपल्या शोधात सर्वतोपरी साहाय्य देईन. उद्या प्रातःकाळी उठताच आपण नगरीच्या उज्जयनी वेशीशी जाऊ. तिथे पाटलिपुत्रात येणाऱ्या प्रत्येकाची नोंद असते. वेसप्रमुख माझा मित्र आहे.'

[क्रमशः]


☆ ☆ ☆

दुसऱ्या आवृत्तीच्या वाटेवर असलेली

## राजहंस प्रकाशने

□ **सांगत्ये ऐका**
हंसा वाडकर
(तिसरी आवृत्ती)

□ **टॉलस्टॉय - एक माणूस**
सुमती देवस्थळे

□ **श्रीग्रामायन**
श्री. ग. माजगावकर

□ **शतपावली**
रवींद्र पिंगे

□ **पुरंदऱ्यांची दौलत**

□ **पुरंदऱ्यांची नौबत**
ब. मो. पुरंदरे

☆ ☆

पुस्तके

# भेदक चित्रणांचा संग्रह

# पक्षिणी

प्रा. द. ना. भोसले

सामान्य मध्यमवर्गीय माणसाला लपेटून घायाळ करणाऱ्या दाहक दुःखाचा आविष्कार करणाऱ्या 'निष्पर्ण वृक्षावर भर-दुपारी' या कादंबरीने श्री. ह. मो. मराठे मराठी कादंबरी-क्षेत्रात नावलौकिकास आले. मराठीतील ही कादंबरी एक मैलाचा दगडच ठरली. तिचा उल्लेख केल्याशिवाय कादंबरीच्या समीक्षकाला आता पुढे जाता येणार नाही.

या कादंबरीतून मानवी जीवनाकडे पाहण्याची स्वतंत्र आणि समर्थ अशी जी दृष्टी श्री. मराठे यांना प्रकट करता आली, तीच 'पक्षिणी' या त्यांच्या पहिल्या कथासंग्रहातही प्रकर्षाने जाणवते. त्यांचा हा पहिला कथासंग्रह असला तरी पहिलेपणाच्या कोणत्याच खुणा तेथे आढळत नाहीत. पापणी उघडी ठेवून ज्या जीवनाचा ते वेध घेतात, त्यावर प्रभुत्व ठेवूनच ते कथारूपात बद्ध करतात. त्यामुळे त्यांच्या प्रत्येक कथेवर मराठ्यांची कलात्मक मांड बसलेली जाणवते. त्यातूनच एकात्म अशी अनुभूतींची बंदिश ते लीलया साकार करतात आणि कथा मनोरंजनाच्या पलीकडे जाऊन मानवी जीवनाच्या गुंतागुंतीची भेदक रूपे वाचकांना पेश करू शकते.

या त्यांच्या कथासंग्रहात एकूण अकरा कथा समाविष्ट झालेल्या आहेत. या साऱ्या कथा वाचल्यावर आपल्या मनावर नोंदला जाणारा पहिला विशेष म्हणजे त्यातील कथात्मकता. पक्षिणी, कभिन्न, विरूप या साऱ्या कथा कथात्मकतेने नटलेल्या आहेत. पण त्यांच्या कथेतील ही कथात्मकता मुद्दाम घडविलेली नाही. आणि कथात्मकता असणे ही काही कथेची दोषात्मक बाब नव्हे. चांगली कथा कथात्म असूनही त्यापलीकडे जाऊ शकते. पुन्हा मराठ्यांच्या कथेतील कथात्मकता मुद्दाम सुबकही केलेली नाही; अन् मुद्दाम 'अॅबसर्ड' बनविलेली नसते. मनात घुमणाऱ्या जीवन-नाट्याला अपरिहार्यपणे लाभलेले हे कलात्मक रूप असते. पक्षिणीसारख्या कथेत ही कथात्मकता अधिकांशाने जाणवत असली तरी ती तेथेच थांबत नाही; तर त्या कथात्मकतेतूनच जीवनकलहाच्या जाणीवा रुंदावणाऱ्या नव्या भावदर्शनाकडेच तिचा प्रामुख्याने रोख असतो. आजकाल नवकथा म्हणून बिंदुस्रावी अशा अस्पष्ट रीतीने भावलेला एखादा विस्कळीत 'मूड' तितक्याच विस्कळीत अन् कथात्मकतेविना साकार केला जातो. केवळ पिंजण करून काढलेला 'मूड' हा नावीन्याची झिलई घेऊन अवतरला तरी वाचकांच्या जिव्हारी जाऊ शकत नाही. श्री. मराठे मात्र नावीन्याच्या हौसेपोटी आपल्या कथेला विकृत बनवीत नाहीत. ते कथेतूनच कथेला नावीन्य देण्यासाठी सातत्याने न जाणवणाऱ्या प्रयोगाचे प्रयत्न करीत असतात. असे प्रयोग-प्रयत्न 'हर गंगे' आणि 'क्ष' या कथेत आपणाला प्रभावी स्वरूपात जाणवतात.

श्री. मराठे यांची कथा आपल्या मनात घुमत राहते ती त्यातील दुःखाच्या केलेल्या चित्रणामुळे! या दुःखाची जात आणि दाहकता तरी एक आहे? मराठ्यांना जीवनातील व्यथा-वेदनांचेच मनापासून आकर्षण असावे. त्यामुळेच या दुःखाची नाना रूपे ते नेटकेपणाने उभी करू शकतात. हरगंगे-मध्ये पोरकेपणाचे अबोल दुःख आंघोळीच्या माध्यमातून प्रकट होते. माधुकरी कथेत पोटाच्या आगीतून निर्माण झालेले दुःख आहे. कभिन्नमध्ये कसलीही चूक नाही, एवढीच तिची चूक असलेल्या अनामिकेचे दुःख आहे. त्यातच नियतीनं वांझोटेपणाचा शाप दिल्यानं दुःखाची घातलेली बेडी आहेच. पक्षिणीमध्ये सामान्य माणसाच्या सर्वांगाला अन् जीवनाला भडकलेल्या तप्त परिस्थितीचे दुःख भेदकपणे चित्रित केलेले आहे. विरूप कथेत सुशिक्षित बेकारीचे मन कातरणारे दुःख प्रथमपरिचित होत असतानाच जोपासलेल्या मूल्यांना अभावितपणे जाणाऱ्या तड्याचेही दुःख आहे. भूक आणि भोग या दोन टोकात अडकलेल्या अश्राप माणसांच्या दुःखद चित्रणाबरोबरच नियती आणि परिस्थितीच्या लचक्यांनी घायाळ झालेल्या जीवनदर्शनाचेही येथे व्याकूळ करणारे चित्रण आहे. या चित्रणामुळे माणसाकडे पाहण्याची एक व्यापक समज वाचकांना आपोआप प्राप्त होते. आणि मानवी जीवन म्हणजे न भंगणाऱ्या दुःखाचा सागरच असतो की काय अशी आपली भावना बनते. त्याचबरोबर या आपल्या 'संकट' झालेल्या समाजधारणेत ज्या मूल्यांची आपण उपासना करतो, त्यांचाही पोटासाठी, नोकरीसाठी प्रसंगी सौदा करावा लागतो अशी भेदक जाणीव मराठ्यांनी 'व्रणार्त' कथेत दुःखाच्या भीषणतेवर भर देऊन करून दिलेली आहे. जगण्याची धडपड नि धडपडीचं जगणं यांच्या दुःखद चित्रणांचा हा कथासंग्रह आहे.

'पक्षिणी' संग्रहातील एक-दोन कथा सोडल्या तर साऱ्याच कथांतून जीवनाचे भेदक नाट्य साकारे झालेले आहे. दिवस-रात्रीच्या काटक्या मोडीत जाणाऱ्या माणसाच्या आयुष्यात निर्माण झालेले प्रचंड नाट्य मराठे प्रामुख्याने साकार करतात. हे नाट्य परिस्थितीचा परिपाक म्हणून अपरिहार्यपणे व्यक्तीच्या आयुष्यात निवडुंगाप्रमाणे जन्मास आलेले असते. बाबूराव बागुलांच्या कथांतून ज्याप्रमाणे भोवळ आणणारे आणि कल्पितालाही थक्क करून टाकणारे नाट्य अनुभवास येते, त्याच प्रकारचे भीषण नाट्य भेदक रूपात श्री. ह. मो. मराठ्यांनी आविष्कृत केलेले आहे. विस्मित करून टाकणारे हे नाट्य प्रसंगी भडक स्वरूपी वाटत असले तरी त्यांनी ज्या जीवनाशाचा आविष्कार करण्यासाठी निवडलेला असतो, त्याचे ते स्वाभाविक स्वरूपच असते. काही वनस्पती उत्तुंग वाढतात; काही कमरेएवढ्याच. श्री. ह. मो. मराठ्यांच्या कथेतील नाट्य असे उत्तुंग जाऊन अननुभूत जीवनाचे लोकविलक्षण दर्शन घडविते. बरे, त्यात कृत्रिमता आहे असेही नाही. अशा प्रकारचे चकित करणारे अनुभव आपण अवतीभवती पाहतही असतो. ते कथा प्रभावी करून टाकण्यासाठी मुद्दाम वलयांकितही करीत नाही. मूळातच या नाट्यासह तो जीवनानुभव त्यांच्या मनात कोठेतरी ठिणगीच्या रूपाने सातत्याने घुमत असला पाहिजे आणि एका कलात्मक अपरिहार्यतेच्या पोटीच श्री. मराठे त्यास शब्दरूप

देऊन मोकळे होत असावेत.

'मी थोडासा अश्वत्थामा' आणि 'सावित्री–१, २' या त्यांच्या कथा जराशा वेगळ्या आहेत. 'मी थोडासा अश्वत्थामा'-मध्ये निष्पर्ण वृक्षावर...या. कादंबरीची सावली पडल्यासारखी वाटते. मेलेल्या जीवनाची शिळी भाकरी चघळत जीवन कंठणाऱ्या नोकरमान्या सामान्यांच्या मनातली उबग येथे तुच्छतेच्या सुरात चित्रित केलेली आहे. या कथेचा रचनाधर्म इतर कथेहून भिन्न तर आहेच; पण अशा सांडलेल्या – गटारपाण्यासमान असलेल्या जीवनाची निरर्थकता त्यात तीव्रतेने प्रतीत करून दिलेली आहे. जगण्यासाठी कराव्या लागणाऱ्या धडपडीतून जीवनाची जी एक निरर्थकता माणसाला पदोपदी जाणवते, त्याचे भेदक चित्रण या कथेतून झालेले आहे. पण ही तुच्छता जीवनाला विटलेल्या आणि म्हणून जीवनाची हेटाळणी करणाऱ्या मनोवृत्तीच्या लेखकाची नाही. जीवन म्हणजे ईश्वराने केलेली कठोर शिक्षा अशी येथे लेखकाची धारणा नाही. जगण्याच्या प्रबळ ओढीतून निर्माण झालेली अगतिकता येथे कथाकाराला तुच्छ वाटते आहे. आजच्या अत्याधुनिक नागर-जीवनातील उद्ध्वस्तता भेदक रीतीने ते व्यक्त करू शकतात, ते याच कारणामुळे.

स्वार्थ, वासना, शरणता आणि क्रौर्य याचे ज्वालाग्राही थैमान घालणारी त्यांच्या कथेतील पात्रे प्रसंगी कोमलही झालेली आहेत. त्याग आणि भोग ही मूल्ये जशी उपजत असतात, तशीच ती परिस्थितीतून साकार होतात असा विचार सांगणारी त्यांच्या कथेतील व्यक्तिचित्रे कमालीची प्रत्ययकारी झालेली आहेत. वाचकांना अंतर्मुख बनविण्याची अमोघ शक्ती या त्यांच्या पात्रांमध्ये रसरसलेली आहे. त्यामुळे नवे–जुने, ग्रामीण–नागर हे कथाविषयाचे परिघ मराठ्यांच्या कथेमध्ये आपोआपच गळून पडतात.

ललितकलेची प्रेरणा व फल आनंद आहे, हे सर्वमान्य तत्त्व असले तरी, कथेतून मिळणारा आनंद कोणत्या घटकांच्या संमीलनातून आविष्कृत झालेला आहे यावर त्या कथेची उंची ठरत असते. रचनाबंधातून; नावीन्याच्या हव्यासापोटी केलेल्या प्रयोगातून, तिरकस भाषाशैलीतून, आकर्षक सजावटीतून मिळणारा आनंद असा उंच ठरत नाही. मानवी जीवनाची व्यामिश्रता धीट नेत्राने न्याहाळून तितक्याच धीटपणे तिच्या तळा–मुळाचा शोध कलात्मक घाटावर अभंगनिष्ठा ठेवून जो जीवनाचा साक्षात्कार घडवितो, त्याच्याच कथेतील आनंद हा विशुद्ध नि शाश्वत स्वरूपाचा ठरतो. तीच कथा सदैव मनात घुमत राहते. ह. मो. मराठे यांच्या माधुकरी, कभिन्न विरूप, पक्षिणी या कथांमध्ये ही शाश्वत आनंदाची शक्ती निर्माण झालेली आहे.

मराठ्यांची भाषा हा चर्चेचा स्वतंत्र विषय ठरावा. लखलखत्या धारदार पात्यासारखी, शब्दालंकारांनी अभिप्रेत असलेला भावानुभव नेटक्या–नेमक्या रीतीने व्यक्त करणारी, काव्य व नाट्य यांचा मिलाफ झालेली, प्रतीकांचा उचित व सौंदर्यात्मक वापर करणारी, नावीन्यपूर्ण प्रतिमा वापरूनही प्रत्ययकारिकतेस बाधा न आणणारी अशी ही भाषाशैली आहे. इतकी ताजी, टवटवीत आणि आशयघन अभिव्यक्ती फार कमी कथाकारांच्या जवळ पाहावयास मिळते. त्यांच्या प्रत्येक कथेतील अभिव्यक्ती ज्या जातीचा भावानुभव असेल, त्याला पोषक असे रूप धारण करून अवतरते. 'हरगंगे' कथेत ती धिमी, पण सौंदर्यगर्भ अशा गद्यकाव्यासमान वाटते. कभिन्नमध्ये थडथडणाऱ्या नाट्याच्या उग्र उष्णतेचा दाहक दर्प घडविते. पक्षिणीमध्ये ती कमालीची उत्कट बनते. 'क्ष' कथेमध्ये ती संवादरूपाने होते. प्रत्येक कथेतील भाषेचा विलास पाहिल्यावर सहज, स्वाभाविक आणि तरीही कमालीचे सामर्थ्य असलेली ही भाषा म्हणजे मराठ्यांच्या कथेचे बलस्थान आहे असे मनोमन वाटते.

मराठी कथेला पडणाऱ्या मर्यादा नष्ट करणाऱ्या आणि मानवाच्या शाश्वत स्वभावनिष्ठ जीवनधर्माच्या गुणदोषांचे नियती व परिस्थितीच्या संदर्भातले चित्रण करणाऱ्या या सकस अन् सौंदर्यसंपन्न कथा आहेत. या कथेबद्दल मराठे यांचे करावे तितके कौतुक कमीच आहे! ◻

पक्षिणी
ह. मो. मराठे
पुष्पक प्रकाशन, पुणे
पृष्ठसंख्या १२०. किंमत दहा रुपये

## The Seven Percent Solution

Edited by Nicholas Meyer
( Coronet Books )
Pages, 224, 60 Pense.

'सेव्हन् परसेंट सोल्यूशन' ही एक कोनन डॉईलची उत्कृष्ट Parody आहे. अर्थात लेखकानी म्हटले आहे की, त्यांनी ते पुस्तक फक्त संपादित केले आहे! लेखकाला म्हणे डॉ. वेटसननी लिहिलेले हस्तलिखित सापडले आणि ते इतक्या वर्षानंतर! शेरलॉक होम्सच्या बारीक सारीक गोष्टी तर इतक्या सूक्ष्म निरीक्षणाने टिपल्या आहेत की, आपल्यास असाच भास होतो की, आपण कॉनन डॉईलचे पुस्तक वाचत आहोत.

शेरलॉक होम्स कथांमध्ये आपण बऱ्याच वेळा वाचलेले असते की, त्यांना काही निरोप पाठवायचा असेल तर, ते तारेने पाठवीत. टेलिफोन वगैरे त्यांना आवडत नसे. त्यामुळे समोरच्या व्यक्तींना वाद घालायला भरपूर वाव मिळतो असे त्याचे म्हणणे! त्यानंतर त्याचा तो पाईप, त्याचे aguiline nose, त्याचे ते 'Elementary, watson!' वगैरे वाक्ये या सर्व प्रकारचे हुबेहूब वर्णन केले आहे.

एकदा होम्स 'ऑपेरा' पाहण्यात दंग झाले होते त्यावेळेला पुस्तकातला villain सुद्धा तेथेच असतो. पण दोन तास संगीत ऐकण्यात इतके दंग झालेले असतात की, ते देहभान विसरतात. होम्स संगीत ऐकण्यात गुन्हा आणि गुन्हेगार याविषयी अजिबात चर्चा करीत नाहीत! वॅटसन त्यांना सारखे प्रश्न विचारीत असतो. आता schopenhaeur च्या 'genius'च्या व्याख्येत होम्स नेमके येतात. Goniuses हे बऱ्याच वेळा will–less state संपादन करतात. आणि हे will–less state कला आणि मानवतेबद्दल अमाप दया यांचेमुळे येतो. कधी निसर्गाचे सौंदर्य, तर कधी लहान मुलाचा निरागसपणा, कधी एखादी उत्कृष्ट कलाकृती यात आपण इतके रंगून जातो की, आपल्या अस्तित्वाचा विसर पडतो. म्हणजे subiect (स्वत:ला विसरणारा) object

(कलेची वस्तू) मध्य विलीन होतो. अशा धुंदीत तो नियतीच्या क्रूर वास्तवतेच्या पलीकडे जातो.

ज्यांनी शेरलॉक होम्सच्या कथा वाचल्या असतील त्यांना ही होम्स–वॅटसनची नवीन कथा फारच मजेशीर वाटेल. आणि ज्यांनी सिगमंड फ्रॉईड वाचला असेल त्यांना थोडासा धक्का बसेल. ज्यांनी होम्स व सीगमंड फ्रॉईड दोन्ही वाचले असतील त्यांचा आनंद तर हे पुस्तक वाचून द्विगुणीत होईल.

शेरलॉक होम्सला विसाव्या वर्षापासून 'कोकेन'चे व्यसन जडते. या व्यसनाच्या आहारी ते जेव्हा जात तेव्हा दिवसातून ३ वेळा ते 'सेव्हन पर्सेंट' (cocaine) ची इंजेक्शन्स घेत. या व्यसनाच्या नादात ते वाट्टेल ते बोलत. ते सारखे 'प्रोफेसर मॉरियार्टी' विषयी बरळत असतात. 'तो मॉरियार्टी म्हणजे अट्टल गुन्हेगार आहे–पण साधासुधा नव्हे तर अगदी सराईत गुन्हेगार!' असे ते वॅटसनला सांगत. रात्री मॉरियार्टीच्या घरी जाऊन पाळतसुद्धा ठेवीत. व्यसनाचा कैफ उतरला की परत जैसे थे. मॉरियार्टीबद्दल ब्र नाही!

खरे म्हणजे शेरलॉक होम्सच्या आयुष्यात एक मोठी ट्रॅजेडी झालेली असते. त्यांची आई परपुरुषाशी संबंध ठेवते. त्यामुळे होम्सचे वडील रागाच्या भरात होम्सच्या आईचा खून करतात! नंतर स्वतः आत्महत्या करतात. या गोष्टीचा शेरलॉक होम्सवर कायमचा परिणाम होतो. 'न्याय झालाच पाहिजे!' हे त्यांचे ब्रीदवाक्य बनते. ते स्त्री–द्वेष्टे जरी बनत नाहीत, तरी त्यांच्या आयुष्यात स्त्रियांशी कधी संबंध आला तर ते त्यांना कठीण जाई. ते व त्यांचा भाऊ 'मायक्रॉफ्ट' आजन्म ब्रह्मचर्य पाळतात. (सात वर्षे होम्सबरोबर वास्तव्य करून नंतर वॅटसनला कळते की, होम्सला सख्खा भाऊ होता!)

अर्थात होम्सनी किंवा त्यांच्या भावाने या गोष्टी कुणालाच सांगितलेल्या नसतात. होम्सचे कोकेनचे व्यसन सुटावे म्हणून फ्रॉईड त्याला हिप्नॉटाईझ् करी. व्यसन सुटल्याबद्दल होम्स फ्रॉईडचे फार आभार मानतात व तुमचे ऋण कसे फेडू असे विचारतात. त्यावर फ्रॉईड त्यांना म्हणतो, 'आणखीन एकदा मला तुम्हाला हिप्नॉटाईझ् करावयाचे आहे.' त्या हिप्नोसिस्मध्ये या सर्व गोष्टी बाहेर येतात.

या पुस्तकामुळे सर्वात जास्त धक्का कुणाला लागला असेल तर तो कॉनन डॉईल आणि फ्रॉईड्ना! त्यांच्या थडग्यात ते अगदी उसासे सोडत असतील! एकदा (जेव्हा फ्रॉईडकडे ट्रीटमेंटसाठी आले असताना) होम्स वॅटसनला 'ब्रेनलेस क्रीपल' व इतर शिव्याशाप देतात तेव्हा वॅटसन इतका वैतागतो की, (होम्स खोलीबाहेर पळून जात होते या निमित्ताने) तो होम्सला खाडकन् मुस्कटात मारतो! शेरलॉक होम्स साहित्यात असे आधी कोठेच झाले नाही. डॉईलला हे मुळीच आवडले नसते. फ्रॉईडचे तर या पुस्तकात इतके हाल केले आहेत की, आपल्याला बघवत नाही. होम्स एकदा गुन्हेगाराचा पाठलाग करण्यासाठी दफनक्रियेत जात असलेली गाडी अक्षरशः हिसकावून घेतात. त्यावेळी आत फ्रॉईडसाठी जागाच नसते आणि तो बिचारा बाहेर लोंबकळत उभा राहतो न राहतो तोच होम्स गाडी जोरात पळवतात आणि आपला धीरगंभीर फ्रॉईड (वाऱ्याने केस विस्कटलेले) कसाबसा चिकटून राहातो. आता विस्कटलेल्या केसात फ्रॉईड अशी कल्पना तरी करवते का? ज्यांनी फोटोतला Well- Groomed फ्रॉईड पाहिला असेल त्यांना यातले मर्म कळेल.

व्हिएन्नात होम्स फ्रॉईडच्या घरी ट्रीटमेंट घेत असतानाच तेथे एक रहस्य उलगडताना नेहमीप्रमाणे शेरलॉक होम्स बॉस बनतात व फ्रॉईडवरसुद्धा कामे सोपवतात. फ्रॉईड तर शेवटी इंजिनमध्ये कोळसे टाकण्याचे कामसुद्धा करतो! (आता होम्सला पण शेवटी कोळसे टाकावे लागतात ती गोष्ट वेगळी–कारण त्यांचा पेशाच डिटेक्टिव्हचा. तेव्हा ते सर्व ओघाने आलेच.) पण डॉ. सीगमंड फ्रॉईड एक. स्वतःच्या घरी त्यांनी शेगडीत कोळसे टाकलेच असतील म्हणा, पण अट्टल गुन्हेगाराच्या मागे (एक रेल्वे इंजिन हायजॅक करण्यात सहभागी होऊन) लागून त्या इंजिनमध्ये कोळसे टाकण्याचे काम फ्राईडवर!

डॉ. सिगमंड फ्रॉईड जरी किती धीरगंभीर, Sad-eyed होता तरी त्याला विनोदी बुद्धी होती. त्यामुळे कदाचित तो थडग्यामध्ये उसासे टाकल्यानंतर amuse निश्चितच झाला असेल! कैसरचा एकच हात असतो त्यामुळे तो कसा वागतो याचे मनोविश्लेषण फ्रॉईड होम्ससमोर करतो होम्स एकदम फ्रॉईडवर खूप होतात व त्याला म्हणतात, 'माझी सूक्ष्म निरीक्षण करण्याची व त्यातून अचूक अंदाज काढण्याची रीत तुम्ही घेतली आहे.' त्यावर फ्रॉईड त्याला विचारतो, 'तुमच्या रीतीचे तुम्ही पेटंट घेतले आहे काय?' अशा रीतीने फ्रॉईड दोन-तीन वेळाच चमकतो.

महान व्यक्ती एकमेकांच्या अहंकाराला कशा गुदगुल्या करतात व ते त्यांना किती प्रिय असते ते फ्रॉईड व होम्स जेव्हा एकमेकाला Compliments देतात तेव्हा कळते. होम्स म्हणतात की, फ्रॉईडचे संशोधनाचा far-reaching effect होईल तेव्हा फ्रॉईड होम्ससमोर अक्षरशः वाकून प्रशंसा स्वीकारतो.

शेवटचा 'इंजिन चेस' थोडा अतीरंजित वाटतो, पण तेवढे सोडले तर पुस्तक अगदी A Grade चे आहे.

— जे. एन्. पोंडा

---


## Some New Titles Received

| | |
|---|---|
| 1. Seven Percent Solution (Bestseller–Sherlock Holmes becomes a Cocaine addict & Fireud Cures him!–Novel Nicholes Meyer | Rs. 12·00 |
| 2. The Rampa Story : Lobsang Rampa | Rs. 7·00 |
| 3. The Romantic Manifesto : Ayn Rand | Rs. 11·75 |
| 4. Line of Duty : Ernest Tidyman | Rs. 12·00 |
| 5. Hollywood's Greatest Love Stories–(True Romances of top-notch Hollywood Stars)– Dick Kleiner | Rs. 18·35 |

**मराठी**

| | |
|---|---|
| ६. यशवंतराव–इतिहासाचे एक पान (चरित्रग्रंथ) रामभाऊ जोशी | रु. २३·०० |
| ७. साने गुरुजींची जीवनगाथा (चरित्र) राजा मंगळवेढेकर | रु. ४०·०० |
| ८. राजर्षी शाहू गौरव ग्रंथ-संपादित ग्रंथ | रु. १५·०० |
| ९. एक प्रवास एक शोध– ("ए मोमेंट इन टाईम"चे नलिनी पंत यांनी केलेले मराठी रूपांतर)–अप्पा पंत | रु. १४·०० |
| १०. कल्पवृक्ष–(पूर्वार्ध व उत्तरार्ध) (महाभारतावरील कादंबरी) भा. द. खेर | प्रत्येकी रु. २१·०० |

**फिनिक्स लायब्ररी**

७२७ सदाशिव, पोस्टासमोर–पुणे ३०.



# काळ्या किल्ल्यातील अभियोगाची कहाणी १९४८-४९

## पु. ल. इनामदार

### प्रकरण एकोणीस : भरतवाक्य

मी सिमल्याहून ग्वाल्हेरला ८ जून रोजी परत आलो होतो.

मी ग्वाल्हेरला येताच सौ. परचुऱ्यांना भेटलो होतो. सिमला येथे काय काय नि कसे कसे झाले याचा सगळा वृत्तान्त मी त्यांना सांगितला. अंबाला येथे मी डॉक्टर परचुऱ्यांना भेटलो होतो त्यावेळची हकीकतही सांगितली. त्यावेळी मी सांगितलेले सर्व ऐकून त्या दोघी सासवासुनांच्या–डॉक्टरांच्या पत्नी नि डॉक्टरांच्या मातोश्री यांच्या–डोळ्यातले पाहिलेले कृतज्ञतेचे अश्रू मी कधीही विसरणार नाही. ते पाहूनदेखील माझ्यामधला वकील त्या दोघींना वारंवार हेच बजावीत होता की, शेवटी अपिलामध्ये जो निर्णय होईल तीच खरी आज्ञा. सध्या ती केवळ आशाच आहे. मी त्यांना लगेच हेही सांगत होतो की, अपील कोर्टाच्या तिघाही न्यायमूर्तींनी कोर्टात सर्वांसमोर स्पष्टपणे सांगितले की, ते कबुलीजबाब मुळीच स्वीकार करणार नाहीत. साक्षीदार मधुकर काळे नि जगदीश गोयल यांच्या संबंधाने न्यायमूर्ती महोदयांनी कोर्टात सर्वासमक्ष जे काही बोलून दाखविले आहे, ते ऐकून या साक्षीदारावरही ते मुळीच विश्वास ठेवणार नाहीत. आणि म्हणून मला स्वतःला अंतिम निर्णय काय होईल याविषयी मुळीच शंका नाही. तरीपण शेवटी जो निर्णय देतील त्यावरूनच तो सुटकेचा की काय, हे समजेल. मी त्या दोघींना असेही सांगितले होते की, यदाकदाचित कोर्टाने डॉक्टरसाहेबांना सोडले तरी, केंद्र शासन किंवा राज्य शासन त्यांना सुखासुखी घरी येऊ देईल की नाही, याची मला शंका आहे. त्यासाठीही आपण तयार राहावे, हे शहाणपणाचे. डॉक्टरसाहेबांना सुटकेनंतरही सुरक्षा कायद्याखाली निरोधात ठेवणे सोपे आहे नि त्या आज्ञांचे निराकरण करून घ्यायलासुद्धा कमीत कमी सहा महिने लागतील. माझे हे तर्कट त्या दोघींनी नीट ऐकून समजून घेतले होते. वकिलाला आपल्या पक्षकाराला न दुखावता समजाविणे किती कठीण असते, याची कुणाला किती कल्पना आहे कोण जाणे? वकील मंडळी पुष्कळवेळी शुष्क, पाषाणहृदयी म्हणून बदनाम होतात, ते याच कठीण विद्येच्या अभावी. अर्थात समजूतदार पक्षकार मिळणे हे वकिलाचे भाग्य.

डॉक्टर परचुरे जर सुटून आले तर, त्यांना काय पथ्ये पाळायला सांगायची, याचाही विचार त्याचवेळी मी मनातल्या मनात करीत होतो. त्यांच्या कुटुंबाची झालेली वाताहत मी डोळ्यांनी प्रत्यक्ष बघत होतो.

अपिलांचा निर्णय पूर्व पंजाब उच्च न्यायालयाने २१ जून १९४८ रोजी सिमला येथे घोषित केला त्याची बातमी संध्याकाळी आकाशवाणीवरच्या ६ वाजताच्या वृत्त वाचनात ऐकायला मिळाली. डॉक्टर परचुऱ्यांना महात्मा गांधी खून खटल्यातल्या सगळ्या आरोपांमधून निर्दोष मुक्त करण्यात आले होते. डॉक्टर परचुऱ्यांच्या संबंधातला जज्ज आत्मचरणींचा निर्णय व शिक्षा दोन्हीही रद्दबातल–निस्सार व प्रभावहीन घोषित करण्यात आल्या होत्या. माझे दुसरे पक्षकार गोपाळ गोडसे यांचे अपील अस्वीकार झाले होते. तरीपण पूर्व पंजाब उच्च न्यायालयाच्या तिघाही माननीय न्यायमूर्तींनी वेगवेगळ्या आज्ञा लिहून पण एकमताने अपिलंट गोपाळ गोडसे याला दया दाखवून सोडून द्यावे, अशी अनुशंसा शिफारस लिहिली होती.

माझ्या अपेक्षेप्रमाणे डॉ. परचुऱ्यांच्या बाबतीत झाले. अपील कोर्टाच्या डॉ. परचुऱ्यांच्या सुटकेच्या आज्ञेचे विधिनियमानुसार पालन होऊन त्यांना आपल्या कोठडीतून बाहेर बंदीगृहाच्या प्रवेशद्वारापाशी बाहेर काढण्यात आले. बंदीगृहाच्या कागदोपत्री डॉ. परचुरे यांना विधिवत् मुक्त केल्याची नोंदही झाली नि डॉक्टरांनी सुटकेचा पहिला निःश्वास सोडला नसेल तोच शासनाने त्यांच्यावर निरोध आज्ञेची बजावणी करून त्यांना पोलिसांच्या हवाली केले. त्यानंतर त्यांना पोलीस बंदोबस्तात ग्वाल्हेर येथे आणण्यात आले व

तेथे मध्यभारत शासनाने त्यांच्यावर सहा महिन्यांसाठी ग्वाल्हेर जिल्ह्यामधून निर्वासनाचा आदेश देऊन त्यांना ग्वाल्हेरला राहू दिले नाही. डॉ. परचुऱ्यांनी मध्यभारताच्या देवास या गावी माळव्यात जाऊन राहायचे ठरविले. कारण तेथे त्यांची मित्रमंडळी होती. या सगळ्या बनावाची मला कल्पना होतीच व मी तसे परचुरे मंडळींना सावधान करून ठेवले होते. त्यामुळे काही धावपळ, त्रास असा विशेष झाला नाही. डॉ. परचुरे व मध्यभारत शासन यामध्ये आवश्यक ती नोटीसबाजी झाली व हायकोर्टामध्ये हेबियस कॉर्पसच्या रिटची तयारीही झाली. परिणाम एवढाच झाला की, सहा महिन्यांचा काळ संपविल्यावर डॉ. परचुरे ग्वाल्हेरला घरी आले !

डॉक्टर परचुरे हे ग्वाल्हेरला परत आल्यावर त्यांचे वीरोचित स्वागत करण्याच्या भरीला कोणी पडू नये, यावद्दल मी कटाक्षाने सर्वांना सूचना देऊन ठेवल्या होत्या. माझे सौभाग्य की, डॉ. परचुऱ्यांच्या चेलेमंडळींनी, कोणाच्या का इच्छेला मान देऊन असेल, असे करण्याचे टाळले व डॉक्टर परचुरे पुन्हा गृहस्थाश्रमी होऊन आपल्या कुटुंबाकडे व आपल्या डॉक्टरी व्यवसायाकडे लक्ष देऊ लागले. तेव्हाच मी डॉक्टर परचुरे यांना काही दिवस कसल्याही राजकारणात न पडण्याबद्दल सांगितले होते.

डॉक्टर दत्तात्रेय सदाशिव परचुरे आणि त्यांचा वकील मी, आम्ही दोघेही आजही परमपिता परमेश्वराच्या असीम कृपाप्रसादाने जिवंत असून आपापले श्रान्त जीवन समाधानाने आमच्या सहधर्म चारिणींच्या सोबतीने घालवीत आहोत. डॉक्टर परचुऱ्यांचे वडील बंधू श्री. कृष्णराव परचुरे–१९४९ नंतर यथाकाल आपल्या शासकीय सेवापदावर रुजू होऊन यथाक्रम सेवानिवृत्त झाले व आजही आपले निवृत्तीवेतन वसूल करीत सद्गुरु जे. कृष्ण मूर्तींच्या मार्गदर्शनाने समाधानात जीवन जगत आहेत. डॉक्टर परचुरेही आपला २ फेब्रुवारी १९४८ ला सक्तीने बंद झालेला डॉक्टरी–व्यवसाय पुन्हा पंचवीस वर्षे करून व्यवसायनिवृत्त झाले आहेत. त्यांचे मोठे चिरंजीव नीलकंठ परचुरे हे ग्वाल्हेरला अॅडव्होकेट असून वकिली करीत आहेत. डॉक्टरांचे धाकटे चिरंजीव उपेंद्र ग्वाल्हेर येथेच डॉक्टरांचाच व्यवसाय करीत आहेत.

डॉक्टर परचुरे यांच्या धरपकडीच्या वेळी पळून जाऊन महात्मा गांधी खून खटल्यामध्ये फरारी अभियुक्त म्हणून आरोपित झालेले गंगाधर दंडवते, गंगाधर जाधव व सूर्यदेव शर्मा हे लालकिल्ल्यातील अभियोगपर्व व सिमला येथील अभियोगपर्व संपेपर्यंत यशस्वी रीतीने भूमिगत राहिले व डॉक्टर परचुऱ्यांच्या सुटकेनंतर यथाकाल प्रकटही झाले. मध्यभारत किंवा केंद्र शासकांनी त्या तिघांविरुद्ध पुन्हा दुसरा अभियोग चालविण्याचा प्रयत्नही केला नाही ! श्री. गंगाधर दंडवते लष्कर ग्वाल्हेर येथे व पंडित सूर्यदेव शर्मा हे ग्वाल्हेर टीकमपूर येथे बिर्ला मिलचे मजदूर अधिकारी म्हणून आपापले जीवन सुखेनैव घालवीत आहेत. श्री. गंगाधर जाधव हे नागपूरकडे आपले जीवन चरित चालवीत आहेत.

गोपाळ गोडसे यांना २७ एप्रिल १९४९ रोजी अंबाला बंदीगृहात भेटल्यानंतर आजवर पुन्हा त्यांची माझी भेट झाली नाही. पत्रव्यवहारही झाला नाही. मला त्यांच्याविषयीची माहिती त्यांच्या 'गांधी हत्या आणि मी' या पुस्तकावरून झाली तीच. त्यावरून मला गोपाळ गोडसे यांना पूर्व पंजाब उच्च न्यायालयाच्या अखंड पीठाद्वारा अनुशंसित दयामुक्तीचा लाभ तर देणे दूर राहिले, बंदीगृह नियमानुसार अर्जित कारा कालशमनाचा लाभही न मिळता सारा शिक्षाकाल भोगून त्यानंतरही त्यांच्यामागचे निरोधबदी–आज्ञाचे शासकीय सत्र चालूच राहिले, असे वाचले. सध्या ते आपला मोकळा वेळ लेखन व्यवसायाच्या कामी लावतातसे दिसते. इत्यलम् ।

¤

लालकिल्ल्यातील अभियोगपर्व १९४८ व त्यातील अपीलपर्वासंबंधीची माझी कहाणी संपली. आता या नाट्यमय पर्वाच्या कहाणीचे भरतवाक्य कसे लिहू ? मी माझ्या वाचकांची अनुमती गृहीत धरून येथे उपसंहारात्मक असे माझे काही विचार लिहीत आहे.

ही सारी कहाणी मुख्यतः एका वकिलाने अभिभाषकाने सांगितली आहे. अभिभाषकाला दुराशयी समजणारेच फार, ह्याची जाणीव मला नेहमीच असल्याने ही लालकिल्ल्यातील अभियोगपर्व १९४८ ची कहाणी सांगताना वकिलाचेच वकीलपत्र घेऊन वाचक जनतेच्या न्यायालयासमोर उभा राहून आपले निवेदन सांगायचा मी प्रयत्न केला आहे. वकिली हे व्यवसायचरित म्हणून स्वीकारल्यावर तो व्यवसाय करताना मला ज्या माझ्या अनुभवांनी नकोसे केले त्यांनीच रुष्ट होऊन हे वकीलपत्र मी स्वतःच्या वतीने घेतले, असे म्हणता येईल.

लालकिल्ल्यातील अभियोगपर्वातला एक अभियुक्त 'मी स्वतः निर्दोषी आहे' असे म्हणून मला वाचवा असे म्हणत आहे. तो निर्दोषी असावा, त्याभोवती उभ्या केलेल्या परिस्थितीने त्याचा बळी घेतला असावा, असे मानायला काही आधार दिसत आहेत, तेव्हा त्याला वाचवायचा प्रयत्न करावयाचा पत्कर घ्यावयाचे काम मजवर टाकण्यात आले, ते काम मजवर पडावे असे काही मी केले–इच्छिले नसताही मजवर ते टाकण्यात आले. माझ्या ध्यानीमनी नसलेल्या कारणांनी मी त्या परिस्थितीला कारण झालो असेन, असे वाटून हा पत्कर मी माझे शुचिव्रत कर्तव्य असे मानून घेतला. दुसऱ्या अभियुक्ताचे वकीलपत्र मी अभियोगपर्व आरंभ झाल्यावरच एकाएकी कसलीच तयारी केली नसताना, स्वेच्छेने घेतले. या अभियोगपर्वामुळेच ज्या नथूरामला मी भेटलो, ज्याला मी समजू लागलो, त्या महाशयी माणसाच्या उदारधी इच्छेचा आदर करावा म्हणून ते दुसरे वकीलपत्र घेतले,

हे दुसरे वकीलपत्र मी एक कपर्दिकही पारिश्रमिक म्हणून न घेता पत्करले होते.

मी माझ्या दोन्ही अभियुक्तांचा बचाव करण्याचा प्रयत्न केला तो बचावपक्षाकडून खरा वा खोटा कसलाही बचाव पुरावा न देता केला; केवळ अभियोगपक्षाचा पुरावाच कसा अविश्वसनीय, अग्राह्य आहे, हे उघड करून दाखवीत, न्याय संगतरीतीनेच केला होता.

मी यापूर्वीच कबूल केले आहे की, ही दोन्ही कामे मला माझ्या वकिली व्यवसायचरितात आकस्मिक कारणानेच मिळाली होती. तसेच हेही मी कबूल केले आहे की, पूर्व पंजाब उच्च न्यायालयाचे आदरणीय न्यायमूर्तिगण माझ्या बाजूनेच निर्णय देत आहेत, हे बघायला मिळणे ही सुद्धा एक अभावित घटना होती. त्या माननीय

न्यायमूर्तींनी माझ्या एका पक्षकाराला त्याविरुद्ध केलेल्या सगळ्या आरोपांमधून दोषमुक्त ठरवून निर्दोष सोडून दिले व दुसऱ्या पक्षकाराला दयेची सूट द्यावी, अशी एकमताने अनुशंसा लिहिली. आदरणीय उच्च न्यायालयीन अखंडपीठाच्या न्यायमूर्तींच्या एकमताने केलेल्या अनुशंसेचा आदर राष्ट्राच्या शासकांनी केला नाही, याबद्दल काही टीकात्मक लिहावयाचे हे स्थान नव्हे.

ही कहाणी सांगताना वारंवार मी 'सत्य हे बहुधा फार एकाकी असते. न्यायालयांमधून 'मी खरे बोलेन, सर्व खरे बोलेन, खऱ्याशिवाय दुसरे काही बोलणार नाही' अशा शपथेचे काटेकोर पालन करून सत्य सिद्ध करणे, हे न्यायालयीन व्यवहार प्रक्रिया नियमांनुसार महाकठीण काम आहे' असे सांगितले आहे.

असे मानणाऱ्या एका वकिलाच्या अनेक अडचणींनीच तळमळून जाऊन मी लालकिल्ल्यातील अभियोगपर्वाच्या माझ्या बचाव तर्कनिवेदनाचा समारोप करताना, 'आरोपांच्या पिंजऱ्यात अडकलेल्या व्यक्तीला आरक्षी अधिकाऱ्यांच्या आणि राजकारणी सत्ताधीशांच्या अनिर्बंध वहुवळापासून संरक्षण द्यावे, अशा भावशीलतेने, निर्भिक आणि निरिच्छ राहून न्यायदान करणाऱ्या न्यायधीशाला साहाय्यक विधिनियम प्रक्रियांची शुचिता व कर्तव्यकठोर पालन अती आवश्यक आहे' असे सविनय निवेदिले होते. आता या ठिकाणी मला पुनरपी हेच सांगायचे आहे की, आपल्या स्वतंत्र राष्ट्राच्या न्याय व्यवहार शास्त्रासाठी म्हणूनच जसजसे दिवस जात आहेत तसतसा न्यायदान मिळविण्याच्या या मूलभूत तत्त्वांच्या पालनाचा आग्रहही तीव्रतर करावयास हवा, असे मला वाटत आहे. आदेशित अथवा पूर्वगृहीत दृष्टिकोनाने केलेल्या न्यायदानाने आमच्या राष्ट्राच्या समस्यांचे निराकारण होणार नाही. आपणाला ज्याची अती आवश्यकता आहे, ते असे की, आपल्या राष्ट्राची शासकीय यंत्रणा प्रामाणिकतेने निष्पक्ष असावी. शासकीय यंत्रणेतले शिष्टाचारी सेवक हे सत्ताधिष्ठित राजकारणी पक्षाचे भृतिभुक्–भाडेती नसून, राष्ट्राच्या प्रत्येक करदात्याचे, त्यांच्या पक्षानुकूलतेचा विचारही न करता वागणारे, शपथबद्ध शिष्टाचारी सेवक आहेत असे त्यांनी समजावे. राष्ट्राच्या नागरिकांसाठीच असलेली न्यायिक सेवाश्रेणी हीसुद्धा या शासकीय यंत्रणेचे एक अंग आहे–एक शकला आहे, पण या शकलांगाच्या–सेवामूर्तींनेदेखील न्यायदेवतेच्या मूर्तीप्रमाणेच डोळ्यांवर पट्टी बांधून उजव्या हातात समतोल तुला धरून नि डावा हात म्यान केलेल्या तरवारीवर ठेवून राहावयास पाहिजे.

माझ्या अननुभवी कथाकाराच्या हातांनी ही 'लालकिल्ल्यातील अभियोगपर्व १९४८ ची कहाणी' लिहून सांगताना त्रुटिपूर्ण झाली असावीच. परंतु त्या अभियोगपर्वाचे नाट्य बघताना, त्या पर्वात एक नट म्हणून वागताना, मी जे नाट्य अनुभविले त्याची नाट्यदर्शक कहाणी ठिकठिकाणी ती स्वप्रतिष्ठादर्शक अशी झाली आहे, याची तमा न बाळगता, माझ्या अल्पमती शक्तीनुसार सांगितली आहे. अशी तमा न बाळगण्याचे कारण आहे ते असे की, माझ्या प्रामाणिक मते, सत्य हेदेखील नाट्यमय असते आणि हे सत्याचे नाट्यकथन–दर्शन अन्वयप्राप्त समरसतेसहित स्वाभिनयानेच सांगावे–दाखवावे लागते.

आणि सत्य–नाट्यातली मर्मभेदकता? माझे नम्र निवेदन आहे की, वकिलाला नि त्याच्या पक्षकारालादेखील कधीकधी गोफणींच्या नि बाणांच्या माऱ्यासारख्या अति उपमर्दकारक अन्यायाने विद्ध व्हावे लागते. या अभियोगपर्वातल्या माफीचा साक्षीदार बडगेच्या, माझे पक्षकार अभियुक्त क्रमांक सहाच्या वतीने दि. ३० जुलै ४८ रोजी केलेल्या माझ्या कूटपरीक्षणामध्ये जज्ज आत्माचरणजींनी लिहिलेल्या टिप्पणीचेच उदाहरण लक्षात घ्यावे. माझे अति नम्र निवेदन आहे की, ती टिप्पणी म्हणजे 'जरूरी आणि पुरते' लिहिण्याच्या अट्टाहासापायी अति संक्षिप्त झालेली अशी ती टिप्पणी होती. ३० जुलै, १९४८ रोजी जज्ज आत्मचरणजींच्या समोर–कोर्टात उपस्थित असलेल्या सगळ्यांच्या समोर जे काही वास्तविक घडले ते सारे काहीच न सांगणारी अशी संक्षिप्त टिप्पणी होती ती. (संदर्भ छापील पुस्तक क्र. १, पान क्र. ११७, ओळी क्र. १६, १७ नि १८) त्या सगळ्या प्रसंगाने नुसता मजवरच शितोडा उडाला असे नाही; माझ्या पक्षकाराला भारीच हानी सहन करावी लागली. मी परत घेतलेल्या त्या कथित स्वयंभाषी प्रश्नाचा भावार्थ माझ्या पक्षकाराची दोषस्वीकृती सांगतो, असे पूर्व पंजाबच्या उच्च न्यायालयीन न्यायमूर्तींनी म्हणून आपला निर्णय माझ्या पक्षकाराविरुद्ध लिहिताना माझ्या त्या 'स्वयंभाषी चुकीचा' एक आधार म्हणून उपयोग केला! ३० जुलै, ४८ च्या भर कोर्टातले ते घटनात्मक सत्यसुद्धा एकाकीच राहिले. एकाकीपणात दिसेनासे झाले. कारण ते सत्य पाहणाऱ्या–ऐकणाऱ्या एकाही साक्षीदाराने उठून उभे राहून अपील कोर्टात ते उपस्थित असूनदेखील, माझ्या तर्कनिवेदनाचे वेळी माझा पाठपुरावा केला नाही. त्या स्वयंभाषी चुकीतल्या माझ्या निर्दोषीपणाची ग्वाही दिली नाही. मी कोर्टाच्या कागदावर लिहिलेल्या जज्ज आत्मचरणजींच्या शब्दाबाहेर जाऊ शकत नव्हतो. जज्ज आत्मचरणजींचे शब्द 'ह्या भावार्थाने साक्षीदाराला प्रश्न विचारण्याचा माझा हेतु नव्हता' मला आसराही देत नव्हते किंवा अपील कोर्टाच्या न्यायमूर्तींना त्या दिवशी जे काही घडले ते काही सांगत नव्हते. म्हणूनच अपील कोर्टाच्या न्यायमूर्तींनी 'ह्या शब्दांना काहीच अर्थ नाही' असे ठरविले! जज्ज आत्मचरणजींसमोर माझा आग्रह हा होता की, 'हा माझा प्रश्नच नाही.' आणि म्हणूनच हा लिहिला गेलेला प्रश्न मी परत घेतला होता. ४ ऑक्टोबर १९४८ रोजी जज्ज आत्मचरणजींनी मला विश्रांति मध्यंतरात स्वतःच्या विश्रांति कक्षेमध्ये बोलावून जे काही म्हटले आणि जे सर्व काही शब्द नि शब्द मी त्याच दिवशी कोर्टातून परत येताच हिं. म. स. भवनामध्ये संध्याकाळी ५–३० ला लिहिलेल्या पत्रात लिहून ठेवले होते, त्याचा उपयोग मी अपील कोर्टासमोर कसा करू शकलो असतो? जज्ज आत्मचरणजींच्या माझ्या नि माझ्या पक्षकाराविरुद्ध लिहिलेल्या टिप्पणीबद्दल जज्ज महोदयांनी ४ ऑक्टोबर, १९४८ रोजी जी मजपाशी क्षमायाचना केली होती, ते आठवूनच 'जज्ज आत्मचरण हे किती सहृदयी, सत्त्वशील गृहस्थ होते' असे आता म्हणण्यात माझ्या मर्मभेदक अनुभवाची वेदना विसरण्याचा प्रयत्न मी करीत असतो. या माझ्या आठवणी लालकिल्ल्यातील अभियोगपर्वाच्या नाट्यमयतेच्या मर्मस्पर्शी उत्कर्षाच्याच आठवणी आहेत, नव्हे का?

ही कहाणी लिहिण्यात माझा हेतू कोणाची, कशाची तुलना कर-

ण्याचा कोठेच नव्हता. माझ्या वकिली व्यवसायात जे सहव्यवसायी सरळमार्ग सोडून वाममार्गावर भटकतात त्यांची वकिली करण्याचाही ही कहाणी लिहिताना माझा मुळीच हेतु नाही. असे वाममार्गी आहेत असे म्हटले तरी, अभिभाषीच्याऐवजी असत्यभाषी म्हणून श्लेष साधण्याचा कुणी प्रयत्न केला तर ते मला मुळीच ऐकवत नाही, एक थट्टा म्हणून देखील खपवून घेता येत नाही. मी तर दृढविश्वासाने हेच म्हणतो की, या वकिली व्यवसायात असेच लोक आहेत की, जे खातेऱ्यात किंवा दुर्गंधी घाणीत लवलवत जगणाऱ्या आळीप्रमाणे जीवन जगत नाहीत, परंतु जे त्या पंकामधूनच कमलाप्रमाणे मधुर गंध व प्रफुल्ल सौंदर्य पसरवीत सारे जीवन पावन करतात, सारे जीवनच सह्य व सुखी झाल्याची प्रतीती देतात. माझ्या वकील म्हणून केलेल्या व्यवसायचरितामध्ये मी नेहमी अशी दृष्टी ठेवली होती, असा प्रयत्न केला होता की, मी—

अब्धितळी किति रत्ने पडली
शुक्ति पुटकि किति मोती बनली
परि ती सारी गिळून बसला काळरूप उदधि
चारू मधुर किति पुष्पे हसली
मरुस्थली, परि वाळुनि गेली
काय जाहले त्यांचे बघण्या, कोणा ना संधि

—असे जीवन जगण्यापेक्षा मी सगळ्या जरी नाही तरी काही गरजवंतांना, काही आकांक्षितांना साहाय्य द्यावे, सुखी करावे.

वकिली व्यवसायातल्या पत्रकाराच्यावतीने पक्षसमर्थनाची नि तर्कनिवेदनाची व्यावर्ती खोळ असे मानूनच नेहमी निष्कपटी नि निर्व्याजी सरळ समर्थन अथवा निवेदन करण्याची रीत मी पाळीत असे. याच संदर्भात सिमला येथील अपिलाच्या वेळी उच्च न्यायालयातील माननीय न्यायमूर्ती जस्टिस अछरूरामजी यांनी माझ्या लक्षणीय निष्कपटी नि सरळ समर्थननिवेदनाची प्रशंसाही आपल्या निर्णयामध्ये केली. तीच रीती मी या कहाणीकथनातही पाळली आहे. अर्थातच माझ्या पक्षकारांच्या बाबतीतल्या घटनांच्या माहितिपत्रासंबंधाने वकिलांना जे बंधन पाळावे लागते तेही मी कसोशीने पाळले आहे. मला सांगाव्याशा वाटलेल्या कहाण्यांना वर्तमानपत्रांमध्ये किंवा अन्य लेखकांनी लिहिलेल्या गांधीहत्या अभियोगपर्वासंबंधीच्या पुस्तकांमध्ये काहीच व्यासपीठ मिळाले नाही, हे बघूनच मी आणि सत्य हे शेवटी एकाकीच राहते याही अनुभवाने मी ही कहाणीदेखील निष्कपटी नि सरळ रीतीने सांगण्याचा शक्य तितका प्रयत्न केला आहे. अगदी आत्मकथनासारखे लिहूनही केला आहे. अर्थात या कहाणीकथनातला काही भाग आत्मप्रौढीने दूषित असा वाटला, तर त्याचे कारण मी अधिक चांगली रीत कोणती, याविषयी अनभिज्ञ आहे. आणि ह्या दूषणाची जाणीव मला असल्यानेच मी या सगळ्या वृत्तान्ताला कहाणी म्हणूनच संबोधण्याचे ठरविले. त्यामुळे माझ्याशी मतभेद असणाऱ्या लोकांच्या वृत्तान्तालाही वाव राहील. तसेच मी ही कहाणी बऱ्याच उशीराने, सव्वीस वर्षांनंतर, सांगत आहे, हे लक्षात ठेवूनसुद्धा मी सांगतो, याला आधार माझा विश्वास की, परमोच्च व्यासपीठापुढे सत्याची वकिली करावयास कालमर्यादेचे बंधन मुळीच नसते.

ज्या दिवशी महात्माजींची हत्या झाली, त्या दिवसापासूनच महात्माजी आपल्या सत्य, अहिंसा आणि धर्मनिरपेक्ष एकता वगैरे नीतींमुळेच हुतात्मा झाले असे मानले जाते. मला महात्मा गांधी यांच्याबद्दल सगळा काही आदरभाव पूर्वीही होता नि आजही आहे. तरी पण या त्यांच्या नीतींनीच ते हुतात्मा झाले याचे मला तीव्र दुःख होते. सन १९४७ च्या भरतभूमीच्या निर्घृण विभाजनाच्या अगोदर व नंतरही महात्माजींनी स्पष्टपणे, ठामपणे व प्रकटपणे काही बोलू नये, यामुळे कितीतरी भारतीयांना आणि विशेषतः आपल्या मायभूमीतून उपटून फेकले गेल्यासारख्या निर्वासितांना भारी संभ्रमात टाकले, त्यांना किंकर्तव्यमूढ करून सोडले. त्याचवेळी पाकिस्तान्यांचे हिंदुस्थानशी संलग्न झालेल्या काश्मीरवर आक्रमण झाले. त्यावेळी महात्माजींनी काय केले? नेमके त्याचवेळी महात्माजींना हिंदू-मुस्लीम एकीच्या आग्रहाच्या नावाखाली आमरण उपवास करण्याचे आठवले. भारतीय शासकांनी पाकिस्तानचे देणे त्वरित व विनाशर्त देण्याचे ठरविताच १३ जून रोजी महात्माजींनी आपल्या आमरण उपवासाचे पारणे केले. पण हाय! महात्माजींना आपल्या या नीतीची किंमत स्वतःच्या हौतात्म्याने द्यावी लागली. महात्माजी स्वतःच्या नीतीनेच हुतात्मा झाले. पण लालकिल्ल्यातील गांधी-हत्या अभियोगपर्वाशी माझा जो संबंध आला, त्या संदर्भातच मी गेली सव्वीस वर्षे, हत्या झालेल्याच्या हौतात्म्याविषयी, तसेच हत्या करणाऱ्याच्या विषयी, त्या दोघांविषयीच्या सगळ्या समाविष्ट भावनासहित नि मनस्तापासहित एकसमयावच्छेदेकरून विचार करायला भाग पाडणाऱ्या माझ्या विलक्षण नियतीला काय म्हणू? असा रात्रंदिवस मला प्रश्न पडत आहे.

या अशा सगळ्या विचारांनीच भारून जाऊन, या कहाणीचे सारे निवेदन अति विनयाने वाचकांच्या सेवेसी-निर्णयासाठी सादर करण्यात मला काही विकल्प वाटत नाही.

समाप्त

रंगभूमी

# हार–जीत

## सिनेनटीच्या आयुष्याची आणखी एक ठरीव शोकान्तिका

शिरीष सहस्रबुद्धे

तेव्हा वर म्हटल्याप्रमाणे 'नाट्यप्रभा' (मुंबई) चं 'हार-जीत' हे नवं नाटक म्हणजे एका सिनेनटीची शोकान्तिका आहे.

सिनेनटीची शोकान्तिका–तीही साधीसुधी नव्हे, जाहिरातीत लिहिल्याप्रमाणे काळ-जाचा ठाव घेणारी–हा मराठी निर्माते-लेखकांच्या आणि प्रेक्षकांच्याही लाडक्या विषयांपैकी एक आहे. हार-जीत पूर्वी अशा किती शोकान्तिका रंगमंचावर येऊन गेल्या याची एकदा मोजदादच करायला हवी. सुरेश खरे-लिखित 'काचेचा चंद्र' आणि वसू भगतांचे (म्हणजे त्यांनी लिहिलेले) 'जंगली कबुतर' ही दोन ठळक, गाजलेली आणि त्यामुळेच चटकन आठवणारी नाटकं याच पंक्तीतली. 'काचेचा चंद्र' नावाजलं गेलं ते मुख्यतः डॉ. श्रीराम लागू आणि भावना यांच्या अभिनय-सामर्थ्यामुळं आणि खळबळजनक 'थीम'च्या प्रामाणिक आविष्कारामुळं. 'जंगली कबुतर' गाजण्याची कारणं मला निश्चित कळली नसली तरी, वरच्यापेक्षा निराळी असावीत हे नक्की. 'हार-जीत' ज्यामुळे गाजावं, असं या सर्वांपैकी कोणतंच कारण मला दिसत नाही.

उमाकांत काणेकर यांनी लिहिलेलं 'हार-जीत' ज्यासाठी मुद्दाम पाहावं अशा गोष्टी नाटकात फार कमी आहेत, तेव्हा त्यांचाच उल्लेख आधी करणं योग्य होईल. यात सर्वांत प्रथम येते ती मोहन कोठीवान. (शेरखान पठाण) आणि नयनतारा (सुंदर ऊर्फ शामादेवी) यांच्या अभिनयाची जुगलबंदी. विशेषतः शेरखानची भूमिका मोहन कोठीवान यांनी ज्या सहजसुंदर, अकृत्रिम पठाणी ढंगानं वठविली, त्यामुळं बऱ्याच काळानं प्रभावी नैसर्गिक अभिनयपद्धतीचा लक्षात राहण्याजोगा एक वस्तुपाठ मिळाला. श्री. कोठीवान यांची वाक्यांची हुकुमी फेक हा त्यांच्या आविष्कारसामर्थ्याचा एक महत्त्वाचा घटक. नाटकातला इंटरेस्ट अखेरपर्यंत जिवंत ठेवणाऱ्या शेरखानची, या जुगलबंदीपुरतंच बोलायचं तर हार नव्हे, जीत झाली आहे. मला स्वतःला, लंगड्या पठाणाच्या भूमिकेतलं त्याचं स्टेजवरचं सहजतापूर्ण वावरणं किंवा अस्सल हिंदी–उर्दू ढंगाची संवादफेक यापेक्षा महत्त्वाची वाटली ती गोष्ट म्हणजे, अभिनेत्यांची भूमिकेतली involvement आणि detachment कोठीवानांनी सांभाळलेला ताल–तोल. अतिरेकी अभिनयाला वाव देणारी ही भूमिका ज्या संयमानं त्यांनी साकार केली, त्याचीही वाहवा केली पाहिजे. दीर्घकाळ स्मृतीत रेंगाळणारी एक व्यक्तिरेखा–नाटकात दुय्यम असूनही–उभी करणं हे त्यांचं फार मोठं यश मानलं पाहिजे. नयनतारा या अभिनेत्रींनंही सिनेनटी शामादेवीच्या प्रमुख भूमिकेत चांगला रंग भरला आणि नाटक उचलण्यात मोहन कोठीवानना साथ दिली. सुंदर या अनाथ तरुणीच्या भूमिकेतून शामादेवीसारख्या संपन्न, सुस्वरूप आणि यशस्वी सिनेअभिनेत्रीच्या भूमिकेत शिरताना त्यांनी आविष्कारपद्धतीत केलेला बदल सुखावह आणि तर्कसुसंगत असाच होता. एकाच स्त्रीच्या आयुष्याची ही दोन निरनिराळ्या टोकांची स्वरूपं उभी करताना नयनतारानं केलेला आमूलाग्र बदल हा तिची आणि दिग्दर्शकाचीही चमक दाखविणारा आहे. नाटकाबरोबरच प्रत्येक अंकातलं तिचं भावदर्शनही चढतं वाढतं होतं, विशेषतः पहिल्या अंकाचा उत्तरार्ध आणि तिसरा अंक यांतले अनेक प्रसंग–प्रवेश तिनं एकटीच्या सामर्थ्यावर पेलले. मात्र कोठीवानची detachment ची जाणीव पूर्वी तिच्याजवळ विशेषशी दिसली नाही, त्यामुळेच की काय भूमिकेत बुडून जाण्याऐवजी वाहून जाण्याचीही एखादी वेळ आली. तिसऱ्या अंकातल्या 'किरीट', आणि शामादेवी यांच्यातल्या संघर्षात काही प्रेक्षकांच्या हलक्या दर्जाच्या वाहवाबरोबर वाहवत जाऊन तोल जाण्याचा प्रसंग नयनतारावर आला होता, हे योग्य नव्हे.

श्री. शशिकांत निकते दिग्दर्शित हार–जीतची कथा तशी विशेष आडरस्त्याची नाही. ठरीव शोकान्तिकेकडे झुकणारीच आहे. क्वचित भडकही आहे, उथळ तर खूपच आहे, नाटकाच्या अगदी सुरुवातीचा मद्यपानानं कोजागरी साजरी करणाऱ्यांचा खटाटोप तर उथळपणा आणि भडकपणाचा साक्षात नमुना आहे. सुंदर ही पोरकी मुलगी, तिचीच इस्टेट बळकावून तिचा छळ करणारे तिचे चुलता–चुलती, तिच्यावर वाईट नजर ठेवणारे किरीट आणि शर्माजी हे समाजातले संभावित आणि तिच्यावर (अनुक्रमे) मुलगी आणि प्रेयसी म्हणून प्रेम करणारे शेरखान आणि समीर यांची ही कथा आहे. समीर हा एक सामान्य फोटोग्राफर तरुण. छळाला कंटाळून घराबाहेर पडलेली सुंदर समीरकडे पोचण्यापूर्वीच किरीट–शर्माच्या वासनेच्या आगीत होरपळते. याची कल्पना नसलेला समीर तिचा चित्रसृष्टीत शिरकाव घडवून आणतो. यश–कीर्ती–धनासमवेतच दुर्गुण आणि व्यसनं येतात. सुंदरची शामादेवी बनते, पण समीर आणि शेरखान यांना दुरावूनच. किरीट–शर्मा–चुलताचुलती यांच्यावर सूड उगविण्याचं समाधान मिळाल्यानंतर, आतून–बाहेरून उद्ध्वस्त झालेली ही यशसंपन्न अभिनेत्री दारूतून विषप्राशन करून आत्महत्या करते, आणि हार–जितीच्या संमिश्र कल्लोळात नाटक संपते.

या नाटकाचं लेखन हा त्यातला सगळ्यात मोठा कच्चा दुवा. एक तर उमाकांत काणेकर अनेकवार खलपात्रांच्या चित्रणात उथळपणा–भडकपणा–थिल्लरपणा, cheapness च्या सीमेपर्यंत वाहवत गेले आहेत. त्याला दिग्दर्शन–अभिनयाची तशीच जोड मिळत गेली आहे. परिणामी नाटक अभिरुचीसंपन्न प्रेक्षकवर्गाच्या मनाची पकड घेऊ शकत नाही. पहिल्या अंकातला सुरुवातीचा अकारण लांबवलेला मद्यपानाचा प्रवेश आणि जरुरीपेक्षा जास्त गडद रंगवलेला बायका बदलण्याचा प्रकार ही वरील दोषांची ठळक उदाहरणं. चांगल्या ट्रॅजेडीपेक्षा पोरकट मेलोड्रामाकडे बऱ्याच वेळा नाटकाचा कल झुकल्यासारखा वाटतो हा दुसरा दोष. आणखीही काही चुकांचा निर्देश करता येईल. महत्त्वाची उणीव म्हणजे या यशस्वी सिनेनटीला शोकान्तिकेप्रत नेणारी तिची

दारुण मनोव्यथा काणेकर सामर्थ्यानं मांडू शकलेले नाहीत. 'तुम्ही मला समजून घ्यायचा प्रयत्न करा' एवढं एकच वाक्य वेळोवेळी तिच्या तोंडी घातल्यामुळे तिचा मनोदाह, तिच्या मानसिक यातना पुरेशा स्पष्ट होतात असा त्यांचा गैरसमज तर झाला नाही? शामादेवीची सूडभावना काणेकरांनी प्रभावीपणे चितारली आहे, तथापि नाटकाच्या शेवटाशीच प्रकट होणाऱ्या तिच्या व्यथेची पडछायाही पुऱ्या नाटकात कुठेच नाही. त्यामुळेच तिने शेरखान व समीरला एका झटक्यात तोडून टाकणे सयुक्तिक वाटत नाही. काणेकरांनी त्या तीनही व्यक्तिरेखांवर हा धडधडीत अन्यायच केलेला आहे, असं मला वाटतं.

'हार–जीत'ची आणखी एक हार ही दुय्यम भूमिकांच्या अपयशात आहे. सुंदरच्या काकाच्या भूमिकेचा आब विवेक या जाणत्या अभिनेत्याने राखला असला तरी, त्याची संवादफेक अत्यंत सदोष, घाईगडबडीची आहे. वसंत ठेंगडी (शर्माजी) वगळता अन्य सर्व दुय्यम कलाकार आपापल्या भूमिकांत पूर्णपणे अयशस्वी ठरले. किरीट आणि सुंदरची चुलती या भूमिका तर फारच उण्या पडल्या. सर्वाधिक निराशाजनक कामगिरी आहे ती नाटकाचा तथाकथित 'हिरो' समीर (सुनील रेगे) याची. संजीवकुमारची अमर्याद पण भ्रष्ट नक्कल करणारा हा नवा नायक दुय्यम भूमिकांत गणला जावा इतका तो या भूमिकेसाठी मिस्फिट् होता. आपण हिरो आहोत की कॉमेडिअन, हे माहीत असणारा अभिनेता इतके भंपक, बाष्कळ आणि विदुषकी चाळे या बहुशः गंभीर भूमिकेत करील ही गोष्ट सांगूनही खरी वाटणार नाही. त्याला दिलासा देण्यापुरताही एखादा चांगला शब्द लिहिता येण्यासारखा नाही.

शशिकांत निकते यांचे दिग्दर्शन, कुमारसेन गुप्ते यांचे पार्श्वसंगीत आणि स्वाधीन डे यांची प्रकाशयोजना यात खास नाव घेऊन स्तुती करण्यासारखे काही नाही. दत्ता चोडणकर यांची नेपथ्ययोजना मात्र, ती उभी करण्यात गेलेला प्रदीर्घ काळ जमेस धरूनही, नेत्रसुखद होती आणि त्यापेक्षा महत्त्वाचे म्हणजे नाट्यपरिपोषकही होती. □

हिंदी चित्रपट

# चरस

## धर्मेंद्र–हेमा प्लस चरसाच्या चोरट्या व्यापाराची डॉक्युमेंटरी!

'माल्टा' या प्रकरणाबद्दल अलीकडे मला अपार कुतूहल वगैरे निर्माण झालेलं आहे.

अर्थात या कुतूहलाचं कारण तसं अगदी वेगळंच आहे.

मी काही भूगोलाचा विद्यार्थी नव्हे आणि म्हणूनच (बहुधा) भूमध्य समुद्रात असलेल्या या छोट्या बेटामध्ये माझा 'तसा' काहीच इंटरेस्ट नाही. जगाच्या नकाशात हे बेट मला हुडकून सापडेलच याची काही खात्री नाही. पण हल्ली हिंदी चित्रपटात मात्र या बेटाचे (बेटाचे?) दिवस मोठे भले चांगले आलेले दिसतात. विशेषतः हिंदी सिनेमातल्या व्हिलन्स आणि राक्षसपार्टीतल्या अन्य आजीव सदस्यांनी 'निवाऱ्याचं हक्काचं ठिकाण' म्हणून या बेटाचं हाऊसफुल्ल रिझर्व्हेशन करून टाकलं असावं अशी माझी एक समजूत झालेली आहे. कारण मुंबईतनं तडीपार केलेले गुन्हेगार ठाण्याला जाऊन सुखानं नांदावेत तसे भारतीय स्मगलर्स भराभर देशाटन करून माल्टाला जाऊन स्थायिक होतात आणि भरपेट भरभराटतात असं एक दृश्य– प्रत्यक्षात नसलं तरी– हिंदी चित्रपटात मात्र वारंवार दिसतं. एके काळी हाँगकाँग हे शहर सर्वांगपरिपूर्ण गुन्हेगारीनं समृद्ध असायचं, असं मी आपलं लांबूनच ऐकून आहे. तो वारसा आता माल्टाला मिळाला असल्यास नकळे. बारूद या प्रमोद चक्रवर्तीच्या चालू चित्रपटात पोलिस इन्स्पेक्टरचा मुडदा पाडून परागंदा होणाऱ्या चौकडीपैकी अजितमहाशय हे माल्टावासी झाल्याचं प्रेक्षकांनी पाहिलं आहेच. त्यांनी तर संपूर्ण माल्टा बेटच आपल्या ताब्यात असल्याच्या थाटात एक किल्लाच बळकावून संसार– अर्थात स्मगलिंगचा– थाटला होता. नुकत्याच नव्यानं दाखल झालेल्या 'चरस' या रामानंद सागर साहेबांच्या चित्रपटात पुन्हा हाच माल्टा-गमनाचा प्रकार झालेला आहे. 'बारूद' मधले अजित इथं आहेतच, त्यांच्या जोडीला 'शोले' फेम अमजादखान आहेत एवढाच फरक. शिवाय ही जोडी इथं किल्ला न बांधता; किल्ल्यापेक्षा बांधणीत आणि आडवळणी भुयारात कुठेही कमी न पडणारा एक नाइट क्लब चालवते आणि लक्षावधी रुपयांच्या अस्सल भारतीय चरसाचा चोरटा व्यापारही करते. किंबहुना करायचा प्रयत्न करते. कारण सूरज (धर्मेंद्र) सारखा जवानमर्द इंटरपोल ऑफिसर सतत त्यांच्या पाठीवर असतोच,

म्हणजे त्याचं असं आहे की, सूरज (धर्मेंद्र), मुन्नी (अरुणा इराणी) आणि त्यांचे परमपूज्य पिताजी– अर्थातच नझीर हुसेन– ही आफ्रिकेतली गबर मंडळी भारताला परतण्यासाठी निघत असतात. भारतात त्यांची मालमत्ता असते. तथापि प्रत्यक्षात त्यांचा इस्टेट मॅनेजर कालिचरण (अजित) यानं ती सर्व विकून स्मगलिंगला सुरुवात केलेली असते. या आपल्या महत्कार्यात मालकांच्या येण्यामुळे विघ्न येऊ नये, या सद्हेतूनं रॉबर्ट (अमजाद)च्या समर्थ नेतृत्वाखाली कालिचरणचे गुंड आफ्रिकेतील शेटजींवर हल्ला करतात आणि घर पेटवून देतात. शेटजी ठार होतात आणि मुन्नी रॉबर्टच्या तावडीत सापडून त्याच्या माल्टामधल्या नाइट क्लबची डान्सर–स्टार बनते. सूरज मात्र अपेक्षेप्रमाणेच गुंडांहातून निसटून हिंदुस्थानात येतो. कालिचरणची गद्दारी लक्षात येताच त्याचा सूड घेण्याची खास फिल्मी प्रतिज्ञा, 'कमीने' या पेटंट शिवीसकट करतो. या प्रयत्नातच त्याची, सुधा (हेमामालिनी) या अभिनेत्री उर्फ नर्तिकेशी ओळख होते. मग 'नहले पे दहला' आणि इतर अनेक चित्रपटातलीच आयड्रिया चोरून सूरजमहाशय इंटरपोलमध्ये सामील होतात आणि किरकोळ ट्रेनिंग पूर्ण करून तत्काळ कालिचरणच्या चरसाच्या चोरट्या निर्यातीमागे हात धुवून लागतात. दरम्यानच्या काळात कालिचरणसाहेबांनी सुधाला ब्लॅकमेलिंग करून फसवलेलं असतं आणि तिच्या नृत्यपथकाच्या परदेशदौऱ्याबरोबर चरस– तोही थोडा थोडका नव्हे तर, पाच कोटी रुपयांचा– पाठविण्याची धाडसी योजना आखतात. साहजिकच आधी सुधा, तिच्या (किंवा

चरसाच्या) मागावर सूरज आणि या दोघांच्या पाठीवर दस्तुरखुद्द कालिचरण असे सगळे लोक माल्टाकडे धावत सुटतात...

...यापुढचा भाग खरं तर चक्रावून जाऊन पडद्यावरच पाहावा असा आहे. विशेषत: स्मगलर्स आणि पोलिस यांचे एकमेकाला चकव–चुकवणारे हैराण डावपेच आणि माल्टाच्या नयनरम्य पार्श्वभूमीवर धर्मेंद्र–हेमामालिनी, ह्या दोन आकर्षणांमध्ये तरी प्रेक्षकांना जागीच बांधून ठेवायचं सामर्थ्य आहे खास. इतर स्मगलरी सिनेमांप्रमाणेच चरसमध्येही स्मगलरांची यंत्रणा अशी काही भपकेबाज आणि सदासुसज्ज दाखवलेली आहे की, देशात राज्य पोलिसांऐवजी त्यांचंच आहे काय असा भास व्हावा. माल्टामधले त्यांचे अड्डे, क्लब्ज, गढ्या आणि गोदामं हा प्रकार तर डोकं फिरवणारा आहे.

धर्मेंद्र–हेमा या लकी रोमँटिक पेअरची कामं हे ' चरस 'चं प्रमुख आकर्षण. पांगळे वडील आणि खुनाचा संभाव्य आरोप यांच्या भीतीमुळं कालिचरणच्या कचाट्यात सापडून असाहाय्य झालेल्या सुधाची सेमीरोमँटिक भूमिका हेमामालिनीनं झकास वठविली आहे. धर्मेन्द्रला सूडानं पेटलेल्या तरुणाची त्याने अनेकदा रिपीट् केलेली भूमिकाच पुन्हा एकदा करावी लागली आहे. प्रेम आणि कर्तव्य ही दोन्ही टोकं तो ज्या कार्यक्षमतेनं सांभाळताना दाखवलाय्, त्याला तोड नाही. एरवी त्याच्या अभिनयात नवीन असं काहीच नाही, काही करायला त्याला वावही नाही. फायटिंगच्या धुमाकुळात तो पूर्वीइतकाच तब्येतीनं वावरला–लढला असला, तरी ' तरुण प्रियकर ' म्हणून आता फार काळ त्याला स्वीकारता येणार नाही अशा खुणा त्याचा चेहराच दाखवायला लागलाय्. अजितला खलनायकाच्या भूमिकेत एरवीपेक्षा वाव जास्त मिळालाय आणि त्यानंही त्याचा फायदा करून घेऊन नेहमीपेक्षा संयमानं आणि रुबाबानं ' कालिचरण ' उभा केलाय्. अन्य सहकलाकारांत मुन्नीच्या भूमिकेत समरसून अभिनयदर्शन घडविणारी अरुणा इराणी आणि माल्टाच्या इंटरपोल ऑफिसरच्या भूमिकेत चमकलेला नवा अभिनेता यांचा जरूर उल्लेख करायलाच हवा. अमजाद मात्र कृत्रिम, अवघडलेला, निराशाजनक वाटतो.

' सागर आर्टस् इंटरनॅशनल 'चा ' चरस ' ही त्यांच्या यापूर्वीच्या चित्रपटांप्रमाणेच एक ' फॅमिली ॲक्टिव्हिटी ' आहे. लेखक, निर्माता, दिग्दर्शक रामानंद सागर यांच्या या चित्राचा छायालेखक त्यांचा मुलगाच–प्रेम सागर–आहे. इतर आघाड्यांवरही निरनिराळे ' सागर ' आहेतच. रामानंद सागर यांच्या दिग्दर्शनात काहीच खास नसलं, तर प्रेम सागरची फोटोग्राफी मात्र दाद घेऊन जाईल अशी आहे. विशेषत: माल्टाची अनेक दृश्यं, गीतांचे चित्रण आणि अन्य ग्लॅमरस् वा थ्रिलिंग दृश्यांमध्ये त्यांचं कसब आणि प्रतिभा प्रकर्षानं जाणवते. शेवटच्या मारामारीतली–विशेषत: जळत्या पुलाच्या छायाचित्रणाची त्यांची कामगिरी सरसच आहे. चित्रपटाच्या सेटस्सारख्या अन्य तांत्रिक बाजूही संपन्न आहेत.

' चरस 'च्या संगीताची बाजू लक्ष्मीकांत–प्यारेलाल यांनी सांभाळली आहे. आपला ठराविक ठेका आणि तोंडात सहज बसणाऱ्या सोप्या चालींचा साचा न बदलता त्यांनी रूटीनप्रमाणेच चार-सहा गाणी ठोकून काढली आहेत. ' ये धुआँ मेहरबाँ चरस का नहीं है ' हे नृत्यगीतच त्यातल्यात्यात जरा वेगळं वाटतं. एरवी ' आजा तेरी याद आयी ', ' मैं एक शरीफ लडकी ', ' नौकरी छोडके ' वगैरे गाणी नुसतीच लोकप्रिय होण्यातली आहेत. ' नौकरी छोडके 'ची शब्दरचना हे एक संतापजनक प्रकरण आहे. संगीत व विशेषत: पार्श्वसंगीतात नावीन्य किंवा कल्पकता औषधालाही नाही.

करमणूकप्रधान चित्र ' चरस ', सर्वसामान्य प्रेक्षकांचं रंजन करण्याच्या आपेल्या कर्तव्यात कुठेही कसूर करीत नसला, तरी कलात्मकदृष्टचा तो विलक्षण ' पॅची ' आहे. आणि या रंजनप्रधानतेमध्ये सिंहाचा वाटा धर्मेन्द्र–हेमाचाच आहे, हे विसरून चालणार नाही. धर्मेन्द्र–हेमाची बाजू वगळली, तर ' चरस 'चा राहिलेला भाग ही चरसाच्या चोरट्या आंतरराष्ट्रीय व्यापाराची बऱ्यापैकी डॉक्युमेंटरी फिल्म होऊ शकेल; इतका हा चित्रपट कलाकारांनी सावरलेला आहे. □




## पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढरे डाग बरे करण्यात आमच्या उपचाराने मोठी ख्याती मिळविली आहे. उपचार सुरू झाले की सुधारणा दिसून येईल. रोगाच्या तपशिलासह लिहा, प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्यांच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगापासून मुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

BHARAT AYURVEDASHRAM (M) P. O. KATRI SARAI ( GAYA )

# साप्ताहिक भविष्य

कृष्ण माईणकर

**३१।७।७६ ते ६।८।७६**

**मेष : व्यावसायिक यश**

रवी-शनी सुखस्थानी तर मंगळ पंचमस्थानी आहे. गुरू दुसरा आहे. ही ग्रहपरिस्थिती व्यावसायिक सुधारणेला अनुकूल आहे. खंबीरपणा व कार्यक्षमता यामुळे अंगिकृत क्षेत्रात महत्त्वाकांक्षी योजना अंमलात आणू शकाल. रेस-लॉटरीसारख्या मार्गाने आर्थिक बाजू पुरेशी भक्कम होऊ शकेल. शनिवारी शेती व उद्योग यात योजनाबद्ध असे पाऊल उचलू शकाल. रविवारी कौटुंबिक स्वास्थ्य उत्तम मिळेल. सोमवारी नोकरीत चांगलाच प्रभाव पडेल. मंगळवारी वरिष्ठांकडून शाबासकी मिळेल. बुधवारी व्यापारात पुरेसा नफा कमवाल. गुरुवारी प्रवासांत खोळंबा होण्याची शक्यता आहे. शुक्रवारी अपेक्षित वाढ मिळेल. शुभ दिनांक १–३–४

**महिलांना :** मंगळवारी उपवास करा. मनोरथ पूर्ण होतील. नोकरीच्या दृष्टीने अनुकूलता आहे.

**विद्यार्थ्यांना :** मानसिक स्वास्थ्य अधिक महत्त्वाचे आहे. कोणताही मोहविषय टाळा. शिक्षणासाठी तात्पुरती मदत होईल.

**वृषभ : पैशाची व्यवस्था होईल**

पहिला गुरू, तिसरा रवी-शनी, चौथा मंगळ असे आठवड्यातील एकंदर ग्रहमान आहे. प्रामुख्याने घसरलेली आर्थिक परिस्थिती पुन्हा चांगली होऊन गाडी रुळावर येईल. उद्योगात गेल्या काही दिवसांत तुम्ही जी नव्या नव्या योजनेची पाऊले उचलली आहेत त्याचे यशस्वी मूर्त रूप यावेळी दिसू लागेल. नोकरी, शेती-व्यापार या सर्वच बाबतींत सुधारणेची प्रसादचिन्हे दिसू लागतील. शनिवारी पत्राचे अपेक्षित उत्तर येईल. रविवारी आर्थिक मदत मिळेल. सोमवारी वादविषयक समस्या सुटेल. मंगळवारी स्थानांतर घडेल. बुधवारी दूरच्या मित्राचे पत्र येईल. गुरुवारी व्यापार सुधारेल. शुक्रवारी नोकरीच्या दृष्टीने अनुकूल आहे. शुभ दिनांक २–३–५

**महिलांना :** कौटुंबिक अडचणी आता राहणार नाहीत. पैसाही पुरेसा मिळेल. नोकरीत अनुकूल घटना घडतील.

**विद्यार्थ्यांना :** कलाक्षेत्रात प्रवेश मिळू शकेल. गायन, वादन इत्यादी बाबतींत आनंद मिळेल.

**मिथुन : कर्तबगारी विस्तारेल**

तुमची रास बुद्धिप्रधान आहे. त्यामुळे तुम्ही कितीही त्रास झाला किंवा कितीही राग आला, तरी भावनेच्या आहारी जाण्यात काही हितकारक नसते. डोके शांत ठेवून बुद्धीच्या सामर्थ्यावरच परिणामाशी सामोरे जाणे आवश्यक असते. बारावा गुरू तुमच्या हातून हेच घडवणार आहे. दुसरा रवी-शनी तर तिसरा मंगळ हे ग्रह अनुकूल आहेत. नोकरीत आर्थिक परिस्थिती मागच्यापेक्षा सुधारणार आहे. शनिवारी धंदा टाळणे आवश्यक ठरेल. रविवारी व्यापारी क्षेत्रांत बरीच उलाढाल होईल. सोमवारी नोकरीतील महत्त्वाचे काम होईल. मंगळवारी पैशासाठी प्रवास होईल. बुधवारी लेखकांना सुखकारक. गुरुवारी सर्वच बाबतीत गर्दीचा दिवस जाईल. शुक्रवारी महत्त्वाच्या गाठीभेटी होतील. शुभ दिनांक ३१–२

**महिलांना :** बऱ्याच दिवसांची माहेरी जाण्याची इच्छा पुरी होईल. पैशाची अडचण संपेल.

**विद्यार्थ्यांना :** बरीच अनुकूलता आहे. कोणतेही धाडस करा.

**कर्क : अपेक्षित बदल**

हा आठवडा साधारण सुखकारक आहे. डोक्याला त्रास होईल असे विशेष काही घडणार नाही. अकरावा गुरू लाभदायक आहे. दुसरा मंगळ शेती, खते, स्टेशनरी, छपाई या व्यवसायातील लोकांची स्थिती सुधारायला मदत करणार आहे. पैशाची बाजू बरीच अनुकूल राहील. रेस–लॉटरीपासून फायदा होईल. पैशाअभावी कोणतेही काम अडून राहणार नाही. शनिवारी उच्चपदावरील व्यक्तींबरोबर संपर्क येईल. रविवारी व्यापारात लाभ होईल. सोमवारी नव्या उद्योगाची सुरुवात करू शकाल. मंगळवारी नोकरीत सहकार्य व अनुकूलता राहील. बुधवारी महत्त्वाचा पत्रव्यवहार व गाठीभेटी होतील. गुरुवारी बचत होईल. शुक्रवारी बेकारांना शुभदायक आहे. शुभ दिनांक २–४

**महिलांना :** विवाहेच्छूंना प्रसन्नता वाटावी असे त्यांच्या बाबतीत घडेल. शुक्रवारी उपवास करावा.

**विद्यार्थ्यांना :** परीक्षेच्या बाबतीत अन्याय झाला असेल तर तो दूर होईल. पैशाची सोय होईल.

**सिंह : आशेचा किरण**

बारावे रवी-शनी प्रतिष्ठेला धक्का लावण्याचा आटोकाट प्रयत्न करणार आहेत. सार्वजनिक जीवनात उपेक्षित अवस्था वाट्याला येते की काय असा संभ्रम निर्माण होईल, पण पहिला मंगळ तुमचे मनोधैर्य उत्तम ठेवणार असून तुम्हाला कोणताही कमीपणा येऊ देणार नाही. साडेसाती असली तरीही विरोधकांचे प्रयत्न यशस्वी होणार नाहीत. शनिवारी अकस्मात एखादी घटना घडून मन प्रफुल्लीत होईल. रविवारी विश्रांती घ्यावी लागेल. सोमवारी पैसे चांगले मिळतील. मंगळवारी नोकरीत अनुकूलता राहील. बुधवारी व्यापारी क्षेत्रात यश तर गुरुवारी कौटुंबिक प्रसन्नता राहील. शुक्रवारी सूचक स्वप्ने पडतील. शुभ दिवस ३–५.

**महिलांना :** नोकरीत बढती मिळण्याच्या बाबतीत विचार होईल. सार्वजनिक सेवेत मान मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** तुमच्या क्षेत्रात प्रचंड यश मिळेल. नवे नवे प्रयोग साध्य होतील.

**कन्या : अनुकूलता आहे**

भाग्यस्थानी गुरूचे आगमन झाल्यापासून नोकरीच्या बाबतीत तुम्हाला बरीच साहानुभूती मिळत आहे. आता त्यात खंड पडणार नाही. बारावा मंगळ उगाच मनाची साशंकता वाढवत असला तरी, प्रत्यक्षात तसे काहीच प्रतिकूल घडू देणार नाही. मात्र मन सतत साशंक राहील. रवी–शनी अकरावे आहेत. ते तुम्हाला काही तरी मिळवून देऊ शकतील. रेस व लॉटरीत भाग घ्यावा. शनिवारी वाङ्मय साहित्यविषयक कामे पार पडतील. रविवारी नको असलेली व्यक्ती भेटेल. सोमवारी नोकरीत कामाचा त्रास होईल. मंगळवारी कौटुंबिक वातावरणात प्रसन्नता राहील. बुधवारी कामाचा ताण वाढेल. गुरुवारी प्रवासात त्रास. शुक्रवारी शुभसूचक

घटना घडतील. शुभ दिनांक ३–६.

**महिलांना :** तब्येत सुधारल्याची प्रचीती येईल. धंद्यात मन रमणे 'कठीण' आहे. नोकरीत समरस व्हावे लागेल.

**विद्यार्थ्यांना :** बुद्धीला चालना देणारा हा आठवडा आहे. बरेच काही चांगले घडेल.

**तूळ : लाभदायक योजना**

एकटा मंगळच अकराव्या स्थानी बसून तुमचे सारे मनोरथ साकार करायला पुरेसा आहे. रवी–शनी दहावे, गुरू आठवा अशी इतर ग्रहांची रचना आहे. उद्योग व व्यापार, नोकरी व प्रवास या सर्वच बाबतीत हा आठवडा लाभकारक ठरणार आहे. ज्यांना 'हवाई प्रवास' कधी घडला नाही त्यांना तो या आठवड्यात घडण्याचा संभव आहे. रेसमध्ये पैसा मिळेल. शनिवारी अचानक लाभ होईल. रविवारी रेसमध्ये फायदा, सोमवारी नोकरीत सुखकारक, मंगळवारी नोकरीत वरचष्मा, बुधवारी व्यापारात नफा, गुरुवारी कलाक्षेत्रात लोकप्रियता व शुक्रवारी अनेक महत्त्वपूर्ण घटना घडून हा आठवडा संपेल. शुभ दिनांक ३१–२.

**महिलांना :** सौंदर्य प्रसाधने व कापड मिळेल. नोकरीत साहानुभूती मिळेल. बदलही घडू शकेल.

**विद्यार्थ्यांना :** आपुलकी निर्माण होईल. अंगीकृत कार्यात यश मिळेल.

**वृश्चिक : साफल्याचे समाधान**

राहू–हर्शल अनुकूल फळे पदरात पाडू देत नसले तरी, तुमच्याबाबतीत सध्या तरी प्रतिकूल असे काहीच नाही. राशीस्वामी मंगळ दहावा ही एकच गोष्ट तुमच्याबाबतीत मेची ठरण्याला हरकत नाही. तो मंगळ तुमचे सारे मनोरथ पूर्ण करणार आहे. महत्त्वाकांक्षी योजना आखू शकाल. त्यात सफलतादेखील मिळेल. शनिवारी उद्योगात धनिकाचे सहकार्य मिळेल. रविवारी परदेश प्रवास घडेल. सोमवारी नवे वाहन मिळू शकेल. मंगळवारी नोकरीत अधिकाराची वाढ होईल. बुधवारी बचत होईल. गुरुवारी धंद्यात प्रगती होईल. शुक्रवारी प्रसिद्धी मिळेल. शुभ दिनांक ३–४.

**महिलांना :** नोकरीत कार्यक्षमता वाढून बढती मिळेल. पैसा चांगला मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** नेतृत्वाचे शिक्षण मिळेल. सुप्त गुणांना वाव मिळेल.

**धनु : अडचणींचा उतार**

राशीस्वामी गुरू सहावा वृषभ राशीत आहे. हा काही तेवढासा चांगला नाही. परंतु भाग्यस्थानी मंगळ आहे हीच एक आशादायक बाजू समजावी लागते. रवी–शनी अष्टम स्थानी आहेत. तब्येतीची काळजी खरे म्हणजे आता उरलेली नाही. तरीपण घरांतील नातेवाईकांचे आजार, सर्दी पडसे वगैरेमुळे तुम्हाला अजून काही काळ तरी आरोग्य स्वास्थ्य दूर राहणार आहे. मात्र अनेक अडचणींवर तुम्ही आतापर्यंत मात केली आहे तशीच आताही करू शकाल. अडचणी उताराला लागतील. शनिवारी नोकरीत त्रास नाही. रविवारी आध्यात्मिक आनंद मिळेल. सोमवारी नोकरीच्या निमित्ताने प्रवास होईल. मंगळवारी उद्योगात भागीदारी निर्माण करू शकाल. बुधवारी पैशासाठी केलेले प्रयत्न यशस्वी होतील. गुरुवारी साधुसंताचे दर्शन घडेल. शुक्रवारी अपेक्षित पत्र येईल. शुभ दिनांक ४–६

**महिलांना :** व्रतवैकल्ये पार पडतील. सार्वजनिक सेवेत मान मिळेल. पैसा एकंदरीत चांगला मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** मानसिक स्वास्थ्य मिळवण्यासाठी इच्छित देवतेची उपासना करा. प्रगतीला चालना मिळेल.

**मकर : अर्थलाभ**

मकर राशीच्या चंद्राबरोबर रवी–शनीचा प्रतियोग झालेला आहे. मंगळ आठवा आहे. पण तो प्रतिकूल नाही. अर्थलाभाच्या दृष्टीने तो अनुकूलच आहे. विशेषतः रेस व स्थावराच्या तसेच जमिनीच्या खरेदी विक्रीस फायदा देईल. शुक्र पाचवा आहे. तो मानसिक स्वास्थ्य निर्माण करील या आशेवर मात्र राहू नका. सर्व सामान्यतः हा आठवडा अनुकूलच आहे. शनिवारी नोकरीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची घटना घडू शकेल. रविवारी स्वतःचा उद्योग सावरू शकाल. सोमवारी नोकरीनिमित्त स्थलांतर घडू शकेल. मंगळवारी श्रमाशिवाय पैसा मिळेल. बुधवारी बँकेसंबंधीचा व्यवहार होईल. गुरुवारी सूचक स्वप्ने पडतील. शुक्रवारी बेकारांच्या दृष्टीने अनुकूल. शुभ दिनांक ४–५

**महिलांना :** नोकरीच्या क्षेत्रांत महत्त्वाचा बदल होईल. मोठे अधिकारपद मिळू शकेल.

**विद्यार्थ्यांना :** विद्यार्थ्यांच्या भावी जीवनाच्या दृष्टीने एखादा निर्णय घ्यायला हा आठवडा अनुकूल आहे.

**कुंभ : बदलाची चाहूल**

चौथा गुरू तेवढासा चांगला नाही. मधून मधून मानसिक स्थित्यंतर अस्वस्थता घडवेल. मनाचा प्रक्षोभही होऊ शकेल. तरी पण त्यामुळे कोणतेच नुकसान होणार नाही. मंगळ सातवा आहे. त्यामुळे नवविवाहित संसारी लोकांनी एकमेकांना समजून घेण्याची भूमिका ठेवली पाहिजे. नोकरीत महत्त्वाची भूमिका घ्यावी लागेल. अधिकारपद मिळेल. सार्वजनिक कामात सत्कार समारंभ होतील. आर्थिक बाजू सुधारेल. शनिवारी रेसमध्ये नशीब उघडू शकेल. अर्थातच जन्मस्थ ग्रह उच्चीचे असतील तरच रविवारी आनंददायी प्रवास घडेल. सोमवारी नोकरीत वरिष्ठांकडून काम होईल. मंगळवारी स्थावराची कामे फायद्यात होतील. बुधवारी शेअर्समध्ये लाभ होईल. गुरुवारी उद्योगपतीकडून साहानुभूती मिळेल. शुक्रवारी कौटुंबिक स्वास्थ्य मिळेल. शुभ दिनांक ३–५

**महिलांना :** शंकाकुशंकेच्या आहारी जाऊ नका. अचानक लाभही होऊ शकेल.

**विद्यार्थ्यांना :** अनेक अनुकूल घटना घडतील. नोकरीदेखील मिळू शकेल.

**मीन : पत्रकारांना अनुकूल**

गुरुच्या धर्माची रास आहे. तो तुमचा राशीस्वामी आहे. आता हा गुरू तिसरा झाला आहे. उपजत गुणांना विस्ताराचे क्षेत्र निर्माण करणे, प्रतिभा जतन करणे व सूचक साक्षात्कार घडणे असे काही तरी या गुरुमुळे होऊ शकते. मंगळ सहावा आहे तो विरोधकांना शिरजोर होऊ देणार नाही. स्पर्धेच्या क्षेत्रांत तुमचा विजय होईल. पाचवे रवी–शनी तुम्हाला मोठे करणार आहेत. एकंदरीत हा आठवडा अनुकूल आहे. शनिवारी लेखनाची सुरुवात होईल. रविवारी सन्मान होईल. सोमवारी नोकरीत व व्यवसायात महत्त्व वाढेल. मंगळवारी दुय्यम उद्योगात लाभ होईल. बुधवारी महत्त्वाच्या गाठीभेटी होतील. गुरुवारी हाती खूप पैसा खेळेल. शुक्रवारी प्रवास घडेल. शुभ दिनांक ३१–२

**महिलांना :** एखादा स्वतंत्र उद्योग सुरू करू शकाल. चालू व्यवसाय बराच अनुकूल राहील.

**विद्यार्थ्यांना :** अपेक्षेपेक्षा मोठे यश मिळेल. शैक्षणिक सवलतीसाठी प्रवास घडू शकेल. □